चोपडा भागात गुंगानाईक आणि रामजी नाईक यांनी लढ्याचे नेतृत्व केले. तर दशरथ नाईक यांनी इ.स. १९२० मध्ये नवापूर भागातील ब्रिटीशांवर हल्ले केले. इ.स. १८२२ मध्ये हरिया नाईकने ब्रिटीशांच्या ताब्यातील भडगांव एरंडोल भागातील प्रदेश लुटून धुमाकूळ घातला सुनिल नाईक व रुकरु नाईक यांनी नशीराबाद्वर हल्ले केले. दुसऱ्या बाजूला सातपुडा परिसरात नहाला भिल्ल व अंकुश नाईकने लुटीचे सत्र सुरू ठेवले. या सर्व घटनांमुळे खानदेशातील संघर्षाचे उग्र रुप धारण केले इंग्रजांनी देखील या बंडखोरांचा मागोवा घेताना ले. गार्डन व मेजर बीन यांनी २८ भिल्लांना पकडून तुरूंगात डांबले.

तत्पूर्वी खानदेशाचा पहिला कमिशनर कॅ. ब्रिग्ज हा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर एल्फिसन्स्टन यांना या घडामोडीचा वृत्तांत कळवित होता. एल्फिसन्स्टनने घटनांचे गांभिर्य लक्षात घेऊन शांततेचा मार्ग अवलंबिला व भिल्लांना प्रलोभन दाखवून त्यांचे मन परिवर्तन करण्यासाठी एक योजना तयार केली. त्यानुसार भिल्लांना जमिनी देणे, तगाई देणे, रखवालदारीची कामे देणे, रोजगार उपलब्ध करुन देणे या मार्गाचा अवलंब केला तर भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी दुसऱ्या बाजूने मेजर ईव्हान्स, ले. केनेडी, कॅ. बर्च जे. जेम्स औट्राम या कार्यक्षम लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या, तसेच खानदेश भिल्ल कोअर, माळवा भिल्ल कोअर, मेवाड भिल्ल कोअर या भिल्लांच्या लष्करी सेना उभारल्या. इ.स. १८२५ पर्यंत प्रयत्न करूनही ब्रिटीशांना या भागात शांतता स्थापित करता आली नाही. ले. औट्राम तर भिल्लांच्या वस्ती निकट राहू लागला त्याने भिल्लांचा विश्वास संपादन करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

भिल्लांच्या या संघर्षाने इ.स. १८२५ पर्यंत महत्त्वाचा टप्पा गाठला. सेधवा घाटातून ब्रिटीशांशी मोठ्या प्रमाणावर मालाची ने आण केली जात होती. हा मार्ग धुरसिंग नाईक व सुमान्य नाईक यांच्या कारवायांमुळे बंद पडला. सुलतानपूर या महत्त्वाच्या ठिकाणी देवचंद नाईक व इंग्रज

• पदव्युत्तर इतिहास विभाग, मू. जे. महाविद्यालय, जळगाव मोबा. ९४२१५४६५०५,
ई-मेल : kkvalvi@gmail.com

सैनिक यांच्यात चकमक झाली. त्यात देवचंदसह ३० सहकारी मारले गेले. कॅ.लुएट व कॅ. विल्सनने ११७ भिल्लांना अटक केली. दरम्यान डांगच्या भिल्लांनीही त्या भागात धुमाकूळ घातला, इ.स. १८२७ मध्ये खंडू नाईक व महादेव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिरपूर जवळील बोराडीवर हल्ला केला.

या संघर्षात खानदेशातील भिल्ल राजेही मागे नव्हते. ब्रिटीशांनी या राजांशी कुकरमुंडा येथे शांततेसाठी करार केला होता. मात्र ब्रिटीशांचे हस्तक्षेप सहन न झाल्याने संधी मिळताच इंग्रजाविरूध्द उठाव केले. चिखलीचे कुवर वसावा यांनी करार अमान्य करून दंड थोपटले. कुकरमुंडा भागातून ब्रिटीशांना पिटाळून लावले. शेवटी त्यांना पकडून राजद्रोहाच्या आरोपाखाली धुळे तुरूंगात डांबले, काठीच्या राजांनी देखील संघर्षाचे प्रयत्न केले. इ.स. १९३१ पर्यंत काही प्रमाणात शांतता प्रस्थापित करण्यात ब्रिटीशांना यश आले इ.स. १८१८ ते १८३१ या काळात नंदूरबार, धुळे, जळगांव, डांगा या भागात भिल्ल आणि ब्रिटीश यांच्यात उघड संघर्ष झालेत. नंतर इ.स. १८४१ मध्ये नगर भागातील भिल्लांनी पिंपळनेर येथील सरकारी खजिना लुटला. याचवर्षी भामन्या नाईकच्या नेतृत्वाखाली सुलतानपुरवर हल्ला करण्यात आला. तर इ.स. १८४२ मध्ये सावदा व यावल वर तडवीनी हल्ला केला पण त्यांना यश आले नाही.

### इ.स. १८५७ उठाव आणि खानदेशातील भिल्ल

उत्तर भारतातील ब्रिटीश विरोधी बंडाच्या वार्ता दक्षिणेत येऊन धडकल्या. महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा, नागपूर, मुंबई सक्रिय झाले खानदेशही मागे नव्हता, खाज्या नाईकांच्या नेतृत्त्वाखाली भीमानाईक, भागोजी नाईक, मवासिया नाईक, दौलुनाईक, काळूबाबा, भावसिंग यांनी ब्रिटीशांना 'सळो की पळो' करून सोडले. सातपुड्यातील आंबापाणी येथील लढाई तर अविस्मरणीय अशी घटना आहे.

खाज्या नाईक ब्रिटीशांच्या सेवेत होते. सेंधवा ते शिरपूर या ४० मैलाच्या परिसराची संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर होती. इ.स. १८३१ ते इ.स. १८५१ या काळात त्यांनी इमाने इतबारे सेवा केली. पण एका लुटारुला प्रमाणाबाहेर शारीरिक मारहाण केली, त्यात गुन्हेगाराचा मृत्यू झाल्याने त्यांच्यावर खटला भरला गेला. त्यांना दहा वर्षाची शिक्षा झाली पण त्यांच्या निष्ठापूर्ण सेवेमुळे पाच वर्षातच सुटका झाली. नंतर सेवेत वारंवार मिळणाऱ्या वाईट वागणुकीमुळे व समाजबांधवांवर होणाऱ्या अन्यायामुळे ब्रिटीश सत्ता नष्ट करण्यासाठी त्यांनी हाताल बंदूक घेतली.

स्वत:ला दिल्ली बादशहाचा प्रतिनिधी मानणारा दुसरा भिल्ल नेता म्हणजे भीमानाईक होय. त्याने सप्टेंबर १८५७ मध्ये ले. केनेडीच्या पार्टीवर अचानक हल्ला चढवला तेव्हा त्याला पडकण्यासाठी रु. १००० चे बक्षीस जाहीर केले. २९ ऑक्टोबर १८५७ रोजी खाज्या व भीमा नाईकाने शिरपूरवर हल्ला करून मोठी लुट मिळवली, तर १७ नोव्हेंबर रोजी ३०० सहकाऱ्यांसह सेंधवा घाटातील जांबली चौकीजवळ ब्रिटीशांचा इंदूरहून मुंबईला जाणारा सात लाखांचा खजिना लुटला. या सर्व घटना ब्रिटीशांना जबर हादरा देणाऱ्या होत्या. एवढेच नव्हे तर नंदूरबार, शहादा, सुलतानपूर, शिरपूर या ठिकाणी भिल्लांनी समांतर सत्ता स्थापन केल्या. शेवटी मेज ईव्हन्सने भीमा व मावासिया नाईक यांच्याशी वाटाघाटीचा प्रयत्न केला. परंतु स्वाभिमानी असलेले हे भिल्ल शरण गेले नाही.

### आंबापाणीची लढाई

मेजर ईव्हान्सनने कें. बर्ज, सर फ्रँक, ले कागलान यांच्या मदतीने भिल्लांच्या बंदोबस्तासाठी जय्यत तयारी केली. महाराष्ट्र व मध्यप्रदेश सीमेवर असलेल्या आंबापाणी येथे ११ एप्रिल १८५८ रोजी उभयतांची गाठ पडली व घनाघोर लढाई झाली या लढाईत ४०० भिल्ल स्रियांचाही समावेश होता. इंग्रजांकडे सुसज्ज कवायती सैन्य होते तर भिल्लांकडे पांरपारिक शस्रे होती. लढाईत भिल्लांचे ६५ लोक मारले गेले व १७० जखमी झाले. तर ब्रिटीशांकडून १६ सैनिक व २ अधिकारी मारले गेले. बंडखोर शरण यावे यासाठी स्रियांसह मुलांना धुळ्याच्या तुरुंगात ओलीस ठेवले. खाज्यानाईक सातपुड्यात सहज निसटले. ब्रिटीशांनी ५७ भिल्लांना गोळ्या घालून व ४६० भिल्लांना ड्रम ट्रायलने ठार केले तर अनेकांना अंदमान येथे काळ्यापाण्याच्या शिक्षेसाठी पाठविले.

या नंतरही खाज्या व भीमानाईक ब्रिटीशांशी संघर्ष करीत राहीले. शेवटी इ.स. १८६० मध्ये फितुरीमुळे अंगरक्षकानेच खाज्यानाईकांचा खून केला. त्याचे शीर ब्रिटीशांनी धरणागांव येथे वखारीजवळ आठवडाभर कडूलिंबाच्या झाडाला टांगून ठेवले. भीमा नाईक एकाकी संघर्ष करीत राहीले. इ.स. १८६७ मध्ये ब्रिटीशांनी त्यांना पकडून जन्मठेपेची शिक्षा दिली व खानदेशातील भिल्ल संघर्षाचे पर्व संपले.

इ.स. १८१८ ते १८८५ पर्यंतचा खानदेशचा इतिहास हा भिल्ल विरूध्द ब्रिटीश यांच्या संघर्षाचा इतिहास होय, भिल्लांना अंकित करण्यात ब्रिटींशाना सहज यश मिळाले नाही. हे संघर्ष ब्रिटीशांच्या दृष्टीने डोकेदुखीचे होते. आर्थिक, सामाजिक व राजकीय गुलामगिरीच्या विरुध्द हे उठाव होते. म्हणजेच प्रारंभीचे संघर्ष हे जुलूमाविरुध्द असले तरी नंतर सांस्कृतिक मुल्ये व अस्मितेच्या रक्षणार्थ होते तसेच ते अस्तित्वासाठीही होते.

ब्रिटीशांच्या दृष्टीने उठाव करणारे चोर, डाकू, दरोडेखोर होते. मात्र याच उठावांच्या पार्श्वभूमीवर पुढील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास उभा राहिला. हे उठाव म्हणजे या जमातीचा संघटीत अविष्कार होता. हा अविष्कार कधी ब्रिटीशांच्या तर कधी स्थानिकांच्या विरोधात प्रकट झाला. ब्रिटीशांपासून स्वातंत्र्य मिळवणे ही तीव्र भावना या उठाव करणाऱ्यांमध्ये होती. या दृष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांना प्राथिमक स्वरुपाचा राष्ट्रवाद म्हणता येईल याचाच अर्थ १९ व्या शतकातील आधुनिक भारतीय राष्ट्रवादाची ही सुरुवातीची अवस्था होती. सारांश रुपाने असे म्हणता येईल की, महाराष्ट्रातील आद्यक्रांतीकार भिल्ल आहेत. त्याचा इतिहास आत्मभान वाढविणारा व प्रेरणादायक असाच आहे.

संदर्भ :-

१) भामरे सर्जेराव (संपादक), स्वातंत्र्य आंदोलनात खान्देशातील आदिवासी वीरांचे हौतात्म्य (स्मरणिका) पृ. १.

२) सिक्रेट ॲण्ड पॉलिटीकल डायरी ४४७/१८१८ पृ. ३२७.

३) ग्रॅहम डी. सी. हिस्टोरिकल स्केच ऑफ भिल ट्रायबल इनहॉबिटींग द प्रोव्हाइन्स ऑफ खान्देश सिलेक्शन फॉर्म द रेकॉर्ड ऑफ बॉम्बे गव्हर्नमेंट सिरीज नं. एस. एस. व्ही आय. ८१८ पृ. २०४.

४) गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल, ऐतिहासिक व सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. १०३.

५) सिक्रेट आणि पॉलिटीकल डायरी ४४७/१८२० पृ. ७९३ ते ७९६.

६) भामरे सर्जेराव, उपरोक्त, पृ १३.

७) गारे गोविंद, स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रकाशन २००४, पृ. ८९.

८) खाबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, पृ. ६१.

९) प्रोसेडिंग ऑफ पॉलिटीकल डिपार्टमेंट व्हॉल्युम ३०/१८५७, पृ. ११३.

१०) सोर्स मटेरियल फॉर हिस्ट्री ऑफ दि फ्रिडम मुव्हमेंट इन इंडिया (बॉम्बे गव्हर्नमेंट रेकॉर्ड) पृ. २९९.

११) प्रोसेडींग ऑफ पॉलिटीकल डिपार्टमेंट व्होल्यूम २५/१८१८, पृ. ३८९

❖❖❖

# गेल्या दशकानंतर राज्यातील एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येचे लिंग गुणोत्तराचे स्वरुप

• डॉ. विलास रामचंद्र उगले

औद्योगिक प्रगतीच्या कालखंडामध्ये भारताची संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक संबोधली जाते, आजसुध्दा भारतातील संस्कृतीची विविध स्वरुपांची मूल्ये, कुटुंबव्यवस्था, स्त्रीला प्राचीन काळापासून दिला जाणारा मानसन्मान हा भौतिकदृष्ट्या पुढारलेल्या पाश्चिमात्य जगाच्या कुतुहलाचा कायमचा विषय आहे. भारतामध्ये स्त्रियांचा मानसन्मान केला जातो, गार्गी, मैत्रेयी सारख्या प्राचीन काळातील विदुषींपासून ते अलिकडच्या काळातील राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, डॉ. आंनदीबाई जोशी, इंदिराजी गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांनी आपल्या बौद्धिक कर्तृत्वाची चुणूक जगाला दाखवुन दिली आहे. असे असताना समाजसुधारणांच्या क्षेत्रात देशात अग्रेसर असलेल्या आपल्या महाराष्ट्रात स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल सन १९६१ पासून ढासळत जावा, ही खरोखरच चिंतेची बाब आहे.

आजसुध्दा स्त्री आणि पुरुष ही समाज रचनेच्या रथाची दोन प्रमुख चाके आहेत. सुदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे फार गरजेचे आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, अलिकडच्या काळात या माध्यमाचा चुकीचा वापर करून हा समतोल दिवसेंदिवस कृत्रिमरित्या ढासळत गेला आहे मुलगा हा वंशाचा दिवा, त्यामुळे मुलगाच हवा, ही अत्यंत चुकीची भावना यामागे आहे. ही भावना नष्ट करणे हे आपणा सर्वांसमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार देशातील एक हजार पुरुषांमागे ९४० स्त्रिया आहेत. आज महाराष्ट्रात हेच प्रमाण ९३० आहे. महाराष्ट्राच्या शहरी लोकसंख्येचा विचार केला तर हे प्रमाण दर हजारी ८९९ आणि ग्रामीण भागात ९४८ आहे. तर आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९७७ आहे. तर एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांच्यात जर तुलना केली तर ह्या प्रमाणात ४८ आदिवासींचे स्त्री प्रमाण जास्त आहे.

## प्रास्ताविक

देशाने स्वातंत्र्योत्तर ६४ वर्षाच्या काळात खूप मोठी प्रगती केली आहे. विविध प्रकारच्या भौतिक सोयीसुविधा गरजेनुसार विकसित केल्या. स्त्री- पुरुषांमधील सामाजिक फरकाची दरी कमी करण्याचे प्रयत्न प्रथम पासून केले गेले. परंतु त्याला शंभर टक्के यश मिळालं असं म्हणता येणार नाही. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचं सातत्यानं घटत असलेले प्रमाण हे त्या सामाजिक दरीचं द्योतक आहे. १९६१ पासून पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण सातत्याने घटत आहे. प्रत्येक राज्यात मुलींचा जन्मदरही कमालीचा घटला आहे. हे प्रमाण १९९१ मध्ये दर हजार मुलांमागे राज्यात ९६४ मुली असं होतं. २००१ मध्ये हे प्रमाण ९१३ मुलींवर आलं. २०११ मध्ये तर हे प्रमाण ८८३ इतकं खाली आलं आहे, ही आकडेवारी अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे.

जनगणना २०११ मधून स्पष्ट झालेले वास्तव समजून घ्यायचे असेल तर यातील सांख्यिकीय माहितीकडे केवळ आकडेंवारी म्हणून आता दुर्लक्ष करता येणार नाही. यातून स्पष्ट होणारी सामाजिक विषमताही दरी आणि त्यातून भविष्यात निर्माण होणारा गंभीर सामाजिक प्रश्न याकडे आपल्याला आताच लक्ष द्यावे लागेल.

असं म्हटलं जातं की, 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' आपण आपल्या जन्मदात्रीच्या पायी नतमस्तक होतो. तिला 'मातृदेवते' च्या रुपात पुजतो. तिच्यामुळे आपल्या जन्माचं अस्तित्व आपल्याला मान्य असतं. पत्नीच्या रुपात एक चांगली जीवनसंगिनी हवी असते. कन्यादानाला आपण सर्वश्रेष्ठ दान मानतो पण जेव्हा घरात मुलीचा जन्म होण्याची वेळ येते तेव्हा तिचा जन्म नाकारला जातो. गर्भलिंग चाचणी करुन मुलीचा जन्माला येण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. या वृत्तीमुळे अनेक छकुल्या जन्माला येण्याआधीच मुकतात.

आपण आपल्या भविष्याची, पुढच्या पिढीच्या जन्माची जमीनच नाकारतो आहोत. मानवी जीवनातला हा विरोधाभास आज मुला-मुलींच्या, स्त्री- पुरुषांच्या जन्मातील केवळ संख्यात्मक दरी दर्शवित नाही तर ती भविष्यातील फार मोठ्या संकटाची चाहूल दाखवत आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे राज्यात एक हजार पुरुषांमागे ९२९ महिला आहेत. महिला आणि मुलींचा हा घटता जन्म दर पाहता मुलींच्या जन्माचे स्वागत करणाऱ्या जाणीवांचा जागर करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## अभ्यास क्षेत्र

महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३०७७१३ चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्राला ७२० कि. मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. सह्याद्रीच्या

• प्राध्यापक भुगोल विभाग, सर परशुराभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे-३०

उंचच उंच पर्वत रांगा व त्यांच्या अनेक उपशाखा यातून वाहणाऱ्या गोदावरी, कृष्णा, भीमा यासारख्या नद्यांच्या खोऱ्यांचा सुपिक प्रदेश, दखखनचे पठार, मोसमी हवामान असणाऱ्या महाराष्ट्राने देशात कृषी, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात आपला ठसा उमटविलेला आहे. अशा या महाराष्ट्रातील लोकसंख्येतील स्त्री पुरुष प्रमाणाची रचना अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### उद्दीष्टे

* प्रत्येक जिल्ह्यातील एकूण स्त्री पुरुषप्रमाण व आदिवासी स्त्री-पुरुष प्रमाण विचारात घेणे.

* २००१ व २०११ या दोन जनगणने नुसार स्त्री-पुरुष प्रमाणात कल पाहणे.

### सांख्यिकीय आणि संशोधन पध्दती

सन २००१ ते २०११ या दोन जनगणनेतील स्त्री-पुरुष प्रमाणांची आकडेवारी घेवून तुलनात्मक बदल तपासण्यात आला द्वितिय स्वरुपातील आकडेवारीवरून आलेखाच्या सहाय्याने स्त्री-पुरुष प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे.

### लिंग गुणोत्तराचे वास्तव स्वरुप

जणगणना २०११ प्रमाणे भारताची लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ इतकी आहे. त्यात पुरुषांची लोकसंख्या ६२,३७,२४,२४८तर स्त्रियांची लोकसंख्या ५८,६४,६९,१७४ इतकी आहे. यामध्ये एक हजार पुरुषांमागे महिलांचे प्रमाण ९४० इतके आहे.

तक्ता क्र. १

## दर एक हजार पुरुषामागे असणाऱ्य स्त्रीयांचे प्रमाण

| वर्ष | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारत | ९७२ | ९६४ | ९५५ | ९५० | ९४५ | ९४६ | ९४१ | ९३० | ९३४ | ९२७ | ९३३ | ९४० |
| महाराष्ट्र राज्याचे स्त्रीयांचे प्रमाण | ९७८ | ९६६ | ९५० | ९४७ | ९४९ | ९४१ | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ |

संदर्भ :- जनगणना १९०१ ते २०११

वरील तक्त्याचा आलेख




२०११ च्या जनगणनेत ७ पॉईट्सने महिलांचे प्रमाण वाढून ९२९ इतके झाले आहे. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील महिलांचे प्रमाण एक हजार पुरुषांमागे ९३३ इतके होते, असे असले तरी आजमितीला एक हजार पुरुषांमागे ७ महिलांची संख्या वाढलेली असल्याचे दिसून येते.

ग्रामीण भागातील २००१ च्या जनगणनेत महिलांची संख्या ९४६ होती तर २०११ जनगणनेत महिलांची संख्या ९४७ इतकी होती. तर शहरी भागात ही वाढ ९०० वरून ९२६ इतकी झाली आहे.

**तक्ता क्र. २**

**२००१ व २०११ च्या जनगणना अहवालाच्या आधारे जिल्ह्यानिहाय स्त्री-पुरुष प्रमाण**

| जिल्हा | एकूण स्त्री प्रमाण | आदिवासी स्त्री प्रमाण | एकूण फरक | एकूण स्त्री प्रमाण | आदिवासी स्त्री प्रमाण | एकूण फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य | ९२२ | ९७३ | –५१ | ९२९ | ९७७ | –४८ |
| नंदुरबार | ९७७ | १००९ | –३२ | ९७८ | १०१० | –३२ |
| धुळे | ९४४ | ९७४ | –२९ | ९४६ | ९७९ | –३४ |
| जळगाव | ९३३ | ९४६ | –१३ | ९२५ | ९४९ | –२४ |
| बुलढाणा | ९४६ | ९४६ | –१ | ९३४ | ९४६ | –१२ |
| अकोला | ९३८ | ९४० | –२ | ९४६ | ९५३ | –७ |
| वाशिम | ९३९ | ९४८ | –९ | ९३० | ९४४ | –१४ |
| अमरावती | ९३८ | ९५७ | –१९ | ९५१ | ९६३ | –१३ |
| वर्धा | ९३५ | ९३८ | –३ | ९४६ | ९४९ | –३ |
| नागपूर | ९३२ | ९४८ | –१६ | ९५१ | ९५७ | –६ |
| भंडारा | ९८१ | ९९२ | –११ | ९८२ | ९९७ | –१४ |
| गोंदिया | १००५ | १०२० | –१५ | ९९९ | १०२२ | –२३ |
| गडचिरोली | ९७६ | ९८७ | –१२ | ९८२ | १००३ | –२१ |
| चंद्रपूर | ९४८ | ९६९ | –२१ | ९६१ | ९७९ | –१८ |
| यवतमाळ | ९४२ | ९६० | १८ | ९५२ | ९७० | –१८ |
| नांदेड | ९४२ | ९५८ | –१६ | ९४३ | ९५८ | –१५ |
| हिंगोली | ९५६ | ९४३ | ११ | ९४२ | ९४१ | १ |
| परभणी | ९५८ | ९६५ | –७ | ९४७ | ९७० | –२२ |
| जालना | ९५१ | ९६० | –९ | ९३७ | ९२२ | १५ |
| औरंगाबाद | ९२४ | ९५८ | ३३ | ९२३ | ९४१ | –१७ |
| नाशिक | ९२७ | ९७६ | –४९ | ९३४ | ९७४ | ३९ |
| ठाणे | ८५८ | ९९६ | –१३९ | ८८६ | १००५ | –१२० |
| मुंबई उपनगर | ८२२ | ८८७ | –६५ | ८६० | ९०० | –४० |
| मुंबई | ७७७ | ८४७ | –७० | ८३२ | ८६० | –२९ |
| रायगड | ९७६ | ९८१ | –५ | ९५९ | ९८६ | –२६ |
| पुणे | ९१९ | ९५६ | –३७ | ९१५ | ९४८ | –३३ |
| अहमदनगर | ९४० | ९७४ | –३५ | ९३९ | ९७९ | –३९ |
| बीड | ९३६ | ९२७ | ९ | ९१६ | ९४७ | –३१ |
| लातूर | ९३५ | ९३० | ५ | ९२८ | ९२४ | ३ |
| उस्मानाबाद | ९३२ | ९२५ | ७ | ९२४ | ९४१ | –१७ |
| सोलापूर | ९३५ | ९३२ | ३ | ९३८ | ९५० | –१२ |
| सातारा | ९९५ | ९५२ | ४३ | ९८८ | ९४८ | ४० |
| रत्नागिरी | ११३६ | ९३१ | २०५ | ११२२ | ९५९ | १६३ |
| सिंधुदुर्ग | १०७९ | ९६९ | ११० | १०३६ | ९५१ | ८५ |
| कोल्हापूर | ९४९ | ९४९ | ० | ९५७ | ९५२ | ५ |
| सांगली | ९५७ | ९४६ | ११ | ९६६ | ९४९ | १७ |
| **एकूण** | **९२२** | **९७३** | **–५१** | **९२९** | **९७७** | **४८** |

**संदर्भ :- जनगणना २००१ व २०११**

सन २००१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांच्या मागे राज्यातील स्त्रियांची संख्या ९२२ तर आदिवासी संख्या ९७३ होती या मधील तफावत ५१ होती. तर २०११ मध्ये राज्यातील स्त्रियांची संख्या ९२९ तर आदिवासींची संख्या ९७७ होती. यामध्ये तफावत ४८ स्त्रियांची दिसून येते. २००१ ते २०११ या दशकामध्ये राज्यातील स्त्री प्रमाणात ७ ने वाढ झालेली दिसून येते तर आदिसींच्या स्त्रियांमध्ये सुध्दा ५ ने वाढ झालेली दिसून येते. याचाच अर्थ २०११ मध्ये राज्यातील एक हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९२९ तर आदिवासींचे प्रमाण ९७७ होते यामधील तफावत ४८ म्हणजेच आदिवासींची स्त्री पुरुष प्रमाण एकूण लोकसंख्येच्या तुलनेत निश्चित चांगले आहे.

**तक्ता क्र. ३**

२०११ ते २००१ यांतील स्त्री-पुरुष तफावत

| जिल्हा | एकूण स्त्री प्रमाण | आदिवासी स्त्री प्रमाण | एकूण फरक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य | ७ | ५ | ३ |
| नंदुरबार | १ | १ | ० |
| धुळे | १ | ६ | −४ |
| जळगाव | −८ | ३ | −१० |
| बुलढाणा | −१२ | ० | −१२ |
| अकोला | ८ | १३ | −५ |
| वाशिम | −९ | ०५ | −५ |
| अमरावती | १३ | ७ | −६ |
| वर्धा | ११ | ११ | −० |
| नागपूर | १९ | ९ | −१० |
| भंडारा | १ | ५ | −४ |
| गोंदिया | −६ | २ | −८ |
| गडचिरोली | ६ | १५ | −९ |
| चंद्रपूर | १३ | १० | ३ |
| यवतमाळ | १० | १० | ० |
| नांदेड | १ | ० | २ |
| हिंगोली | −११ | −१ | −१० |
| परभणी | −११ | ४ | −१५ |
| जालना | −१४ | −३८ | २४ |

| जिल्हा | एकूण स्त्री प्रमाण | आदिवासी स्त्री प्रमाण | एकूण फरक |
|---|---|---|---|
| | | | |
| औरंगाबाद | −१ | −१७ | १६ |
| नाशिक | ७ | −३ | ९ |
| ठाणे | २८ | ९ | १९ |
| मुंबई उपनगर | ३८ | १३ | २५ |
| मुंबई | ५४ | १३ | ४१ |
| रायगड | −१६ | ५ | −२१ |
| पुणे | −४ | −८ | ४ |
| अहमदनगर | −१ | ४ | −५ |
| बीड | −२० | २० | −४० |
| लातूर | −७ | −५ | −२ |
| उस्मानाबाद | −८ | १५ | −२४ |
| सोलापूर | ३ | १८ | −१५ |
| सातारा | −६ | −३ | −३ |
| रत्नागिरी | −१४ | २८ | −४१ |
| सिंधुदुर्ग | −४३ | −१८ | −२६ |
| कोल्हापूर | ८ | २ | ६ |
| सांगली | ९ | ३ | ५ |
| **एकूण** | **७** | **५** | **३** |

महाराष्ट्राचे जिल्हानिहाय स्त्री-पुरुष प्रमाणातील फरक सन २००१ ते २०११ या एक दशकांसाठी जनगणनेत पाहण्यात आला. त्यानुसार रत्नागिरी ११२२ तर सिंधुदुर्ग १०३६ या दोन जिल्ह्यात दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण चांगले आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये आदिवासीच्या स्त्री पुरुष प्रमाणात २००१ च्या जनगणनेपेक्षा वाढ तक्ता क्रमांक २ मध्ये गोंदिया १०२२, नंदुरबार १०१०, ठाणे १००५ व गडचिरोली १००३ आहे.

एकूणच राज्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये हे लिंग गुणोत्तर सर्वात वरच्या स्थानावर असलेले दिसून येते, तेथे एक हजार पुरुषांमागे ११२२ महिला आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हे प्रमाण १०३६ महिलांचे इतके आहे. राज्यामध्ये मुंबई ८३२, मुंबई उपनगर ८६० व ठाणे ८८६ स्त्रीयांचे प्रमाण इतके कमी आहे. राज्यामध्ये पुढील जिल्ह्यामध्ये लिंग गुणोत्तराच्या प्रमाणात घट दर्शवली असून यामध्ये सिंधुदुर्ग ४३, बीड २०, गायकवाड १६, रत्नागिरी, जालना १४, बुलढाणा १२, परभणी ११, वासिम ९, जळगाव, उस्मानाबाद ८, लातुर ७, गोंदिया, सातारा ६, पुणे ४, हिंगोली, औरंगाबाद, अहमदनगर १, या जिल्ह्यात स्त्रियांच्या प्रमाणात घट दर्शविली आहे. (तक्ता क्रमांक ३) आदिवासी लोकसंख्येमध्ये लिंग गुणोत्तर २०११ च्या जनगणनेमध्ये जालना ३८, सिंधुदुर्ग १८ औरंगाबाद १७, नाशिक ३, पुणे ८, लातूर व वाशिम ५, सातारा ३, हिंगोली १ अशा प्रकारे लिंग गुणोत्तरात लक्षवेधी घट झाल्याचे दिसून आले आहे.

पुढे स्त्रियांची संख्या कमी होण्याच्या प्रमाणानुसार जिल्ह्यांचे गटनिहाय विभाजन केले आहे.

तक्ता क्र. ४

२००१ ते २०११ मध्ये स्त्री - पुरुष प्रमाणातील वाढ व घट दर्शक तक्ता

## एकूण स्त्री - पुरुष प्रमाणांतील दहा वर्षाची तफावत

| गट | वाढ झालेले जिल्हे | घट झालेले जिल्हे |
|---|---|---|
| ० ते ५ | नंदुरबार, भंडारा, नांदेड, सोलापूर | वाशिम, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे |
| ६ ते १० | गडचिरोली, नाशिक, अकोला, कोल्हापूर, सांगली, यवतमाळ | जळगाव, उस्मानाबाद, लातूर, गोंदिया, सातारा |
| ११ ते १५ | वर्धा, अमरावती, चंद्रपूर | जालना, रत्नागिरी, बुलढाणा, हिंगोली, परभणी. |
| १५ ते २० | नागपूर, | रायगड |
| २० पेक्षा जास्त | सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई | सिंधुदुर्ग, बीड |
| ० ते ५ | रायगड, बुलढाणा, परभणी, गोंदिया, अहमदनगर, नंदुरबार, भंडारा, कोल्हापूर, सांगली | हिंगोली, वाशिम, लातुर. सातारा, नाशिक |
| ६ ते १० | धुळे, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, नागपूर | जळगाव, पुणे |
| ११ ते १५ | गडचिरोली, अकोला, वर्धा, मुंबई उपनगर, मुंबई | औरंगाबाद, सोलापूर |
| १५ ते २० | रत्नागिरी, ठाणे | सिंधुदुर्ग, बीड, जालना, उस्मानाबाद. |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, वाढ झालेल्या स्त्री पुरुष प्रमाणात एकूण संख्येच्या तुलनेत आदिवासी स्त्रियांच्या संखेत वाढ झालेली स्पष्ट दिसून येते आदिवासी समाजात स्त्री पुरुष प्रमाणात वाढ मागील दशकात चांगल्या प्रकारे झालेली दिसून येते.

सन २००१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांच्या मागे स्त्रियांची संख्या ९२२ वरून ती २०११ मध्ये ९२९ झाली याचा अर्थ यामध्ये ७ ने वाढ झाली त्या तुलनेमध्ये २००१ मध्ये आदिवासी १००० पुरुषांच्या मागे स्त्रियांची संख्या ९७३ वरून २०११ मध्ये ९७७ म्हणजे यामध्ये ४ ने वाढ झालेली दिसून येते. याचा अर्थ असा की स्त्रियांचे प्रमाण संथ गतीने वाढत असल्याचे चालू जनगणनेमध्ये दिसून आले आहे.

महाराष्ट्राचे जिल्हानिहाय स्त्री पुरुष प्रमाणातील फरक सन २००१ ते २०११ या एका जनगणनेतील वाढ एका दशकांसाठी पाहण्यात आली आहे. एकूण लोकसंख्येमध्ये मुंबई ५४, मुंबई उपनगर ३८, ठाणे२५, नागपूर १९, अमरावती व चंद्रपूर १३, वर्धा ११, सांगली ९, कोल्हापूर ८, नाशिक ७, तर इतर जिल्ह्यात ही वाढ किंचित झालेली दिसून येते.

राज्यातील जिल्हानिहाय स्त्री पुरुष प्रमाणातील आदिवासी लोकसंख्येचा विचार करता सन २००१ ते २०११ या एका जनगणनेतील वाढ एका दशकांसाठी पाहण्यात आलेली असता रत्नागिरी २८, बीड २०, सोलापूर १८, उस्मानाबाद व गडचिरोली १५, मुंबई मुंबई उपनगर व अकोला १३, वर्धा ११, चंद्रपूर व यवतमाळ १०, ठाणे ९ इतर जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तर वाढत असल्याचे दिसून येते. परंतु तक्ता क्रमांक ३ मध्ये एकूण लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तरामध्ये कमालीची घट काही जिल्ह्यांमध्ये दिसून येते उदा. सिंधुदुर्ग ४३, रत्नागिरी व जालना १४, हिंगोली व परभणी ११, बुलढाणा १२, बीड २० यांचा समावेश होतो. तर आदिवासी समाजातील लोकसंख्येतील लिंग गुणोत्तरातील घट प्रामुख्याने जालना ३८, सिंधुदुर्ग १८, औरंगाबाद १७, पुणे ८, वाशिम व लातुर ५, यांचा समावेश होतो. यांचा अर्थ असा होतो की आदिवासी समाजामध्ये लिंग गुणोत्तरात वाढ झालेली दिसून येते.

### निष्कर्ष

राज्याचा विचार करता एकूण संख्येचा २००१ मध्ये ९२२ तर २०११ मध्ये ९२९ स्त्री पुरुष प्रमाण होते. त्या तुलनेत आदिवासी समाजाचे प्रमाण २००१ या कालखंडामध्ये ९७३ तर २०११ मध्ये ९७७ झाले. यावरून असे स्पष्ट होते की, राज्यातील स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा ठीक असतानाही स्त्रियांचे प्रमाण कमी होणे ही बाब जास्त चिंतनीय आहे. राज्यातील ज्या जिल्ह्यात आदिवासी समाज गरीब असून सुध्दा गोंदीया, गडचिरोली, नंदुरबार, ठाणे ह्या जिल्ह्यामध्ये आदिवासी स्त्रियांचे

प्रमाण दर हजारी पुरुषामागे १००० च्यावर आहेच परंतु त्या खालोखाल भंडारा, रायगड, चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. एकूण संख्येच्या लोकसंख्येमध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समावेश होतो कारण येथील पुरुष वर्ग मोठ्या प्रमाणात कामानिमित्ताने नोकरी धंद्यासाठी बाहेर गावी स्थलांतर करतात. आदिवासी जनता व दुर्गम अशा गडचिरोली, गोंदिया, नंदुरबार, ठाणे या जिल्ह्यामध्ये स्त्रियांची संख्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत निश्चित जास्त चांगलीआहे. आजच्या आधुनिक काळात सुद्धा आदिवासी समाजामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा चांगलाच असल्याचे दिसून येत.

संदर्भ :-


1. राज्य सांख्यिकी अहवाल
2. १९०१ ते २०११ पर्यंतचे महाराष्ट्र व भारत जनगणना अहवाल,
3. महाराष्ट्रातील स्त्री पुरुष प्रमाणाचे स्वरूप, डॉ. उत्तमराव पाथरे, महाराष्ट्र भुगोलशास्त्रज्ञ संशोधनपत्रिका, जानेवारी-जून २००५
4. Census of India (Provisional Population of Maharashtra)
5. लोकराज्य सप्टेंबर २०११ पान नं.२५ व ३५
6. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००१
7. Census of India 2011
8. Clarke, J.I. (1972) : Population Geography, Pergamon Press, Oxford, pp29.
9. Chandra, R.C. (1996) : Geography of Population, Kalyani Publishers, N. Delhi p p12.
10. Chandana R.C. (2008) : "Geography of population", Kalyani Publishers, New Delhi.
11. Chandrashekhar S (1964): '"Growth of Population in Madras City," Population review, Vol.No.-Pp25-35.
12. Choudhary M.R. (1987) : "Population projection of Hoasly District", Geographical review of India, Vol-49.
13. Debliji, J. Harm (2001) : "Human Geography Culture, Society and Space", John Wiley and Sons.
14. Dube R. S. : Population Pressure and Agrarian Changes" Rawat Publication Jaipur.
15. Hassan M. I. (2005) : "Population Geography", Rawat Publication, Mumbai.
16. Husain Majid (1999) "Population Geography", Anmol Publication Pvt. Ltd. New Delhi.
17. Kadam Avinash (1999) : "Distribution of Population in Baramati Taluka, Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika Vol.: 12 July-Dec. 1998.
18. Khan Y.S. (1990) : Weston Maharashtra : A Study in Popualation Geography, Ph.D. Thesis, University of Poona , Pune Pp95-126.
19. Qazi S.A (2006) : Population Geography, APH publishing corporation N. Delhi pp. 62
20. Savadi S.B. (2007)" The Mega State Maharashtra",Nirali Prakashan, Budhawar Peth, pune Pp 14-18
21. Sarang Subhashchanra (1997) : "Human Geo -Science," Vidya Prakashan, Nagpur.
22. Sawant S. B. and Athavale A. S. (1994) : population Geography "Mehta Publication" Pune.
23. Trivedi P. R. (1999) : Encyclopedia of world environment, A. P. H. Publishing corporation, new Delhi, Val IV and V.
24. World Population Prospects (Midyear estimates), 2011.


❖❖❖

# विचार बदलावा समाज बदलेल

• श्री. रविंद्र पंजाबराव सलामे

धरतीवर मुलनिवासी आणि आदिवासीचा इतिहास एवढा जुना आहे की, जेवढा या जगात मनुष्याचा इतिहास परंतु प्राचीन लिखित इतिहास किंवा दस्तऐवज आणि शिक्षणाच्या अभावी बहुसंख्य मुळनिवासी इतर समाजाच्या लोकांद्वारे शोषणाची शिकार होत आहे. आदिवासींचा प्राचीन इतिहास फारच विकसित व नगररचनेत व कृषिक्षेत्रात प्रगत होता.

परंतु आज या समाजाची अशी अवस्था झाली की, हा समाज कुठेतरी आधुनिक समाजापासून फार लांब आहे. या समाजावर इतर धर्मांनी हल्ला चढवून त्याला आपल्या प्रथा व परंपरेची बेडीत घट्ट जखडलेले आहे. त्यांना त्याच्या निसर्गापासून दुर केले जात आहे. कारण ते निसर्ग पुजक आहेत. प्राचीन काळापासून आदिवासी समाज एक जमात आहे. परंतु ते धर्म नसुन ते धम्म आहे. कुपार लिंगो त्यांचे संस्थापक आहेत. धर्माला बंधने असतात. परंतु या समाजाच्या संस्कृतीत बंधने नाहीत. त्यांच्या परंपरेत मातृसत्तेला महत्त्व आहे. ती गणव्यवस्था धरून चालणारी व्यवस्था आहे. परंतु एकविसाव्या शतकात या व्यवस्थेचा लोप होत आहे. पूर्वी या समाजात शिक्षण खेळ, कला व संस्कृती हे गोटूल मधून दिले जात होते. याचेच वारली चित्रकला निर्मिती हे एक उदाहरण आहे.

आपले महापुरुष म्हणतात की, " जो समाज आपली संस्कृती आपला इतिहास विसरतो, तो गुलाम राहतो, आणि आपल्या अस्तित्वाचा नायनाट करतो," आणि नेमके तेच होत आहे. एके काळी ज्यांनी या धरतीवर आपली सत्ता गाजवली आज तोच राज्यकर्ता गुलाम बनून आहे. अधोगतीला जात असून भुकमारी, रोगराई, कुपोषण असे हलाखीचे जीवन जगत आहे. तसेच शिक्षणापासून तर कोसो दुर आहे. उच्च शिक्षणापासून तर लांबचीच बाब आहे. आजही या समाजाला दर्जेदार नेतृत्वाचा अभाव आहे असे लक्षात येते.

आज स्पर्धेच्या युगात प्रत्येक क्षेत्रात आदिवासी बांधव मागे पडत आहे. या विद्यार्थ्याचे अंगी जिद्द चिकाटी व कष्ट करण्याची ताकत अफाट आहे. कठोर परिश्रम करण्याची इच्छाशक्ती प्रबळ आहे. ज्या समाजाला सुंदर जीवन जगण्याचे आष्ठक उपदेश देवून जगाचे कल्याण केले असे ते प्रथम जगद्‌गुरू कुपार लिंगो, तसेच ज्यांचे डरकाळीने इंग्रजांना घाम फुटायचे ते प्रथम क्रांतीकारी व तत्वज्ञानी महामानव बिरसा मुंडा अशा महान वीरपुरुषाची विरासत मिळालेल्या समाजाला आज उणीव आहे ती फक्त योग्य मार्गदर्शनाची. हे लक्षात घेवून या शिक्षणाच्या क्रांतीत उतरावयाचेच नाही तर त्यांच्या हातून आदिवासी समाजात तळागळातील समाजाला शिक्षणाची उत्क्रांती घडवायची आहे. यांची सुरूवात कुणीतरी करणे गरजेचे आहे. ज्या समाज्याच्या नावाने मी इंजिनिअरिंग केले आणि नंतर आदिवासी समाजाच्या संवर्गातून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे अधीक्षक पद शिक्षण विभागात मिळाले, त्या समाजाची परतफेड करण्यासाठी मी झटायला स्वत:ला तत्पर केले. कोणतेही सामाजिक प्रबोधन करायचे म्हटले की, ते सहजासहजी होत नाही. ज्यांच्या कल्याणासाठी शासकीय योजना राबविल्या जातात त्यांनाच ती माहिती नसती किंवा गावोगावी रानावनात खेड्यात प्रचार व प्रसार होत नाही. सुधारणा नको असतात. असा चुकीचा अर्थ किंबहुना पसरविला जातो. शासनाद्वारे पुणे वा नागपूर सारख्या ठिकाणी निवडक विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षेचे शिकवणी केंद्रातून महाराष्ट्रात मोजकेच विद्यार्थी घडत आहेत. परंतु या स्पर्धेच्या जगात जास्तीत जास्त सामान्य विद्यार्थ्याला कसा फायदा होईल या विचाराने माझ्या मनात धडकी लागत होती. म्हणून खचून जाणे आपल्याला जमत नाही. राई राई ने पर्वत तयार होतो ही म्हण मेंदूच्या एका कोपऱ्यात घट्ट बसवून ठेवली व यांची सुरुवात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीराने केली. कारण या वेळी स्पर्धा परीक्षेला फारच महत्त्व आहे. इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाच्या निकालाचा आराखडाही निचांक गाठत आहे. हे निदर्शनास येताच मी माझ्या सहकारी मित्रांशी चर्चा करून या विषयावर मंथन केले. आणि १५ नोव्हेंबर क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या १३८ व्या जयंती निमित्याने संपूर्ण जिल्ह्याभर आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परिक्षेची जनजागृती करण्याचे ठरविले. शिक्षण व प्रशिक्षणात मुलभूत फरक आहे. शिक्षणाने लोक कदाचित ज्ञानी होतात, परंतु प्रशिक्षणाने जागृती निर्माण होते. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीर सुट्टीच्या दिवशी घ्यायचे. प्रथम सुरुवात भंडारा तालुका येथील विद्यार्थ्यापासून केली. सर्व शाळा महाविद्यालयात वसतीगृहात जावून विद्यार्थ्यांना या शिबिराविषयी माहीती दिली. तसेच गावोगावी माहितीपत्रक पोहचविले. माझे जवळचे मित्र श्री. राजकुमार हिवारे जेष्ठ अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा,

• शालेय पोषण आहार, सातेगली, भंडारा तथा
सल्लागार, आदिवासी विद्यार्थी संघ, भंडारा, फो. नं. ०७७९८१३८६०४

श्री. नरेश आचले सर, सौ. सुरेखा सलामे मॅडम तसेच आदिवासी विद्यार्थी संघ, भंडारा यांचे अध्यक्ष नागेश कळपते व सचिव नरेड मडावी यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन दिले. यात स्पर्धा परिक्षा म्हणजे काय ? विषय कोणते व कसे असतात ? अभ्यास कसा करावा ? सकारात्मक विचारांना वाव द्यावा. व्यक्तीमत्त्व व विकास कसा करावा ? याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नाची उकलही करण्यात आली अनेक पुस्तके अनेक वेळा वाचण्यापेक्षा दर्जेदार पुस्तके वाचावी. तुमच्याकडे वेळ किती आहे हे महत्त्वाचे नाही, त्या वेळेचा सदुपयोग कसा करावा हे आवश्यक आहे. अशाच प्रकारे जिल्ह्यातील साकोली, तुमसर, मोहाडी व पौनी तालुक्यात शिबिरे राबविली. यात शिबिरांना ही चांगला प्रतिसाद मिळाला. अशी शिबिरे नेहमी राबवावित अशी विद्यार्थ्यांकडून मागणी होवू लागली. यातुन माझ्या मनाला असे वाटते की राई राई ने पर्वत होण्यास सुरूवात झाली. म्हणून जिल्हास्तरीय स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबिर सार्वजनिक वाचनालय, गांधी चौक भंडारा येथील प्रशस्त सभागृहात दिनांक ३० नोव्हेंबर २०१३ ला आदिवासी विद्यार्थी संघ, भंडारा यांचे बॅनरखाली त्यांचे संपूर्ण मदतीने व माझे वरिष्ठ सहकारी मा. श्री. सुरेश पैदाम, जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि. प. गोंदिया, श्री. राजकुमार हिवारे जेष्ठ अधिव्याखता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा व श्री नरेश आचले सर या सर्वांच्या सहकार्याने शिबिर घेण्यात आले. या शिबिराला मुख्य मार्गदर्शक महाराष्ट्र राज्याचे माजी सचिव तसेच सनदी अधिकारी मा. किशोर गजभिये साहेब उद्घाटक म्हणून मा. डॉ. माधवी खोडे जिल्हाधिकारी, भंडारा, मा. आर. डी. आत्राम साहेब उपप्रादेशिक सहआयुक्त समाजकल्याण, नागपूर विभाग यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला. मा. किशोर गजभिये साहेबांनी स्पर्धा परीक्षेच्या प्रत्येक पैलूंना समजावून संगितले.

त्याची माहिती खालील प्रमाणे --

**Civil Service Examination**

* Services UPSC, MPSC and Allied Services.

**Eligibility**

* Graduate in any discopline or equivalent.

* Candidates Appearing for finals are eligible. Age Limit 21 to 30 Year ad on 1 st August Every year.

**RELAXATION**

5 years for Sc/St, 3 years for Obc. 21 to 30 years as on 1st August every year.

**NUMBER OF ATTEMPTS**

4 attempts general OBC - attempts Sc/St - no limit up to 35 yrs

**EXAMINATION STRUCTURE**

**CIVIL SERVICES PRELIMINARY EXAMINATION**

Now called & civil services aptitude test(CSAT)

**C- SAT PAPER 1- GENERAL STUDIES**

Total marks - 20 Duration -2 hours. Paper ii -Aptitude test , total markes =200 Duration -2 hours.

**SYLLABUS - PAPER I :-** Currennt Events, History of India, Indian and World Geography, Indian Polity and Governance, Economic & Social Development, Environment, Ecology, Bio-Diversity, General Sciences.

**PAPER II (APTITUDE TEST) :-** Comprehension, Interpersonal Skills, Logic Reasoning, Analytical Ability, Basic Numeracy (numbers. Interpretation (carts, Graphs, Tables) English Language Comprehension Skills.

**MAIN EXAMINATION**

Subjective type every year in OCT. /NOV.

**MAIN EXAMINATION**

2 Papers Non Ranking Type 7 Papers Ranking Type. Main Examination.

Paper - I One Language Form 22 Languages. 300 Marks. Paper- II English Language 300 Marks.

Marks Not Counted In Merit List.

**MAIN EXAMINATION**

Paper III Essay 200 Marks

**MAIN EXAMINATION**

Paper Iv General Studies 300 Marks. Paper V General Studies 300 Marks.

**GENERAL STUDIES FOR MAINS**

Paper I - History Of Modern India And Indian Cultre. Geography Of India, Indian Constitution And Indian Polity, Current National Issues Topics Of Social Relevance...

**GENERAL STUDIES FOR MAINS**

India And The World, India Economic Interaction With The World Science & Technology, It And Space Science, International Affairs, International Institutions Statistical Analysis Graphs And Diagrams.

## MAIN EXAMINATION

Paper-VI Optional Subject (paper 1), 300 Marks.

paper-VII Optional Subject 1. (Paper 2), 300 Marks

## MAIN EXAMINATION

Paper- VIII Optional Subject 2, (Paper 1), 300 Marks. Paper - IX Optional Subject 2, (Paper-2), 300 Marks

## INTERVIEW

Leadership Qualities. Impartiality -Above Caste, Religion, Politics, Faith. Poise, Honesty And Stubbornness.

## SUBJECTS FOR MAINS

You Can Choose Any Subject Not Necessarily Subject Of Your Gradation, Scoring is the Criteria. Availability of Study Material And Books. Availability Of Notes. Past Trend. Your Liking And Interest In The Subject.

## COMBINATION OF SUBJECTS

## NOT ALLOWED

Pol. Sc. & Int. Relations And Public Administration.

Commerce & Accountancy And Management. Anthropology And Sociology. Mathematics And Statistics. Agri. And Animal Husbandry & Vety. Sc

## COMBINATION OF SUBJECTS

## NOT ALLOWED

Management And Public Administration.

Two Engg. Subjects Not Allowed. Animal Husbandry & Vet. Sc. And Medical Science.

## HOW TO PREPARE

Foundation - General Knowledge, Everything about Our Country , People, Land, Economy.

## FOUNDATION

Indian Constitution, Indian History, Indian Culture, Indian Geography, Indian Economy, Indian Planning, Indian Flora and Fauna, Indian Sports, Bio-diversity, Sustainable Development Environmental Issues, Human Rights, Panchayat Raj, Economic Policies, Indian Freedom Struggle, Indian Social Reformers

## BOOKS FOR PRELIMS / MAINS

NCRET Books Of 10th, 10 "and 12 "Standards. Any Book On Constitution Of India. Encyclopaedia Of General Knowledge.

National Book Trust Of India, Publications

Division, Goi, Gandhi, Nehru, Tagore Economy Of India, SCERT Books, Other Publications Unique Publications,

Tata Mc Graw Hill Publications Bookhive Sudha, Upkar, Meerut, Allahabad Publications Magazines /Journals Pratiyogita. Darpan Frontline Indian And Foreign Review Yojana, CSR, Competition Master, Career And Competition Times Year Books, India Year Book (pd, Goi), Manorama Year Book Economic Survey (Report) Min. Of Finance, GOI, Govt. Of India Reports

## NCERT BOOKS

History Ancient India, Medieval India, Modern India, Indian Polity, Indian Economy, Indian Geography. Democracy At Work, India On Move, Biology, Social Sciences

## HOW TO START ?

Collect Books Buy, Borrow, Stael, Collect Enough Study Material, Read News Papers Times Of India, Hindu Etc.

## MORAL SUTRA

Always Discuss, Think .read And Discuss.

## HOW TO PREPARE

Read Syllabus Carefully, Read Books Take Notes, Take Notes In Registers, Paper Cuttings, Articles, Group Discussions, News Papers, Magazines Govt. Reports, Journals, Clippings, Economic And Political Weekly, Beauracray Today Journa, Read Anything And Everything, Know The Past. Trend, read What You Don't Know, Take Notes, Read Only Notes.

## HOW TO STUDY :- MAKEA SCHEDULE

Plan, Allocate Time For Each Subject, Every Hour Counts, Planned Study, Revise Schedule, And Cot, Sleep, Study, Sleep, exercise, Study Smart, Not Hard.

### PRIORITIES

What you intend to study. Take small break. Quality is important not quantity. Set aside time for every subject. Study every day. Don't watch TV, Cinema. No social functions dedicate study in groups, Discuss.

### STUDY SMART

Motivate Yourself, Set goals for study, and Set a daily schedule. First study the subject you dislike Most. Reward yourself Think positive, Make study interesting. Get organised, start anytime, anywhere. Keep registers, exercise read / write / study /review. memorise, practice writing, keep syllabus in mind, refer to old question papers. Cut all distractions, Study In Bits/ Piecemeal Always revise.practice how to remember, think. Use brain and wisdom, use mind power strength lies in mind, steady mind, mind power. Dare to dream big. Have a goal, ambition, unshacle yourself, Fear of unknown, believe in yourself. Think positive, Be a good human being. Ego is dangerous. Life is a challege. Work now - Enjoy later. Follow Natural Laws. Personatical Test.

### WHAT IS NOT A PERSONALITY ?

Dress, Colour, Hair Spects, Language, Personality Understanding, Poise, Analytical Mind, Positive Attitude Presentation, Conduct.

### INTERVIEW TECHNIQUE

Dress well Be confident, Carry papers, Sit upright, Speak well. Look in to eyes, Do not argue, Present arguments confidently, What you know is not importnt, How you present is important, They read your mind, Body language is important.

वरील अभ्यासक्रमानुसार मुलाखत कशी द्यावी, यात व्यक्तिमत्व विकास किती महत्त्वाचा आहे ? स्पर्धा परिक्षेपासून विद्यार्थी फक्त पास होत नाहीत तो परिपक्व होतो. तो समाजाचा, आपल्या देशाचा कसा विकास करतो ? हे साहेब सविस्तरपणे समजावून सांगत होते तेव्हा संपुर्ण सभागृह स्तब्ध होते. सभागृहाबाहेर विद्यार्थी ४ तास उभा राहून सर्व माहिती ग्रहण करीत होते.

❖❖❖

# भिल्ल एक आदिवासी जमात

• पांडुरंग भोये,

आदिवासी जमातीपैकी भिल्ल ही एक प्रमुख जमात आहे. भारतातील मुंडा, संथाळ, मिना, ओरियन व भिल्ल या प्रमुख जमाती मानल्या जातात. भारतातील भिल्लांचे ऐतिहासीक संदर्भ, समाजजीवन, आर्थिक जीवन व सध्याचे भिल्लाचे जीवन याचे विवेचन प्रस्तुत लेखात केलेले आहे. आदिवासींमधील या जमातीचे जीवन व महत्त्व आपणास अधोरेखीत करता येईल.

### प्राचीन भारतातील भिल्ल आणि त्यांचा विकास

प्राचीन काळी मध्यपुर्वेतून आलेल्या प्रोटो ऑस्टलॉईड लोकांचे भिल्ल, कोळी व शबर वंशज होते असे मानव शास्त्रज्ञांचे मत आहे. प्राचीन संस्कृत साहित्यात आणि नंतरच्या वाङ्मयात भिल्लांचा उल्लेख आलेला आहे. भिल्ल शब्दाचा अर्थ रानटी जमात असा होतो. काही तमीळ कवींनी उत्तर भारतातील काही आदिवासींना उद्देशून त्यांना हा शब्द वापरला असावा असे केंब्रीज इतिहासाकारांचे मत आहे, 'विल्लू' किंवा 'बिल्लू' या शब्दाचा पुष्कळ द्रविडी भाषांत धनुष्य असा अर्थ होतो. धनुष्य हे अजूनही भिल्लांचे शस्त्र आहे. बिल्लूवर या शब्दाचेच अपभ्रंश रुप भिल्ल असेही काही तज्ञ म्हणतात. (जोशी महादेवशास्त्री, संपा पृ. ५२९) प्राचीन साहित्यात भिल्लांचे मोठ्या प्रमाणात संदर्भ आढळतात. महाभारत, कथासरीतासागर व रामायण ग्रंथात भिल्ल हा शब्द वापरला आहे. ज्यांनी वर्णव्यवस्था स्विकारली ते शुद्र ज्यांनी वर्णव्यवस्था स्विकारली नाही ते निषादच राहीले. इ.स. पूर्व ५०० मधील जनसमूहांच्या यादीत भिल्लांचा समावेश होतो. भिल्लांच्या भाषेमध्ये संस्कृतमधील तत्सम असे नीड (नीर) व भिल्ल यासारखे शब्द आजही दिसून येतात. महाभारतात एकलव्याच्या प्रसंगात भिल्ल वा निषाद शब्द येतो. रामायणातही निषादराज व शबरी यांचे उल्लेख आहेत. हे सर्व शब्द भिल्ल या अर्थानेच वापरलेले आहेत. जैन पुराणांमध्ये भिल्लांसाठी भिल्ल शब्दाबरोबरच किरात तसेच वनचर असे शब्द वापरलेले आढळतात. अवध व ब्रज साहित्यात त्यांना व्याध व शबरही म्हटले आहे. (शेखावत अर्जुनसिंह, २००७ पृ. २३-२४)

वेगवेगळ्या अभ्यासकांनी भिल्लांच्या बद्दल मते व्यक्त केलेली आहेत. रॉबर्ट शेफर यांनी निषादांना 'भिल्लांचे पूर्वज' मानले. कर्नल टॉडने 'ॲनाल्स अँड ॲंटिक्विटीज ऑफ राजस्थान' या पुस्तकात भिल्लांना वनपुत्र म्हटले आहे. हिरालाल आणि रसेल यांच्या दृष्टीने भिल्ल हे कोलवा मुंडाशी संबंधीत असून ते छोटा नागपूर मधून नर्मदा खोरे तसेच गुजरात व दक्षिण राजस्थानकडे पसरत गेले. मेजर के. डी. अर्सकोन यांच्या मतानुसार भिल्ल हे भारताचे मुळ रहिवासी आहेत. इ. स. च्या कित्येक वर्षे आधीच ते उत्तर पूर्व व उत्तर पश्चिम दिशांनी भारतात आले. हिंदूंच्या आक्रमणांनी त्यांना जंगलाचा आश्रय घ्यावा लागला आहे. (शेखावत अर्जुनसिंह, २४-२५)

### भिल्लांचा प्रदेश व शरीररचना

सातपुडा प्रदेश हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यात राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेशातील पर्वतरांगा, विंध्य व अरवलीच्या पर्वतरांगा, महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे याचा समावेश होतो (गारे गोविंद- पृ -९) राजस्थानमधील भिलवाड, चित्तोडगड, उदयपूर, डुंगरपूर आणि बन्सवारा भागात भिल्ल आढळतात. गुजरात मधील सुरत, डांग बुरूच, वडोदरा, पंचमहाल, मेहसाना, अहमदाबाद, बनासकाठा, साबरकाठा, आणि कुच जिल्ह्यांत भिल्ल आढळतात, मध्य प्रदेशातील, धार, झाबुआ, खेरगाना आणि रतलाम या जिल्ह्यांत भिल्ल आढळतात.

निरनिराळ्या भागातील भिल्ल हे दिसण्यात निरनिराळे आहेत. गुजराती भिल्ल ठेंगणे, रुबाबदार व चपळ असतात, महाराष्ट्रातील भिल्ल मध्यम उंचीचे, काळे, रूंद नाकाचे, गालाची हाडेवर आलेले चपळ आणि काटक असतात. राजस्थानातील भिल्ल उजळ रंगाचे असतात. सर्वसाधारणपणे भिल्ल स्त्रिया उजळ रंगाच्या, ठेंगण्या व बांधेसूद असतात. (पाटील अशोक, १९८८ पृ. ३४-३७)

### भिल्लांमधील जमाती

भिल्लांच्या वेगवेगळ्या उपजमाती आढळतात. भिल्ल गरासिया, ढोली, भिल्ल, भिलाल, डुंगरी भिल्ल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल्ल, रावन भिल्ल, तडवी भिल्ल, भगालिया, पावरा, वसावा आणि वसावे इ. उपजमातींचा समावेश भिल्लांत होतो.

### भिल्लांची बोली भाषा

भिल्ल हे पुर्वीपासून भिलोरी भाषा बोलत आले आहेत. भिलोरी भाषेत बिहार व उत्तर प्रदेश ह्या भागात असलेल्या मुंडा जमातीच्या मुळ मुंडी भाषेचे शब्द आढळतात. ह्या भाषेची रचना ही द्रविड भाषांशी

• सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७

मिळतीजुळती आहे. ह्या भाषेचा संस्कृत शब्द आढळतात. (मनोहर दीनानाथ, पृ ९)

भिलोरी बोली भाषांमध्ये हिंदी, गुजराथी, मराठी इ. भाषांमधील शब्द वापरात आलेले दिसतात. ज्या प्रादेशिक बोली भाषेचे प्राबल्य असेल त्या भाषेचे प्राबल्य भिलोरी भाषेत जास्त दिसून येते उदा. मराठी भाषकांच्या संपर्कात आहे, तेथे मराठीचे प्राबल्य तर गुजराथी भाषिकांच्या संपर्कात आहे तेथे गुजराथीचा प्रभाव दिसून येतो (गारे गोविंद, पृ-७४)

**भिल्लांची आर्थिक व्यवस्था**

भिल्ल जमात ह्या प्रामुख्याने शेती करून, जंगलातील कंदमुळे, फळे गोळा करून विकून शिकार करून आपली उपजिवीका भागवितात, बिगर आदिवासी क्षेत्रात रखवाली करण्याचे काम भिल्ल करतात. (मनोहर दिनानाथ, पृ-२२) लाकडे तोडणे, गवत कापून ते विकणे.

**भिल्लांची सामाजिक व्यवस्था**

भिल्लांच्या वसाहती ह्या सुट्या सुट्या असतात. जी गावे किंवा वस्त्या असतात. त्या नातेसंबंधातील लोकांच्या असतात. ह्या वस्त्या बहुतेक वेळा एकाच गोत्राच्या असतात. भिल्लांच्या गावात तीन प्रकारचे प्रमुख असतात. वसावो किंवी तडवी हा गावचा प्रमुख म्हणून काम करतो. वसावो किंवा तडवी द्वारा खालील प्रकारची कार्य करण्यात येतात.

**१. विवाहबद्दलची कार्ये**

तडवी द्वारा गावातील तरूण आणि तरूणींचे विवाह निश्चित करून त्यांची व्यवस्था केली जाते. वधूमूल्य (दाता/देज) निश्चित करून विवाहप्रसंगी त्याची देवाण घेवाण करणे, पुनर्विवाह (नातरा) च्या प्रसंगी पतीला परत करण्यात येणारे वधूमूल्य निश्चित करणे. गावात आलेल्या वऱ्हाडी मंडळींची व्यवस्था करणे आणि विवाह शांततापूर्ण पार पाडणे. घरजावई संबंधी विवाह निश्चित करणे विवाह मोडण्यास परवानगी देणे.

**२. नियमन व नियंत्रणाची कार्ये**

कौटुंबिक वाद निर्माण झाले असतील तर ते सामोपचाराने मिटवणे. अनैतिक संबंध प्रतिबंधित करणे. वासनावश अनैतिक कार्ये केले असेल तर त्याला शिक्षा देणे. संपत्ती संबंधी वादासंदर्भात मध्यस्थता वसावो करतो. वेगवेगळ्या प्रथा, परंपरा जपण्याचा तो प्रयत्न करतो. वेगवेगळे कार्यक्रम, जत्रा आणि उत्सव यांचे व्यवस्थापन करण्याचे काम वसावो द्वारे केले जाते.

तडवी किंवा वसावो हा भिल्ल समुहामध्ये महत्वाचा असून तो समुहाचे नियंत्रण करणे, मार्गदर्शन करणे आणि परंपरांचे संरक्षण करण्याचे काम करीत असतो. त्याच्या आज्ञांचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची असते.

तडवीच्या सहाय्याला कोतवाल असतो. तो प्रामुख्याने संदेश वाहकाचे काम करीत असतो. निरोपाची देवाणघेवाण करणे, गावातील बातम्या वसावोला कळविणे, गावात येणाऱ्या बाहेरील व्यक्तीबद्दलची माहिती ठेवणे. पंचायत बैठकीची वेळ निश्चित करणे तसेच स्थान आणि दिवस यांची सुचना कोतवालाद्वारा सर्वांना दिली जाते. पंचायतीमध्ये घेण्यात आलेले निर्णय यांची अंमलबजावणी करणे, करण्यात आलेले दंड याची वसूली करण्यात कोतवालाची महत्वाची भुमिका असते. सामुहिक पुजेच्या कार्यक्रमाच्या वेळी वसावो यांच्या सुचनेनुसार पुजा, विधी आणि भोजनाचे नियोजन कोतवाल करीत असतो. (पाटील अशोक, पृ. ८४-८६) वसावो व कोतवाल व्यतिरिक्त बडवा देखील महत्वाचा आहे. भिल्लांच्या धार्मिक व्यवस्थेतच धर्मगुरूबद्दलचे विवेचन पुढे केले आहे.

**भिल्लांची धर्मिक व्यवस्था**

भिल्लांवर हिंदू धर्माचा आणि इस्लाम व नंतर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव पडलेला आहे. परंतु त्यांनी हिंदू धर्मातील सर्व तत्वे स्वीकारली नाहीत. वेगवेगळे उत्सव, पुजा पध्दती आणि इतर बाबींचा पुरस्कार केला आहे. हिंदूधर्मातील काही दैवतांची पुजा भिल्लांद्वारे केली जाते. पंधराव्या शतकात भिल्लांची वस्ती असलेला रेवकाडा हा भाग मुस्लिम राज्यकर्त्यांनी ताब्यात घेतला. सतराव्या शतकापर्यंत या भागात मुसलमानांचा अमल चालू राहिला. औरंगजेबाच्या कारकिर्दीत अनेक भिलांनी इस्लाम धर्म स्विकारला धर्मांतरीत भिल्लांना तडवी संबोधण्यात येऊ लागले (चौधरी कि.का.पृ २०४)

**भिल्लांच्या देवता**

सर्व आयुष्य सुखा समाधानात घालवून नैसर्गिक रित्या मृत्यू पावलेला भिल्ल उपकारी पिशाच्यांत वावरतात आणि आपल्या वंशजांचे हित पाहतात अशी भिलांची समजूत आहे. भगताच्या माध्यमांतून ही भूतखेते यांच्याशी संपर्क साधत असतात. आपल्या वंशजांनी आपली आठवण ठेवावी अशी त्यांची अपेक्षा असते. मध्यप्रदेशात रतनमाळ प्रदेशात राहण्यासाठी एक वन राखण्यात आले आहे. त्याला 'देवाचे वन' असे ही म्हणतात. हे वन पूर्वीपासून ठेवण्यात येते. मृतात्माच्या नावाने दगड उभारून त्याची स्मृती कायम ठेवत असत.

**भिल्लांचा धर्मगुरू**

भिल्लांच्या धर्मगुरूला 'पुजारा' असे म्हटले जाते. पुजारा हा गावाचा धर्मगुरू असतो. गावातील सर्व देवालये, पुजास्थळ आणि इतर धार्मिक स्थळांची सुरक्षा करणे हे त्याचे कर्तव्ये आहे. तडवीकडून आदेश घेऊन त्यांच्या आदेशानुसार वेगवेगळी धार्मिक कार्ये आयोजित करीत असतो. पुजाराप्रती गावकऱ्यांचा आदर असतो. त्याला अन्न व दान-दक्षिणा देऊन समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करत असतात.

गावातील लोकांच्या उपचारासंदर्भात बडवा हा महत्वाचा असतो. जादू-टोणा करून तो लोकांना बरे करतो. गावातील लोकांच्या समस्या, आजार, मर्यादा आणि मानसिकता त्याला चांगली माहिती असते. तो साधारण आजारांचे आपल्या ज्ञानाच्या आधारावर वेगवेगळ्या औषधांची

(जडी-बुटी) मनोवैज्ञानिक पध्दतीने उपचार करीत असतो. (पाटील अशोक पृ. ८६-८७) वेगवेगळ्या आजारांच्या संदर्भात बडवा महत्वाचा मानला जातो. देव व दृष्ट आत्म्यापासून संरक्षणासाठी तसेच सुखसमृध्दी, विशिष्ट व्यक्तीचे आजार बरे करणे इ. साठी बडवा महत्वाचा मानला जातो. बडवा आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या कथांचा वापर करीत असतो. बडव्याचे पद वंशपरंपरागत असते. तो जर निपुत्रिक असला किंवा त्याचा मुलगा हे काम करण्यास समर्थ नसेल तर त्याच्या घरातील इतर व्यक्तीला प्रमुखाद्वारा बडवा म्हणून नेमले जाते. कुणालाही इजा पोहोचविणे यासाठी प्राप्त करण्यात आलेल्या विद्येला 'मुठ' सांगितले जात असे. भिल्ल जमातीतील जादुई उपचार जन्मापासून मृत्युपर्यंत केले जात असतात. आजदेखील बडवा व त्याचे महत्व गावांमध्ये आहे. (पाटील अशोक पृ. ६५)

भिल्लांच्या दैवतांच्या कल्पना लक्षात घेतल्यास असे दिसून येते की, भिल्लाची दैवते व श्रद्धास्थाने पूर्वीपासून ठरलेली आहेत. निसर्गावर आधारीत त्यांची पारंपारिक दैवते आणि इतर समुहांच्या संपर्कात आल्याने त्यांची ठरणारी दैवते यांचा समावेश यात होतो. भिल्लांचे असणारे धर्मगुरू हे समुहाच्या धार्मिक बाबतीत नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असतात. भिल्लांच्या प्रदेशात असणाऱ्या परंपरागत श्रध्दास्थानांची व संकेतांची जपणूक भिल्लांमार्फत केली जाते.

**विवाह प्रथा**

भिल्लांच्या विवाहप्रथांसंदर्भात त्यांच्यात बहुपत्नीत्वाची व प्रौढ विवाहाची प्रथा रूढ आहे. विधवा विवाहाला संमती आहे. विवाह हे वडीलधाऱ्या मंडळीच्या सल्ल्याने होतात. विवाहप्रसंगी नृत्यगान, आंनदोत्सव व मद्याची रेलचेल होत असते. भिल्ल मुलाला मामाच्या मुलीशी लग्न करता येते. परंतु आतेबहिणीशी वधू मुल्य (देज) देण्याची प्रथा प्रचलित आहे. भिल्लांच्या विवाहाचे वेगवेगळे प्रकार आहेत. यात बयव किंवा शादी, नत्र, उदय किंवा आईवरई, घरजावई, भगोरीया, भिज्जिलच व झगडा असे विवाहाचे प्रकार आहेत. (जोशी महादेव शास्त्री पृ. ५३३)

**मयत विधी**

राजस्थानमधील भिल्ल प्रेत पालथे ठेऊन जाळतात. ही प्रथापूर्वीपासूनच चालत आली आहे. लहान मुले, कुमारिका व देवीने मृत्यु पावलेल्यांना पुरतात. यात वेगवेगळे विधीही केले जातात. मृतांच्या तोंडात अन्न व पाणी इतर लोक घालतात. महाराष्ट्रातील भिल्लांत मनुष्य आसन्नमरण पावला तर त्यांचे नातेवाईक इतरांना दान धर्म करतात. मनुष्य मृत झाला तर त्याला घोंगडीवर ठेवतात. स्नान घालून व नव्या पांढऱ्या वस्त्रात अच्छादून तिरडीवर ठेवतात. पुढे स्मशानात नेऊन पुरतात आणि पुढचे विधी केले जातात. (जोशी महादेव शास्त्री पृ. ५३७)

भिल्लांच्या सामाजिक जीवनाचा विचार केला असता भिल्लांची वसतीस्थाने, भिल्लांचे गावातील प्रमुख, भिल्लांच्या विवाहाच्या प्रथा, भिल्लांच्या बोलीभाषा आणि मयत विधी यामधून त्यांच्या सामाजिक व्यवस्थेसंदर्भात प्रथा, परंपरा, संकेत व सांस्कृतिक मूल्ये ही पूर्वीपासूनच ठरत आली आहेत. ज्यामुळे इतिहासाच्या संदर्भात आजही भिल्ल या सर्व सामाजिक मूल्यांचे आचरण करताना दिसतात. इतिहासाच्या संदर्भात भिल्ल या आदिवासी जमातीची सामाजिक व्यवस्था होती. एक समूह म्हणून त्यांची वेगळी जीवनपध्दती आहे हे स्पष्ट होते. भिल्ल आदिवासींचे संदर्भ प्राचीन काळापासून मिळतात. सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या भिल्ल स्वत:चे वेगळेपण जपून आहेत. आधुनिक मूल्ये, परंपरा व बदल यांचा परिणाम जरी त्यांच्यावर झाला असला तरीही स्वत:चे 'स्वत्व' जपताना दिसतात. भारतातील आदिवासी समूहांच्या वेगवेगळ्या प्रथा, परंपरा व जीवन पद्धती आहेत त्याचप्रमाणे भिल्लांची देखील ही जीवधपद्धती ते जपताना दिसतात. भिल्ल ही आदिवासीतील एक महत्त्वपूर्ण जमात असून ही जमात झालेले बदल स्वीकारत स्वत:चे अस्तित्व टिकविताना दिसते.

**संदर्भ सूची**


**अ) इंग्रजी**

1. Mahendra Prakash Chandra, 1998, Charging face of bhils, Udaipar, Shivaji Publication Distributors.

**ब) मराठी**

१. गारे गोविंद, (प्रकाशन वर्ष अनुल्लेखित), सातपुड्यातील भिल्ल, ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

२. चौधरी कि. का. (संपा), १९९४ जळगाव जिल्हा गॅझेटिअर, सास्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन.

३. जोशी महादेव शास्त्री पं., (संपा), १९८२, भारतीय संस्कृती कोश, खंड १ ला, पुणे भारतीय संस्कृती मंडळ.

४. मनोहर दिनानाथ, (प्रकाशन वर्ष अनुल्लेखित), आमू आहि वाघा पिल, शहादा.

५. शाखावत चामुलाल व अर्जुन सिंह, २००७ राजस्थानच्या भिल्लांचा इतिहास व विकास, जोशी अरूणा व इतर (संपा), ढोल.

**क) हिंदी**

पाटील अशोक, १९८८, भिल्ल जनजीवन और संस्कृती, भोपाल, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी.


❖❖❖

# "आदिवासी गिरीजनांचे कैवारी डॉ. गोविंद मोघाजी गारे"

• लक्ष्मण बाळू साबळे,

माझे आदर्श, प्रेरणास्थान व माझे गुरूवर्य तसेच केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक आणि संशोधक, थोर विचारवंत व प्रख्यात वक्ते डॉ. गोविंद मोघाजी गारे यांचे दिनांक २४ एप्रिल २००६ रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. डॉ. गोविंद गारे यांच्या निधनाने आदिवासी जमातीचे एक मोठे छत्र हरपले आहे. डॉ. गोविंद गारे यांनी राज्यातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी, उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले. आदिवासी जीवन संस्कृती आदिवासींचे अस्तित्व व अस्मिता, समाजकारण-राजकारण व जीवनमुल्ये यांची सांगड केवळ साहित्यातून नव्हे तर जगण्यातून व आचार विचारातून प्रत्यक्षात त्यांनी आणले आणि लेखणीद्वारे समस्त जगापुढे मांडले. डॉ. गोविंद गारे साहेब खऱ्या अर्थाने आदिवासींचे मसिहा होते. डॉ. गोविंद गारे साहेबांची व माझी ओळख १९८५ साली झाली. तेव्हापासूनच आमची मने जुळली ती कायमचीच. आम्ही नेहमीच विचाराची देवाणघेवाण करायचो. आम्ही अनेक विषयावर चर्चा करायचो. त्यांनी मला नेहमीच मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले. त्यांचा जन्म दिनांक ४ मार्च १९३९ रोजी सह्याद्रीतील निमागिरी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील होय. ते स्वत:ही आदिवासी महादेव कोळी जमातीचे. त्यांचे प्राथमिक शिक्षण जुन्नर मध्ये तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले.

सह्याद्रीच्या डोंगरकुशीत, अतिदुर्गम भागात वास्तव्यास असणाऱ्या डॉ. गारे यांना पुण्यासारखे शहर व शहरी जीवनाची ओळख नव्यानेच होत होती. पुण्यामध्ये आल्यानंतरही गावाकडील मातीशी, अस्तित्वाशी असणारी कास मात्र तुटली नाही. डोंगरदऱ्या खोऱ्यातील निसर्गरम्य परिसर व आदिवासी समाजजीवनाची ओढ त्यांच्या मनात कायम होती. पुण्यामध्ये उच्च शिक्षण घेत असतानाही आदिवासी समाजावरील संशोधन व लिखाण मात्र सुरूच होते. जेष्ठ साहित्यिक ॲड शंकरराव खरात व दैनिक विशाल सह्याद्रीचे संपादक श्री अनंतराव पाटील यांच्या प्रेरणेने व सहकार्याने सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी जमातीच्या जीवनावरील मावळची 'मुशाफिरी' ही उत्कृष्ट लेखमाला दैनिक विशाल सह्याद्रीतून प्रसिद्ध करण्यात आली होती. पुढे हीच लेखमाला पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्यात आली. या लेखमालिकेमध्ये सह्याद्रीतील नाणेघाट, माळशेज घाट, कोकणकडा, आजोबाचा डोंगर, काळसूबाईचे शिखर अशी अनेक निसर्गरम्य पर्यटनस्थळे, डोंगरघाटमाथे, शिवनेरी, रातनगड, पट्टा किल्ला, हरिश्चंद्रगड इ. अनेक गडकिल्ले, दंडकारण्य, आदिवासी महादेव कोळी समाजाचे दैवस्थान भिमाशंकर, अमृतेश्वर, त्र्यंबकेश्वर आणि अष्टभैरवनाथची मंदिरे इत्यादी अनेक पुरातन मंदिरे यांची वर्णने केलेली आहेत. तसेच तेथील समाजजीवनाचे संस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिकदृष्ट्या अनेक बाबींचा उल्लेख केलेला आहे.

पुण्यातील प्रख्यात गोखले अर्थशास्त्र, राज्यशास्त्र संशोधन संस्थेचे संचालक श्री. धनंजय गाडगीळ व डॉ. वि. म. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाने डॉ. गारे यांना पी. एच. डी. करण्याची संधी मिळाली. सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी यांच्या जीवनावर आधारीत " Tribal in an Urban Setting : A Study of Mahadeo Koli " या प्रबंधावर त्यांना विद्यापीठाने पी. एच. डी. प्रदान केली. याच प्रबंधाच्या आधारे मराठीतून "आदिवासी महादेव कोळी" हे पुस्तक लिहिले गेले. या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत (पहिल्या भागात) महादेव कोळी या जमातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक जीवनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. या ग्रंथाला १९७४-७५ सालाचे उत्कृष्ठ मराठी वाङ्मय निर्मितीचे महाराष्ट्र शासनाचे समाजशास्त्र विभागातील पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झालेला आहे. खऱ्या अर्थाने हा ग्रंथ विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या खऱ्या आदिवासी महादेव कोळी समाजाचे संरक्षण करणारा व जीवनदान देणारा ग्रंथ आहे.

राज्य शासनातर्फे राज्यातील व देशातील आदिवासींच्या संदर्भात संशोधनासाठी त्यांना ब्रिटिश कौन्सिलची फिलोशिप मिळाली. त्या आधारे डॉ. गारे यांनी लंडन येथील विद्यापीठात एक वर्षाचे शिक्षण पूर्ण केले. भारतात. परत आल्यावर शासनाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ या संस्थेत संचालक पदी नियुक्ती केली. या पदावर ते १३ वर्षे कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी देशातील आदिवासी जमाती, त्यांच्या जीवन पद्धती, त्यांची संस्कृती, चालीरिती, रूढी परंपरा, देवदेवता, सण-उत्सव, लग्नसंबंध, त्यांचा ऐतिहासीक इतिहास, सांस्कृतिक इतिहास, आदिवासींचे अस्तित्व व अस्मितेची समस्त जगाला ओळख व्हावी, यासाठी राज्य स्तरावर आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय स्थापन केले आणि खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाला सर्व समावेशक

• सोबार गोपाळ वैती चाळ, डॉ. आर. पी. रोड, (जुना) मुलूंड, मुंबई ४०००८० (प), मो. न. ९८२१५६३४६८

जीवन प्रवाहात एक विशिष्ट असे मानाचे स्थान प्राप्त झाले. पुढे या संस्थेच्या माध्यमातून राज्य शासनाला व केंद्र शासनाला आदिवासी समाजविषयी यथायोग्य माहिती व सल्ला देण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले आहे.

आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून डॉ. गारे यांनी शासनाला अनेक मार्गदर्शक योजना सादर केल्या आहेत. आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी आदिवासी दुर्गम भागातील शाळा, आश्रमशाळा वसतीगृहे, बालवाड्या, विकासवाड्या इ. कशाप्रकारे असाव्यात. त्यांना शासनाचे अनुदान कसे असावे आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक आवड निर्माण व्हावी म्हणून कशाप्रकारे शिष्यवृत्त्या दिल्या जाव्यात याबाबत वेळोवेळी अनेक प्रस्ताव सादर केले होते. आणि म्हणुनच आदिवासी क्षेत्रामध्ये अनेक चांगल्याप्रकारे सोयी सुविधा निर्माण झालेल्या आहेत. याबरोबर आदिवासी शेतकरी सहकारी संस्था, आदिवासी आर्थिक विकासाच्या योजना आदिवासी सहकारी सोसायटी, कामगार संघटना, जंगल कामगार संघटना इ. अनेक विकास प्रकल्पांसाठी मार्गदर्शन केले आहे. या सर्वांसाठी विकासाच्या योजना सादर केल्या आहेत. गेल्या २५-३० वर्षामध्ये आदिवासी समाजामध्ये जो शैक्षणिकदृष्ट्या अमुलाग्र व विकासात्मक बदल झालेला दिसून येत आहे तो केवळ डॉ. गारे व वंदनीय मधुकर पिचड यांच्यामुळे झालेला दिसून येतो. या दोन्ही मान्यवरांनी अत्यंत तळमळीने जाणिवपूर्वक आदिवासी समाजासाठी योगदान दिलेले आहे. हे कोणालाही नाकारता येणार नाही. वंदनीय मधुकरराव पिचड यांनी आदिवासी विकास मंत्री असताना आदिवासी समाजासाठी न भुतो न भविष्यती असे उल्लेखनीय काम केले आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने डॉ. गारे साहेबांनी सन १९८८ साली "महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास" हा ग्रंथ संपादित केला होता. या ग्रंथाच्या प्रस्ताविकेत त्यांनी निवेदन केले होते. या ग्रंथामध्ये आदिवासी जीवन संस्कृती व त्यांचे विविध प्रश्न यासंबंधी आदिवासी समाजसेवक व तज्ज्ञ अभ्यासकांचे अभ्यासपूर्ण असे ३३ लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेची स्थापना १ मे १९६२ रोजी केली. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समाजरचना व अर्थव्यवस्था, त्यांची कला, आरोग्य व एकूण जीवनपद्धतीची माहिती मिळवून त्यावर संशोधन करणे हे महत्त्वाचे कार्य आहे. आदिवासी क्षेत्रामध्ये राबविल्या जाणाऱ्या योजनांचे मुल्यांकन, प्रशिक्षण या कार्याबरोबरच "आदिवासी संस्कृती संग्रहालय" सुरू करून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारीही शासनाने संस्थेकडे सुपूर्द केली आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संचालक पदावर असताना आदिवासींच्या नावाने सवलती लाटणाऱ्या बिगर आदिवासी घुसखोरी विरूध्द शासनाला वेळोवेळी अहवाल सादर केले. घुसखोरांची जातीची प्रमाणपत्रे तपासली पाहिजेत हे तपासणीचे काम संस्थेच्या संचालक पदी असे पर्यंत अनेक धोके पत्करून यशस्वीपणे केले. त्यांच्या या उत्कृष्ट प्रशासकीय कामगिरीमुळे महाराष्ट्र शासनाने भारतीय प्रशासन सेवेसाठी (IAS) शिफारस केली. **"आय. ए. एस."** परीक्षेतही ते उत्तीर्ण झाले होते आणि सन १९८७ साली त्यांची भारतीय प्रशासन सेवेत निवड झाली. लंडनमध्ये उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र राज्य आणि केंद्र सरकारच्या सेवेमध्ये अनेक वर्षे सेवा केली. महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास विभागाचे आयुक्त म्हणून ते सेवानिवृत्त झाले.

आदिवासी हा या देशाचा मुळ मालक, प्रथम नागरिक होय. या देशात आदिवासींची अनेक राज्ये होती. संस्थाने होती. आजही त्याबाबत अनेक पुरावे उपलब्ध आहेत. त्या त्या आदिवासी जमातींच्या नावाने आजही काही भागांना ओळखले जाते. इतकेच नव्हेतर भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजातील शेकडो क्रांतीवीरांचे अनमोल सहकार्य लाभले आहे. बिरसा मुंडा (सन १५ नोव्हेंबर १८७५ ते ९ जुन १९००) सातपुड्यातील तंट्या भिल्ल, सह्याद्रीतील महादेव कोळी समाजातील क्रांतिवीर राघोजी भांगरे खंडू साबळे, नाना बेंडकोळी (फरारी) (१८३३ ते १८४८) चिरनेरच्या जंगलातील नागू महादू कातकरी, इ. अशी शेकडो क्रांतिवीरांची नावे घेता येतील. परंतु हे सर्व क्रांतीवीर प्रसिद्धीपासून दूर राहिले. त्यांच्या क्रांतीकारक उठावांचा, बंडाचा प्रेरणादायी इतिहास अभिजनवाद्यांनी जाणीवपूर्वक समाजासमोर मांडला नाही. अशा या क्रांतीकारकांच्या बलिदानाचा, स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाचा, संग्रामाचा, ब्रिटिशांच्या विरूद्धचा, जनसामान्यांना सावकार शाहीने लुबाडणाऱ्या सावकारांच्या, विरोधातील विद्रोहांचा-संग्रामाचा, चळवळींचा ऐतिहासिक इतिहास (तसेच बिरसा मुंडाचे उलसुलाना, वीर बाबूरावांचे हौतात्म्य, राणी दुर्गावतीचे रणकौशल्य, शंकरशहा, रघुनाथ शहांचे वीर मरण, उमाजी नाईक, भागोजी नाईक, उमेड वसावा, या नरवीरांचे क्रांतीसत्र सिधू-कान्हू या संथाल बंधूचा जीवन संघर्ष व प्रबोधन पर्व आणि संतश्रेष्ठ श्री गुलाब महाराज, प. पू. रघुनाथ व नुंगसाजी महाराज यांचा आदिवासी जनजागर अशा अनेकांच्या ऐतिहासिक घटनांचा दस्तावेज) डॉ. गोविंद गारे यांनी त्यांच्या "आदिवासी वीरपुरुष" व "भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतीकारक" या दोन ग्रंथातून मांडला आहे.

**आदिवासी जीवनातील ऐतिहासीक परिवर्तन :-**

भारतीय राज्य घटनेमध्ये अनुसूचित जाती/जमातींच्या यादीत महाराष्ट्रातील एकूण ४७ आदिवासी जमातींना समाविष्ट केलेले आहे. या जमातींना केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार केंद्र शासनाप्रमाणेच राज्य शासनाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय स्तरावरील सवलती दिल्या जातात. परंतु आदिवासी जमातींच्या नामसाधर्म्याचा गैर फायदा घेत राज्यातील काही बिगर आदिवासी जातीवरील सर्व स्तरावरील आरक्षणातील सवलती लाटत आहेत, उपभोगीत आहेत, यामुळे खऱ्या आदिवासींना सवलतींपासून वंचित व्हावे लागते. पुन्हा याच बिगर आदिवासी जाती **"आम्हीच खरे आदिवासी आहोत"** म्हणून ओरड

करित आहेत आणि म्हणूनच राज्यातील खरे आदिवासी कोणते ? खोटे आदिवासी कोणते ? आदिवासींच्या नामसाधर्म्याने समान भासणाऱ्या जाती कोणत्या ? इत्यादी बाबतची यथायोग्य माहिती डॉ. गारे यांनी शासनाला उपलब्ध करून दिली.

राज्याच्या विधानसभेत तत्कालीन आदिवासी विकास मंत्री वंदनीय मधुकरराव पिचड साहेब यांच्या प्रयत्नांनी आदिवासींच्या सवलती लाटणाऱ्या बिगर आदिवासींच्या विरोधात, बनावट आदिवासी जाती प्रमाणपत्रांना प्रतिबंध करणारा कायदा संमत करण्यात आला. या कायद्याच्या निर्मितीमध्ये राज्यातील सर्व आदिवासी आमदार, लोकप्रतिनिधी व विरोधी पक्षनेते या सर्वांनी वंदनीय पिचड साहेबांना मोलाचे सहकार्य केले. शासकीय स्तरावर अनेक बैठका झाल्या होत्या, अनेक चर्चासत्रे झाली होती. या सर्व घटनांमध्ये एक जाणते, अभ्यासू, मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून मा. डॉ. गारे साहेबांचे मोलाचे सहकार्य योगदान होते. राज्याच्या विधानसभेत बनावट जाती प्रमाणपत्र प्रतिबंधक कायदा (क्रमांक २३/२००१) एकमताने संमत झाला. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील समस्त आदिवासी समाजाची बुज राखण्याचे काम आणि राज्यातील खऱ्या आदिवासींना जीवनदान देण्याचे, त्यांच्या जीवनात नव संजीवनी निर्माण करण्याचे काम वंदनीय मधुकरराव पिचड साहेब व डॉ. गोविंद गारे साहेब या मान्यवरांनी केले आहे. आदिवासी समाजावर त्यांनी केलेले हे ऋण कोणालाही फेडता येणार नाहीत.

महाराष्ट्र "बनावट जाती जमाती प्रतिबंधक कायदा क्र. २३/२००१" निर्माण झाला आणि संपूर्ण राज्यात व आदिवासी समाजात आनंदाची, चैतन्याची लहर उठली. प्रत्येक जिल्ह्यामधून वंदनीय पिचड साहेब व डॉ. गोविंद गारे साहेब यांचे सत्कार होत होते. त्यांना धन्यवाद दिले जात होते. आपल्या महादेव कोळी समाजातील या दोन जेष्ठ व श्रेष्ठ मान्यवरांचा आपणही सामाजिक स्तरावर सन्मान करावा, सत्कार करावा. ही माझी मनोमन प्रबळ इच्छा होती डॉ. गारे साहेबांकडे मी तशी इच्छा व्यक्त केली, त्यांनी ताबडतोब हो म्हटले आणि एके दिवशी त्यांच्यासह "आपला सत्कार सोहळा आयोजित करायचा आहे." म्हणून वंदनीय पिचड साहेबांकडे विचारणा केली. वंदनीय पिचड साहेबांनीही त्वरीत होकार दिला व ते डॉ. गारे साहेबांना म्हणाले डॉ. गारे साहेब, आपल्या "सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी" या ग्रंथाचे प्रकाशनही याच कार्यक्रमात करू खरेतर ही माझ्या आयुष्यातील अत्युच्च आनंदाची बाब होती. आपल्या समाजातील या दोन्ही मान्यवरांचा सत्कार, सन्मान करणे व "सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी" या ग्रंथाचे प्रकाशन होणे हा दुग्धशर्करा योग होतो. हा सत्कार-सन्मानाचा सोहळा कार्यक्रम मी व माझे स्नेही श्री. कुंडलिक वाळेकर, सुनिल भांगरे, प्रभाकर ठोंगिरे इ. शेकडो माझ्या सहकारी मित्रांनी दिनांक २९ मार्च २००३ रोजी आचार्य अत्रे नाट्यगृह, कल्याण येथे संपन्न केला.

इ. स. २ मे १८४८ रोजी आदिवासी क्रांतिवीर राघोजी भांगरे (भांगरा) यांना ब्रिटीश सरकारने ठाणे मध्यवर्ती कारागृहामध्ये फासी दिली होती. या घटनेला १९९८ साली १५० वर्षे झाली. त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यासाठी दिनांक २ मे १९९८ रोजी श्रमजीवी संघटना आणि हुतात्मा क्रांतीवीर राघोजी भांगरा स्मृती महोत्सव समिती व महाराष्ट्र महादेव कोळी आदिवासी समाज संघटना, राजूर, ता. अकोले यांच्या संयुक्त विद्यामाने ठाणे शहरामध्ये विशाल मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच हुतात्मा राघोजी भांगरा यांना ठाणे मध्यवर्ती कारागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली होती. क्रांतीवीर राघोजी भांगरे यांचे ठाणे मध्यवर्ती कारागृहातील हुतात्मा स्मारकावर नाव लिहिले जावे व त्यांचे उचित स्मारक व्हावे अशी शासनाकडे मागणी करण्यात आली होती. या कार्यक्रमाला तत्कालीन आदिवासी विकास मंत्री वंदनीय मधुकरराव पिचड, आदिवासी संशोधक व लेखक डॉ. गारे, विवेक पंडीत, श्रीमती. विद्युल्लता पंडित, संघटनेचे अध्यक्ष, रा. वि. भुस्कुटे तथा हजारो सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक आदिवासी क्रांतीवीर राघोजी भांगरे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातून ब्रिटिश सरकारच्या जुलूमशाही विरोधात व आदिवासी गोरगरीबांना सावकारशाहीने नडणाऱ्या सावकारांच्या विरोधात क्रांतीकारक उठाव करीत होते. सन १८३३ ते १८४८ या कालावधीत अहमदनगर, नाशिक, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांनी अनेक उठाव केले. त्यांच्या उठावांची नोंद अहमदनगर, नाशिक , ठाणे, पुणे येथील ब्रिटिश गॅझेटिअर्स मधून करण्यात आलेली आहे. अशा या आद्य क्रांतीवीराला ठाणे मध्यवर्ती कारागृहात फाशी दिले असताना, कारागृहातील हुतात्मा फलकावर त्यांच्या नावाचा अद्यापही उल्लेख करण्यात आलेला नाही, ही खेदाची बाब आहे. याबाबत डॉ. गारे आणि मी नेहमीच चर्चा करीत असे. राघोजीचे तैलचित्र कारागृहात लावले जावे यासाठी मी नेहमीच त्यांच्याकडे आग्रहाची भुमिका मांडीत असे. आपल्या या क्रांतीवीराचे तैलचित्र व उचित स्मारक व्हावे म्हणून त्यांनाही मनापासून वाटत असे. ठाण्यातील सन १९९८ नंतरच्या मिरवणूकी नंतर प्रत्येक वर्षी आम्ही ठाणे कारागृहात राघोजींना अभिवादन करण्यासाठी जात आहोत. क्रांतीवीर राघोजी भांगरे कसे होते, त्यांचा पेहराव कसा होता, त्यांची शरीरयष्टी कशी होती, त्यांचे वागण-बोलण कसे होते, त्यांची देहबोली कशी होती, त्यांची कार्यशैली कशी होती इत्यादी अशा सर्व ऐतिहासिक बाबींचा त्यांच्याशी विचारविनिमय करीत होतो. या बाबींमुळे राघोजींचे तैलचित्र बनविण्यास मदत झाली. त्यानुसार त्यांनी पुण्यामध्ये त्यांचे तैलचित्र बनवून घेतले होते.

प्रतिवर्षी प्रमाणे २ मे २००५ रोजी राघोजी भांगरे यांना ठाणे मध्यवर्ती कारागृहात आदरांजलीचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाला श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र महादेव कोळी आदिवासी संघटना, राजूर आणि इत्यादी अनेक आदिवासी संघटनांचे शेकडो कार्यकर्ते व अनेक लोकप्रतिनिधी हजर होते. पुण्याहून येताना डॉ. गारे यांनी राघोजींचे तैलचित्र बरोबर आणले होते.

कारागृहात आमची भेट झाली तेव्हा मला म्हणाले "बघ लक्ष्मण तुला नेहमी वाटायचे तेच मी आज केले आहे. क्रांतीवीर राघोजींचे तैलचित्र आज आपण या कारागृहात भेट देत आहोत" आपल्या समाजातील आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे यांचे तैलचित्र आदिवासी संशोधक व लेखक साहित्यिक डॉ. गोविंद गारे साहेब यांच्या शुभहस्ते शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थित ठाणे मध्यवर्ती कारागृहास त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त भेट देण्यात आले कारागृहाचे अधिक्षक श्री. एस. एन. चव्हाण साहेब यांनी त्यांचा स्विकार केला. समस्त आदिवासी समाजाला सार्थ अभिमान वाटावा अशीच ही ऐतिहासीक घटना आहे. या घटनेचे आम्ही साक्षीदार आहोत याचा आम्हालाही अभिमान वाटतो. खऱ्या अर्थाने या क्रांतीवीराला समाजासमोर, समस्त जगासमोर आणण्याचे महान कार्य डॉ. गारे आणि मधुकरराव पिचड साहेब यांनी केले आहे.

क्रांतीवीर राघोजी भांगरा (भांगरे) यांचे ठाणे मध्यवर्ती कारागृहात हुतात्मा स्मारक व्हावे व त्या स्मारकावर त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात यावा म्हणून १९९८ पासून मी स्वत: महाराष्ट्र महादेव कोळी आदिवासी समाज संघ यांच्यावतीने सातत्याने शासनाकडे तसेच ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे व कारागृह महानिरिक्षक (महाराष्ट्र) पुणे यांचेकडे वेळोवेळी पत्र व्यवहार करून मागणी करीत होतो. आपल्या या न्याय मागणीला आता मुर्तस्वरूप प्राप्त झाले आहे. शासनाने (त्यास सन २००७ मध्ये दिनांक १ मार्च २००७ रोजी मा. ना. आर. आर. पाटील साहेब, गृहमंत्री महाराष्ट्र) यांनी राज्याच्या विधानपरिषदेमध्ये मान्यता दिली आहे. ठाणे कारागृहामध्ये आता नुतन हुतात्मा स्मारक उभारले जात आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्या ज्या क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. अशा क्रांतीकारकांची नावे या नूतन हुतात्मा स्मारकावर लिहिली जाणार आहेत. तसेच त्यांच्या कार्याचा संक्षिप्त इतिहासही लिहिला जाणार आहे. क्रांतीवीर राघोजी भांगरे यांचे ही नाव लिहिले जाणार आहे. ही घटना म्हणजे आदिवासी समाजाचा स्वाभिमान जागविणारी घटना आहे. या भारत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिली जाणारी एक ऐतिहासिक क्रांतीकारक घटना ठरली आहे.

❖❖❖

# "शैक्षणिक प्रवाहात आल्याशिवाय आदिवासींचा सर्वांगीण विकास शक्य नाही."

• ए. बी. मरसकोले, भंडारा

भारतातून ब्रिटीशांना जावून ६६ वर्षाचा काळ लोटला आहे. भारत देशाने आपली स्वतंत्र राज्य घटना स्विकारून लोकशाही राज्य पध्दती सुरू केली आहे. राज्यघटनेत समता, स्वातंत्र्य बंधुभाव व न्याय या तत्वाचा अंतर्भाव करून सर्वांना समान संधीची व न्यायाची ग्वाही देण्यात आलेली आहे. परंतु आजही प्रत्यक्षात लोकशाही व्यवस्थेमध्ये भारतीय घटनेतील पायाभूत कायदे, नियम व तरतुदी यांची अंमलबजावणी तसेच नागरिकांचे हक्क व अधिकार प्राप्त होत नसल्यामुळे देशातील अनेक समाज घटकांना स्वातंत्र्याचा लाभ जीवन जगत असताना होत नाही. त्यामुळे मागासवर्गीयांचे जीवन असुरक्षित व गुलामगिरीचे असल्याचे स्पष्ट झाले असून ते आपण मान्य केले पाहिजे.

आजही या देशाचे खरे वारस मुळनिवासी आदिवासी समाज विकासापासून कोसो दुर आहेत. आदिवासी समाजाचे वास्तव या ठिकाणी विशद करणे आवश्यक आहे. आर्य या देशात येण्यापूर्वी आदिवासी समाज या देशात सुसंपन्नतेचे जीवन जगत होते. आर्य व इतर परकीय आक्रमणांपासून आपला जीव वाचविण्यासाठी जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला व कायमचे प्रगत समाजापासून दूर राहीला. त्यामुळे शेकडो वर्षे अज्ञानी व निरक्षर राहिले व प्रगती केलेली नाही. मुळनिवासी ही ओळख पुसून टाकण्यासाठी वनवासी ही कृत्रिम ओळख जंगली ह्या तिरस्कारणीय अर्थाने चिकटवली जात आहे व त्याच्यात हिन भावना पैदा करून त्यांचे अस्तित्व संपविण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे. वास्तविक पाहता आदिवासी बांधव हे निसर्ग पूजक आहेत. परंतु प्रस्थापित व्यवस्थेने/ब्राम्हणवाद्यांनी त्यांना देव-देविकांच्या जाळ्यात अडकविण्याचे षडयंत्र रचले आहे. आदिवासींनी त्यांचे गौरवपूर्ण, सभ्यता, परंपरा, रितीरिवाज, सण-उत्सव, लोककथा, लोकनृत्य गोटुलांच्या माध्यमातून आजही जोपासलेले आहे.

या देशात आदिवासींची लोकसंख्या सरासरी ९ टक्के असून झारखंड, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, लक्षद्विप, मिझोरम, नागालँड व मेघालय या ठिकाणी सर्वात जास्त आदिवासींची संख्या आहे.

महाराष्ट्रामध्ये आजच्या स्थितीत ४५ प्रमुख आदिवासी जमाती आहेत. यामध्ये गोंड, पारधी, कोरकू, वारली, कोलाम, कातकरी, भिल्ल या प्रमुख आदिवासी जमाती व २२४ उपजमाती आहेत.

भारतीय संविधानात आदिवासींना अनुसुचित जमाती (Scheduled tribes) असे संबोधले आहे. डॉ. रिव्हर्स यांच्या मते आदिवासी जमात हा एक सरळ साधा व प्रामाणिक सामाजिक समुह आहे. अशा साधा व सरळ आदिवासी समाज दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा, आर्थिक मागासलेपणाच्या गर्तेत अडकलेला दिसतो.

आदिवासी समाज अनेक ज्वलंत समस्यांनी ग्रासलेला आहे. काही ठळक समस्या सांगावयाच्या झाल्या तर आदिवासीं जवळ असलेल्या जमिनीचे क्षेत्र अत्यंत लहान आहे. त्यामुळे परिवाराचे पालन पोषण होईल एवढे उत्पादन त्याला शेतीमधून होत नाही. त्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडते. पावसाळ्याच्या कालावधीत हाताला काम मिळत नसल्याने परिवाराचे योग्य प्रकारे उदर निर्वाह करता येत नाही. त्यामुळे बहुसंख्य आदिवासींना कंदमुळांवर उदर निर्वाह करावा लागतो. काही आदिवासी अर्ध उपासमार करून जीवन जगतात. त्यामुळे कुपोषण व रोगराईचे प्रमाण वाढते. याशिवाय आदिवासींना वास्तव्याच्या ठिकाणी वेळोवेळी काम मिळत नसल्यामुळे कामाच्या शोधासाठी दुसरीकडे कुटुंबासह स्थलांतर करावे लागते. त्यामुळे जीवन अस्थिर बनते व मुला-मुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अशाप्रकारे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजनितीक क्षेत्रात अनेक समस्यांनी आदिवासी त्रस्त झाला असून गुलामगिरीचे जीवन जगत आहे. आदिवासी व बहुजन समाजाच्या गुलामगिरी व सर्व समस्याचे मुळ हे अज्ञानात आहे. हे महात्मा ज्योतीबा फुले यांच्या लक्षात आल्यानंतर सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाची सुरूवात स्वत:च्या घरापासून केली व समस्यांचे निराकरण करताना त्यांनी पुढीलप्रमाणे काव्यपंक्ती सांगितल्या आहेत.

• प्रगती कॉलनी भंडारा, जि. भंडारा.

विद्येविना मती गेली
मती विना गती गेली
गतीविना नीती गेली
नितीविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

म्हणून आदिवासी बांधवांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला महामंत्र शिका संघटित व्हा व संघर्ष करा. आत्मसात करून समाजामध्ये जनजागृती, समाजप्रबोधन, लोकशिक्षण निष्ठेने करणे अगत्याचे आहे. आपले शोषक कोण व मित्र कोण ह्याची पारख करून कामाला सुरूवात करावी. यासाठी आदिवासींनी शिक्षणाची कास धरणे महत्वाचे आहे. कारण शिक्षणाशिवाय जागृती होत नाही व जागृतीशिवाय संघर्ष टाळता येत नाही. त्याचबरोबर रुढी, परंपरा, धार्मिक अंधश्रध्दा आणि विविध मादक पदार्थाचे व्यसन यापासून आपली मुक्ती करून नविन पिढी उभारण्याच्या कामी तन-मन-धनाने सहकार्य करावे व 'व्यवस्था, परिवर्तन' करणे काळाची गरज आहे हा मुख्य उद्देशाच्या पुर्ततेसाठी आदिवासी बांधवांनी शैक्षणिक प्रवाहात येऊन आदिवासींचा सर्वांगीण विकास करावे, हेच विनम्र अभिवादन !

❖❖❖

# अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ अन्वये वनहक्क दाव्यांच्या मोजणीबाबत.

• श्री. दिलीप अर्जुन

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी जे तीन पिढ्यांपासून वनात राहतात आणि त्यांच्या उपजिवीका वनापासून मिळणाऱ्या वनसंपत्तीवर व वनातील जमिनीवर अवलंबून आहेत. वनात वस्ती करून राहतात अशा आदिवासींना निरंतर वावर करणेसाठी केंद्र सरकारने अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ हा काश्मिर वगळून संपूर्ण भारतात लागू केला आहे.

या अधिनियमान्वये वननिवासी अनुसूचित जमातींना वनभूमी व त्यांची वस्तीस्थाने १३ डिसेंबर २००५ पूर्वी कसत आहे व तीन पिढ्या वस्ती केली आहे व स्वत:च्या उपजिवीकेकरिता जमीन करत आहे. अशा फिरते आदिवासींना पट्टे नियमित करून त्यांचे नावे नोंद करणेची तरतूद केली आहे.

या अधिनियमात स्थानिकपातळीवर ग्रामसभा समिती प्राधिकरण ठरविणेत आलेले आहे. सदर समितीने संबंधित आदिवासी यांचेकडून दावे प्राप्त करून ते एकत्रीत करणे, त्याची पडताळणी करून आणि हक्काच्या वापर करीत असलेल्या क्षेत्राचा नकाशा तयार करून शिफारशीचा ठराव संमत करून त्याची प्रत उपविभागस्तरीय समितीकडे पाठवितात. ग्रामसभेने सहमत केलेले निर्णय तपासणीसाठी उपविभागीयस्तरीय समिती गठीत केलेली आहे. ग्रामसभेचे निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही आदिवासीधारकास उपविभागीय समितीकडे ६० दिवसात विनंती अर्ज करता येईल. त्या विनंती अर्जाचा विचार करून तो निकालात काढून ही समिती वनहक्काचे अभिलेख तयार करून अंतिम निर्णयासाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठवितात. उपविभागीय समितीचे निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस विनंती अर्ज करणेची संधी या अधिनियमात असून त्याचा कालावधी ६० दिवसांचा आहे. सदरचा अर्ज जिल्हास्तरीय समितीकडे केल्यानंतर त्या विनंती अर्जाचा विचार करून निकालात काढून अंतिम निर्णय देतील. जिल्हास्तरीय समितीने दिलेले निर्णय अंतिम व बंधनकारक असतील.

वरील प्रक्रियेवर संनियत्रण करणेकरिता व नोडल एजन्सीने मागणी केलेस अशी विवरणे व अहवाल सादर करणेकरिता राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठीत केलेली आहे. सदर समितीवर राज्य शासनाचा महसूल व वन विभाग, आदिवासी विभागाचे अधिकारी व त्यांच्यास्तरावरील पंचायती राज्य संस्थांनी योग्य स्तरावर नेमलेले ३ सदस्य यांचा समावेश केलेला आहे. त्यापैकी २ सदस्य अनुसूचित जमातींपैकी व एक महिला अशी गठीत केलेली आहे. या सर्वांचा समन्वय साधणेसाठी नोडल एजन्सीची स्थापना नाशिक येथे करून आयुक्ताची नियुक्ती केलेली आहे.

जिल्हास्तरीय समितीकडून मंजूर झालेले दावे भूमिअभिलेख विभागाकडे मोजणीसाठी प्राप्त होतात. या विभागाकडे माहे जून २०१२ अखेर ९६,७७५ वनहक्क दाव्यांची प्रकरणे मोजणीसाठी प्राप्त झालेली होती. त्यापैकी ३३,६४८ प्रकरणांमध्ये मोजणीची कार्यवाही करणेत आलेली होती व ६३,१२७ प्रकरणे प्रलंबित होती. राज्यस्तरीय संनियंत्रण समितीची १० व्या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिवांनी माहे डिसेंबर २०१२ अखेर प्रलंबित वनहक्क दाव्यांची प्रकरणात मोजणी करून निकाली करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाकडून नियोजित कालबद्ध कार्यक्रम तयार करणेत आलेला आहे. कालबद्ध कार्यक्रमानुसार मोजणी प्रकरणांचा निपटारा करणेसाठी भूकरमापांव्यतिरिक्त लिपिक संवर्गातील कर्मचारी व ज्या जिल्ह्यात वनहक्क दाव्यांची कामे प्राप्त नाहीत त्या जिल्ह्यातील कर्मचारी ज्या जिल्ह्यात वनहक्क दाव्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत त्या जिल्ह्यात वर्ग करणेत आलेली आहे. अशा प्रकारे राज्यातील ३२४ कर्मचाऱ्यांच्या सेवा वनहक्क दाव्यांच्या मोजणीसाठी वापरणेत येऊन माहे डिसेंबर २०१२ अखेर ५५,४८६ प्रकरणे निकाली करणेत आलेली आहेत. माहे जुलै २०१२ ते ऑक्टोबर, २०१२ अखेर राज्यात नैसर्गिक अडचणी, पाऊस पडल्याने, खाचरामध्ये पाणी साठलेने भातशेती, जंगलात प्रचंड गवत वाढलेने गवत झाडी-झुडपामध्ये वावरत असलेले वन्य प्राणी सरपटणारे विषारी सापांपासून मोजणी पथकातील कर्मचाऱ्यांच्या जिवितास धोका आहे या बाबींचा विचार करून ग्रामपातळीवर वनहक्क समितीचे अध्यक्ष, सचिव व हितसंबंधित पट्टेदार यांनी माहे डिसेंबर २०१२, नंतर मोजणीची कार्यवाही करावी अशी विनंती केलेली आहे. या सर्व अडचणीमुळे माहे डिसेंबर, २०१२ अखेर आखणेत आलेल्या कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे मोजणीची कामे पार पाडता आली नाही. ही बाब राज्यस्तरीय संनियंत्रण समितीने १२ व्या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिवांचे निदर्शनास आणून दिलेनंतर त्यांनी माहे जून, २०१३

• कार्यालय अधीक्षक,
भूमापन-३, जमाबंदी आयुक्त कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, पुणे - ४११ ००१.

अखेर मुदतवाढ देण्यात आली. त्याचप्रमाणे सुधारित मोजणी कार्यक्रम तयार करणेत आलेला आहे. माहे फेब्रुवारी, २०१३ अखेर एकूण १,१६,२५७ प्रकरणे मोजणीसाठी या विभागाकडे आलेली असून त्यापैकी ७०,३१४ प्रकरणात मोजणी करणेत आलेली आहे व माहे फेब्रुवारी, २०१३ अखेर ४६,०२८ प्रकरणे शिल्लक आहेत. म्हणजेच माहे फेब्रुवारी, २०१३ अखेर ६० टक्के काम पूर्ण करणेत आलेले आहे.

वनहक्क दाव्यांची मोजणी करून प्रकरणे जिल्हास्तरीय समितीकडे पाठविल्यानंतर अंतिम आदेश पारित केलेनंतर अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक अनुसूचित लोकांना वाटप केलेल्या जमिनींच्या नोंदी घेताना अनुसरावयाची कार्यपद्धतीबाबत शासनाकडून परिपत्रक काढलेले आहे. त्यामध्ये ७/१२ मध्ये नोंदी कशा कराव्यात याचे मार्गदर्शन करणेत आलेले आहे. परंतु वनहक्क अधिनियमांतर्गत वनहक्क प्रदान करणेत आलेल्या काही प्रकरणात असर्व्हेक्षित वन कम्पार्टमेंट च्या नोंदी, गाव नंबर, ७/१२ मध्ये नाहीत किंवा वनग्रामे, जुनी वसाहत, भूमापन न झालेली गावे व अन्य गावे शेजारी महसुली गावे म्हणून अभिलेखातील अधिसूचित न केलेल्या गावातील वाटप केलेल्या पट्टयाच्या नोंदी कशा कराव्यात. कोणती कार्यपध्दती अनुसरावी याबाबत अनेक जिल्हाधिकारी यांनी राज्य संनियंत्रण समितीचे आढावा बैठकीमध्ये प्रश्न उपस्थित केलेनंतर याबाबत या विभागाने उपाययोजना सूचविणेबाबत ११ व्या बैटकीमध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या विभागातील वन विभागातील अधिकाऱ्यांची कमिटी नेमण्यात येऊन त्यांचे शिफारशीनुसार शासनाकडे अहवाल दिनांक ५ जानेवारी २०१३ रोजी सादर केलेला आहे. सदरचा अहवाल शासनाचे विचाराधीन आहे. सदर शिफारशीमध्ये वनसंरक्षक कार्यालयाने कम्पार्टमेंट फॉर्म नं. १ पट्टेदार रजिस्टर संधारण करावे. दोन्ही अभिलेख, भूमि अभिलेख विभागाने मोजणीची एक प्रत उपवनसंरक्षक कार्यालयाकडे पाठवावी. उपवनसंरक्षक यांनी मोजणी नकाशा व मंजूर दाव्यानुसार कम्पार्टमेंट फॉर्म नं. १ नुसार वनहक्कधारक नोंदवही संधारण करावी, तदनंतरच परिशिष्ट एक प्रमाणे वनहक्कधारक पत्रकामधील सदर नोंदवहीमधून वनहक्कधारक पत्रक परिशिष्ट (२) भरावे. वनहक्कधारक पत्रक हे अधिकार अभिलेख समजण्यात यावे. लाभार्थ्यांच्या मृत्यूनंतर वारसांचा किंवा इतर बाबतीत बोजाच्या नोंदी वनहक्कधारक पत्रकाच्या पाठीमागील पानावरील फेरफार नोंदवहीमध्ये नोंदी घ्याव्यात.

उपरोक्त नोंदीवर प्रथम अपिल सहायक वनसंरक्षक यांचे व द्वितीय अपिल वनसंरक्षक यांचेकडे करता येईल. त्याचप्रमाणे फेर तपासणीचे अधिकार शासनाच्या वन विभागाकडे राहतील.

या विभागाकडे मोजणीसाठी वाढती आवक, अपुरा कर्मचारी वर्ग यांचा विचार करून वनहक्क दाव्यांचे मोजणी प्रकरणांची मोजणी करणेसाठी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करणेचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक १९ जुलै २०१२ रोजी सादर केलेला होता. त्याअनुषंगाने शासनाकडील पत्र क्रमांक संकीर्ण/२०१२/प्र.क्र./४२७/ल-१, दिनांक १५ जानेवारी २०१३ रोजीमान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार परवानाधारक भूमापकाची नियुक्ती करणेची कार्यवाही प्रगतीत आहे. वनहक्क दावे परवानाधारक भूमापकाकडून मोजणी करून घेणेबाबतची कार्यपद्धतीबाबतचे परिपत्रक क्रमांक भूमापन-३/वि.नों.क्र. १०/२०१३, दिनांक १ फेब्रुवारी २०१३ ने पारित केलेले आहे. परवानाधारक भूमापकाची तत्काळ नियुक्ती करून वनहक्क दाव्यांची मोजणी प्रकरणी सुधारित कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे माहे जून २०१३ अखेर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणेचा या विभागाचा संकल्प आहे.

❖❖❖

# आदिवासींची धार्मिक श्रध्दा आणि विधी : डोंगरदेवी.

• पद्माकर एन. सहारे

आदिवासींच्या धर्मांचे स्वरूप हे हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन इतर परिचित धर्मापेक्षा वेगळे आहे हे सांगावयास नकोच. धर्म ही एक आचरण वा वर्तन करण्याची पद्धती आहे. धर्म ही वस्तू वा घटनासंबंधी विश्वास आणि कर्मकांडाची (विधी) एक व्यवस्था असते. निसर्गक्रमामध्ये वेगवेगळ्या स्वरूपात प्रगट होणाऱ्या निसर्ग शक्तीची प्रतीके म्हणून अलौकिक शक्ती (ज्याचा लौकिक माहीत नाही असे) वा देवतास्वरूप मानणे व त्यांच्याविषयी भितीयुक्त आदर बाळगणे हे आदिवासींच्या धर्मांचे वैशिष्ट्ये आहे.

मानव हा विश्वातील प्रत्येक घटनेला वा तत्त्वाला त्याच्या बुध्दी क्षमतेतून आकलन करण्याचा प्रयत्न करतो; परंतु जेव्हा-जेव्हा विश्वातील घटनेला समजण्याची मानवी बुद्धी वा प्रयत्न अपुरा ठरतो, तेव्हा तो श्रेष्ठ शक्तीप्रती शरणागती पत्करतो आणि त्या शक्तीप्रती भितीयुक्त आदर बाळगून त्याची बाधा होऊ नये म्हणून त्याला प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच ज्या निसर्ग शक्तीचे स्वरूप मानवास अनाकलनीय ठरते वा त्याच्या परिणामावर नियंत्रण ठेवता येणे शक्य नसते अशा अनाकलनीय शक्तींनाच देवत्त्व स्वरूप प्राप्त होते.

आदिवासींना सूर्य, चंद्र, पृथ्वी, अग्नि, पवन (वायू), ढगेसर (ढग), वीजेसर (वीज), वादळ व दर्या ह्या नैसर्गिक शक्ती वा घटना दैवी वाटतात. कोकणा ही जमात शेती करणारी असून, पाणी (पाऊस) देणारा वा शेत पिकविणारा देव हा त्यांच्या मते श्रेष्ठ देव आहे त्याला पाणदेव (कणसरा देव ज्या मुर्तीच्या हातामध्ये कमंडलू असते) म्हणतात आणि ज्या मुर्तीच्या हातामध्ये धान्याचे कणीस असते अशी स्त्रीदेवता कणसरी म्हणून ओळखली जाते. पवनदेव (वारा), ढगेसर (ढग), विजेसर (वीज), सुऱ्या देव (सूर्य), चांद (चंद्र) व वादळ या नैसर्गिक घटना त्यांच्या गीतातून अनेक वेळा येतात. त्यांनी धान्य देणारी धरतरी (धरतीमाता), जीवन जगविणारी कणसरी (धान्य) आणि शेताच्या कामी उपयोगी पडणारी गावतरी (गाय) या तीन देवता पवित्र मानल्या आहेत. ह्या तीनही देवतांत स्त्रीचा (देवी) अंतर्भाव असल्याचे मानतात. 'आयच्यान', 'गायच्यान' (धरती मातेची किंवा गाईची आन् म्हणजे आण/शपथ) ही शपथ घेतल्यावर कोकणा, वारली व महादेव कोळी ती सहसा मोडत नाही. हातात कणसरी घेऊन तो दिलेला शब्द मोडत नाही. जोपर्यंत धान्यसंबंधीचा धार्मिक विधी होत नाही, तोपर्यंत नवीन धान्य घरात आणत नाही व खाल्ले जात नाही. धान्याचा कधीही पाय लावून अनादर करीत नाही. अन्नाचा प्रत्येक कण धन-संपत्ती असल्याने शिजवलेले शिळे अन्नही इतरत्र फेकत नाहीत. धान्यातून अन्न मिळते व जगणे अन्नावर अवलंबून असते. मानवी जीवनास आवश्यक असलेले अन्न व वनस्पती धरतीमातेतूनच निर्माण होते म्हणून धरतीला अधिक महत्त्व देतात. असा एकही विधी नाही की ज्यात नाचणी व भाताचा (तांदूळ) समावेश नसतो. कोकणांना धान्यांबद्दल आदर असून ते धान्याला देवता मानतात. कोकणा जमातीला महादेव कोळी, वारली, कातकरी हे कुणबी मानतात. त्याचे कारण कोकणांनी प्रथमत: नाचणी हे धान्य विकसित केल्यामुळे फळे-कंदमुळे खाणाऱ्या इतर आदिवासींसाठी कायम उदरनिर्वाहाचे अन्न बनले. कोणत्याही जमीन प्रकारात डोंगर-उतारावर कमी-अधिक प्रमाणात पण हमखास येणारे रोगविरहित व किडविरहित असे पौष्टिक अन्न म्हणून आदिवासी या धान्याला देवता समजतात. तीच धान्याची देवता कणसरी ही आहे. ज्याचे स्थान घरातील धान्याच्या कोठीवर असते. संस्कृत भाषेतील कण म्हणजे धान्य/बी व सरी म्हणजे सर/हार (धान्याची लोंब/कणीस) यावरून 'कणसरी' हा शब्द तयार झाला असावा. धान्याचा कण/बी वा कुणबी अर्थात धान्य पिकविणारे म्हणून कुणबी असे म्हणतात. त्यामुळे कोकणांना इतर जमातींमध्ये महत्त्व आहे. चांदी किंवा पांढऱ्या धातूच्या पत्र्यावर देवीची आकृती काढून आणखी दोन-तीन मूर्ती (धनसरी, महालक्ष्मी) बांबूच्या करंडीत वा मातीच्या देव्हाऱ्यात नाचणीचे धान्य घालून ठेवतात. मूर्तीवर एक खारवा (लाल कपडा) झाकून, ही अन्नधान्य देवता समजून दरवर्षी चैत्र-वैशाखामध्ये या देवीची भगताकरवी पूजा करतात.

भगत आपल्या अंगात शक्ती यावी म्हणून सूर्य, चंद्र देवतांना, त्यानंतर वाकून धरतीमातेला नमन करतो. सूर्य व चंद्र प्रकाश देतात म्हणून पूजनीय आहेत. शेतात धान्य पेरण्यापूर्वी, कापण्यापूर्वी, खळ्यातून घरात आणण्यापूर्वी व खाण्यापूर्वी त्याची पूजा करतात. उंबर, शमी, पिंपळ व सावर वृक्ष पवित्र समजतात. उंबराची फांदी लग्नविधी प्रसंगी शुभ मानतात. शमीच्या झाडाखाली भगत पूजा करतो. पिंपळ व सावर वृक्षाखाली गावदेवी, ब्रह्मदेव असतो.

**देव-देवतांप्रती श्रध्दा व विधी :–**

कोकणा आदीवासींच्या धर्माला श्रध्दा आणि विधी या दोन मुख्य भागांतून स्पष्ट करता येईल. त्यामध्ये प्रथमत: देव-देवतांवरील श्रध्दा वा विश्वास आणि पितृ, भूतप्रेत व दूष्टशक्ती यावरील विश्वास येतो. स्वत:ला न उमगणाऱ्या व पूर्व सूचना न मिळणाऱ्या या संहारक

• समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

शक्तीचे कारण शोधून काढणे मानवास न जमल्याने या घटना वा शक्ती अदृश्य विश्वातील अलौकिक अगर दिव्य प्राण्यांमुळे घडत असतील असे आदिवासी मानू लागला. या विचारातून सर्वशक्तीमान असे हे अलौकिक प्राणी किंवा शक्ती भौतिक जीवनात लक्ष घालून त्यावर सर्वतोपरी नियंत्रण ठेवत असले पाहिजेत अशी आदिवासींमध्ये श्रध्दा निर्माण झाली. श्रध्दा वा विश्वास ही मानसिक व भावनिक अमूर्ततेची स्थिती असते.

या अलौकिक शक्तीच्या मर्जीवर आदिवासींचे जगणे अवलंबून आहे. त्यामुळे त्यांची आपल्यावर कृपादृष्टी असावी, संतुष्टी, मदत व सहाय्य व्हावे आणि त्याचा रोष, अवकृपा व बाधा टाळावी म्हणून आदिवासी सर्वशक्तीमान देवदेवतांचे मंत्रादि, विधीवत पूजा व प्रसंगी पशूंचे बलिदान करून पूजाअर्चा करतो. विधी हा श्रध्देप्रति भावना व्यक्त करण्याचे मूर्त साधन असते. उदा. आप्तजन वा पाहुणे यांच्यावरील आदरभाव व प्रेम व्यक्त करण्यासाठी रोजच्यापेक्षा अधिक स्वादिष्ट जेवण बनविणे हा विधी आहे.

हिंदू, बौद्ध व जैन धर्मापेक्षा या ठिकाणी वेगळी मान्यता आहे. ती एकेकाळी दारू पिणाऱ्याला अधिक आदर करणारी होती. त्यांच्या मते देवी-देवताही दारू पितात. व त्यांनादेखील दारू-ताडी अर्पण करून प्रसन्न करता येऊ शकते. दारू पिण्यापूर्वी देवतांसाठी दोन थेंब जमिनीवर अर्पण करतात. पूजा करतेवेळी नैवेद्याबरोबर दारू अर्पण केली जाते. स्थानिक दंतकथानुसार ब्राम्हण पुरोहिताने ईश्वराला तूप (यज्ञामध्ये) दिले व भिल्लाने (आदिवासींनी) दारू दिली त्याचे महत्त्व सारखेच आहे. फ्रेंच, जर्मन व्यक्ती आणि पश्चिमेकडील दारू पिणाऱ्या अन्य व्यक्तींच्या मते दारूला महत्त्व आहे. जर्मनीत बीयरला महत्त्व आहे. दारू-ताडीला शेती करणारा गरीब कोकणा, वारली, भिल्ल व महादेव-कोळी महत्त्व देत होता. तो शेतात, मोकळ्या जागेत, मांडवाखाली, झाडाखाली आणि कोठेही दारू पीत होता.

कोकणा जमातीच्या देवदेवतांचे वैशिष्ट्ये असे आहे की, त्यांची पूजाविधी हिंदूंप्रमाणे घरात होत नसते. त्याचप्रमाणे कोकणा देवदेवतांच्या कलात्मक मूर्ती नसतात तसेच त्यांचे छायाचित्र नसते. सर्व सामान्यत: त्यांच्या देवदेवतांचे स्थान डोंगरकपारीत, लाकूड, दगड, नदीकाठ, गावाच्या मध्यभागी किंवा गावसीमेवर, तसेच जंगलामध्ये झाडाच्या खाली असते. मारूतीचे मंदिर वगळता त्यांच्या देवांसाठी मंदिरे नाहीत. कोकणा निसर्गपूजक असून ते रानशिवारी, गावशिवारी, व घरचा देव्हारा असे तीन प्रकारचे देव मानतात. या तीन प्रकारात अनुक्रमे (अ) डोंगर देवी, वाघदेव, (ब) मारुती, गावदेवी, ब्रह्मदेव आणि (क) कुलदैवत, कणसरी, हिमाय व हिरवा देव हे प्रमुख देव आहेत. प्रत्येक गावांतील त्यांच्या प्रमुख देवदेवतांमध्ये गावदेवी, मारूती, वाघदेव, डोंगरदेवी व ब्रह्मदेव या आहेत. याशिवाय देव्हाऱ्यातील **मुंजादेव (आत्मा शक्ती), खंडोबा (स्कंद/स्कंदोबा/कार्तिक), बहिरम (भैरव/महादेव), हनुवत (मारूती) आणि भोवानी/भवानी मातेची (पार्वती/तुळजादेवी) या पाच देवतांची कुलदैवत म्हणून पूजा करतात.** शिव, पार्वती, गणपती, कार्तिक आणि मारूती ह्या अ-वैदिक देवता आहेत. खंडोबा चांदीच्या मूर्तीत घोड्यावर स्वार झालेला असतो व त्याच्या शेजारी कुत्रा असतो. महादेव बैलावर व भैरव घोड्यावर बसला आहे हे दोन्ही शिवाचे अवतार मानले आहेत.

प्रत्येक कुळामध्ये वंश परंपरागत/पिढीजात या पाच देवांची प्रतिष्ठापना केलेली असते आणि त्यात आपल्या मृतपूर्वजांना प्रतीकरूपात धातूच्या पत्र्यावर नाव लिहून विधीवत पूजेने ठेवले जाते त्यास 'देव घडणे' म्हणतात. ज्या करंडीत वा लाकूड-मातीच्या भांड्यात देव ठेवतात त्यास 'देव्हारा' म्हणतात, देव्हाऱ्यातील मृत पुरुष पूर्वजाला 'ईर/वीर' व मृत स्त्रीस सुपली म्हणतात. देव्हाऱ्याची देखभाल करणाऱ्या कुटुंबाला देवघऱ्या म्हणतात.

आपल्या पूर्वजांपासूनची उत्पत्ती सांगणारा समूह म्हणजे कुल होय. आपल्या कुलाचे पूर्वज म्हणजे कूलदेव होय. अशा कुलाचे, कुलदेवतेचे वा समूहाचे आपण सर्व वंशज आहोत असे मानले जाते. आपल्या कुलाचा वारसा आणि दुसऱ्यापेक्षा वेगळेपण दर्शविण्यासाठी आडनावांचा नामनिर्देश केला जातो. एक आडनाव धारण केलेले एकाच पूर्वजांचे वंशज मानत असल्यामुळे सम-रक्ताचे आप्त मानतात, त्यामुळेच समान आडनावांत विवाह (आडनांव बर्हिविवाह) होत नाहीत. बऱ्याच वेळा कोणत्याही प्रकारचे नाते नसुनही केवळ आडनावात साम्य असले तरी तो आपला कुटुंबिय आहे असे समजतात. नाशिक, ठाणे आणि धुळे जिल्ह्यातील जाती व जमातींच्या आडनावांची उत्पत्ती ही ह्या भागात पूर्वकाळी स्थानिक झालेल्या रजपुतांपासून झाली आहेत असे दिसते. त्यामुळे ह्या जमातींनी आपली आडनावे रजपूत कुळाप्रमाणे राखून ठेवली आहेत. त्यात मौर्यापासून मोरे, चौहानपासून चव्हाण व जाधव अशा तऱ्हेनेही नावे पडली असावीत. आदिवासींच्या ह्या जमातीतील काही कुलांची आडनावे राजपुतांपासून ते मराठा जातीशी निगडीत पवार, गायकवाड, जाधव, बागूल व चौधरी आहेत.

विश्वाचा निर्माता, पालनकर्ता व रक्षण करणारा एक देव असून तो सर्वात मोठा देव म्हणजेच महादेव आहे असे आदिवासींना वाटते. शिव व शक्तीची जी उपासना हिंदुस्थानात नंतर रूढ झाली तिचा उगम प्राचीन आदिवासींच्या जमाती धर्मामध्ये आहे, हे आपणास महाराष्ट्रातील कोणत्याही आदिवासींच्या विश्व निर्मितीच्या (महादेवाच्या) कथेवरून लक्षात घेता येईल. आदिवासींच्या महादेवाला आर्यादि वैदिक हिंदूधर्माने नंतरच्या काळात हिंदूकरण करून स्वीकारले. वस्तुत: महादेव ही आदिवासींची देवता आहे किंबहूना महादेव हा नागवंशीय आदिवासी देव आहे. आजही संपूर्ण भारतातील सर्वच आदिवासी जमातींमध्ये महादेव-शंकराचे स्थान तेवढेच महत्त्वाचे आहे. नागांची जी कुळं महाभारतात सांगितली आहेत, त्यांत कुकुण असे एक कूळ आहे, आणि ते या प्रांतात खाली गोकर्णापर्यंत (कर्नाटक) राहत होते, असा एक दाखला

आहे. तेव्हा या कुकुण नागकुलाचा आणि कोकण (प्रदेश) या नावाचा काही संबंध असू शकतो. कोकणा, कोकणी, कुकणा या समानार्थक नावांनी ओळखली जाणारी ही अनुसूचित जमात प्रामुख्याने आजच्या कोकण प्रादेशिक भूभागातून उत्तर महाराष्ट्रात आल्याचे ब्रिटिश गॅझिटिअर आधारे समजते. कोकणा हा शब्द कोकण (महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील समुद्रकिनारपट्टीस कोकण प्रदेश म्हणतात) या शब्दापासून निर्माण झाला आहे. असे म्हटले जाते. कोकणा हे मूळचे रत्नागिरीकडचे होते. यासंदर्भात मिळणाऱ्या माहितीप्रमाणे जव्हार (ठाणे) तालुक्यातील गंभीरगड नावाच्या किल्ल्याच्या संरक्षणासाठी या जमातीच्या लोकांना रत्नागिरीहून आणले गेले. म्हणून ठाणे जिल्ह्याच्या उत्तर भागात प्रथमत: ही जमात आली व तेथून ती आसपासच्या प्रदेशात पसरली. एन्थोवेनच्या मते प्रसिद्ध दुर्गादेवीच्या दुष्काळात कोकणा जमातीचे लोक (१३९६-१४०८) उत्तरेकडे स्थलांतरित झाले. ही जमात कोकणातून घाटमाथ्यावर आलेली असावी असे सर्वसाधारण मत आहे. नागांचा आणि दक्षिणकडील प्रांतांचा व विशेषत: पश्चिमेकडील कोकण प्रदेशाचा जास्त संबंध आला. याशिवाय गोंड, भिल्ल, वारली, महादेव-कोळी, काथोडी, कातकरी या एतद्देशीय लोकांच्या वसाहतीही महाराष्ट्रात होत्या.

कोकणांमध्ये अनेक देवदेवतांना पूजाअर्चेमध्ये स्थान दिलेले आहे. शमी वा सावरीच्या वृक्षाजवळ दगड ठेवून त्याला ब्रह्मदेव मानतात. त्याच्या शेजारी मातीचा घोडा, दिवा व निशाण (झेंडा) ठेवतात. वाघदेव म्हणजे तीन फूट लाकडी खांबावर किंवा दगडावर वाघाचे चित्र कोरले जाते त्याच्या खाली नाग, विंचू व मोर यांचे चित्र असते त्याला शेंदूर फासलेला असतो. कोकणा हे धर्मिक विधी एकतर स्वत:च करतात वा जमातीचे पुजारी म्हणून भगताकडून करवून घेतात. भगताला या जमातीत मानाचे स्थान असते.

कोकणा आपल्या देव-देवतांबद्दल आदरयुक्त भीती बाळगतात. त्यांचा आपल्यावर कोप होऊ नये या एकाच हेतूने पूजा करतात. कोकणांचे देव फार कडक आहेत असा त्यांचा समज वा विश्वास आहे. त्यांना प्रसन्न केले नाही तर ते नुकसान करतात अशी भावना असते. घरातील आजारपण किंवा आपत्ती ही देवाची अवकृपा समजून आपत्तीतून सुटण्यासाठी ते देवाला नवस करून पूजाअर्चा करतात. कोकणांचा भूतप्रेतावर विश्वास असतो. ही भूते पीडा देणारी असतात म्हणून त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे असे ते मानतात. वर्तमानातील सुशिक्षित कोकणाही तितक्याच श्रध्देने धर्मतत्त्वांचे पालन करीत असल्याचे आढळते.

## डोंगर देवी

गावापासून दूर डोंगर-कपारीत गुंफांमध्ये दगडाच्या स्वरूपात देवतेचे एक स्थान असते त्याला डोंगर देवी म्हणतात. कोकणाशिवाय महादेव कोळी, वारली व भिल्ल जमातींमध्ये अशी देवता मानली जाते. प्रारंभी डोंगर-पर्वताच्या गुफांमध्ये हिंस्त्र-पशूंची वसतिस्थाने असावीत त्यांच्यापासून मानवाला व पाळीव प्राण्यांना त्रास होऊ नये म्हणून या गुफांची पूजा केली जात असावी. नैसर्गिक प्राणी व वनस्पती शक्तीचे प्रतीक म्हणून या गुंफा-कपारीची पूजा करण्याच्या विधीला ते डोंगरदेव पूजा म्हणतात. प्रतिवर्षी, वर्षाआड किंवा पाच वर्षांतून ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यात हा विधी पार पाडला जातो. कळवण तालुक्यामध्ये मात्र दिवाळीनंतर साधारणत: डिसेंबर महिन्यात (मार्गशीर्ष, पौष) विधी केला जातो. दोन दिवसांपासून ते दहा दिवसापर्यंत विधीचा कार्यक्रम चालतो. या महिन्यातील कोणताही दिवस जो घरमालक, गावकरी व भगत यांच्या सोयीचा दिवस या विधीचा प्रारंभ दिवस असतो. काही ठिकाणी दिवाळीपूर्वी व नंतर विधी करण्याचा रिवाज आहे.

तालुकानिहाय डोंगरदेव पूजा दोन पातळ्यावर केली जात असल्याचे आढळते. ती कौटुंबिक व सामूहिकपातळीवर होत असून कळवणमधील सवंच गावांमधून एकच डोंगरदेवता असून सामूहिकपातळीवर देवपूजा असली तरी बोकडाचा बळी देण्याची प्रथा मात्र कौटुंबिक दिसते. एकाच गावातील कोकणा १५ ते २० बोकड बळी देत असल्याचे आढळते. याउलट सुरगाणा तालुक्यात दोन्ही पध्दतींने पूजा होत असून काही कोकणांच्या स्वतंत्र डोंगरदेवता आहेत. ते कौटुंबिक पातळीवर विधी करीत असून संपूर्ण गावाच्या पूजाविधीतही सहभागी होतात.

कोकणा आदिवासींचे वास्तव्य हे मूलत:च डोंगर-दऱ्यात, जंगल-झुडूपात असल्यामुळे त्यांची निसर्ग शक्तीप्रती असणारी आस्था, उपयोगिता, त्याचे महत्त्व आणि नैसर्गिक शक्तीची अवकृपा होण्याची भिती यातून गावांतील सर्व लहान-थोर आदिवासींना सुखसमृध्दी मिळावी, गावात दैवी कोप होऊन पाळीव प्राणी व माणसे आजाराने बाधित होऊ नये, संसर्ग आजारांपासून गावाला संरक्षण द्यावे, पाळीव पशुंना हिंस्त्र-श्वापदांपासून बाधा होऊ नये, शेतात धान्याची संपन्नता यावी व त्याचे संरक्षण व्हावे या सर्व कारणांसाठी डोंगरदेवाची पूजाअर्चा केली जाते. संपूर्ण नैसर्गिक शक्तीचे एक प्रतीक म्हणून डोंगर देवीला अनन्य साधारण महत्त्व आहे.

आदिवासींमध्ये या विधीप्रसंगी भगताची भूमिका कर्त्याची असते. भगत पारंपरिक मंत्र विद्येत पारंगत असतो. जर भगताच्या मंत्र विद्येमध्ये थोडीशी जरी चूक झाली तरी त्याची बाधा वा परिणाम संपूर्ण गावाला भोगावे लागते असे ते मानतात. प्रसंगी पशू व मानवाची हानी होऊ शकते असा समज असतो. डोंगर देवी विधीच्या कालावधीत विडीकाडी, मद्यपान, मांसाहार व शरीरसंबंध वर्ज्य मानतात. उपवासाच्या काळात सांजवेळी केवळ नाचणीची भाकरी आणि उडीदाचे वरण हाच आहार घेतात. या दिवसात एकमेकांना अर्वाच्य भाषेत बोलत नाहीत. आठ-दहा दिवसाच्या रोज सायंकाळी किंवा शेवटच्या दिवसापूर्वीच्या सायंकाळी परंपरागत पध्दतीने पूर्वनिश्चित ठरलेल्या ठिकाणी सर्वजण एकत्र येतात त्या जागेस 'खळी' म्हणतात. तेथे सर्व पूजेचे सामान आणून भगताकरवी पूजा आरंभली जाते. पूजेच्या मध्यभागी मोराच्या पिसांचा जूडगा उभा

करतात. बाजूला तेलवात व अगरबत्ती तेवत ठेवतात. पूजेच्या सभोवताली धान्य, दूध, गोमूत्र, झेंडूची फूले व फळांदी वस्तू ठेवतात. भगत रात्रभर घांगळी वाद्य किंवा थाळी वाद्याच्या सुरावर डोंगर देवीची कथा सांगतो आणि देवदेवतांना आळवणी करून जागृत करतो. समारंभाचे मुख्य आकर्षण म्हणजे त्या रात्री घांगळी व थाळी वाद्यवर देवीची कथा सांगण्याचा कार्यक्रम होय.

घांगळी हे दोन सुकविलेल्या भोपळ्यांना मध्यभागी एक बांबू व तारा लावून बनविलेले तंतुवाद्य असते.

**घांगळी हे तंतूवाद्य बनविण्यासाठीची विविध साधने**

A भोपळ्याची फळे
B तंतूवाद्याची तार
C लाकडी खुंटी
D तारेला ताण देण्याची लाकडी खुंटी
E लाकडी ठोकळा
F बांबूची काठी
G मोराची पिसे



(चित्र क्र. १ घांगळी एक तंतूवाद्य)

थाळी वाद्य हे कांस्य धातूच्या परातीला मध्यभागी मेणाची गोळी चिकटवून त्यावर अंबाडी वनस्पतीची काडी उभी केलेली असते, काडीला मेणाचे बारीक लिंपन दिल्यामुळे खडबडीत होते, मांडीवर परात ठेवून उभ्या काडीला बोटाने अलगतपणे वरून खाली ओढून ताटात कंपन निर्माण करतात, त्या सुरावर भगत कथा सांगत असतो. डोंगर देवी कथेच्या एकेका अध्यायातून काही गावकऱ्यांमध्ये देव-देवतांची शक्ती अंगात संचारते तेव्हा त्यातील काही फेर धरून नाचतात. त्यास 'सूड पडणे' म्हणतात. भक्तगण आणि फेर धरून नाचणाऱ्यांना 'मावली' म्हणतात. काही भक्तगणांच्या अंगात संचारलेल्या देवी-देवता ह्या वाघदेव, अग्निदेव, पवनदेव, रडक्यादेव, धोबीदेव व भवानीदेवी इत्यादी असतात. वाघ्या हातापायावर चालून मोठमोठ्याने डरकाळीचा आवाज काढतो. आग्या वेताळ या अग्निदेव संचारलेली मावली अग्निला स्पर्श करू शकतो. चूलीतील ज्वलंत लाकूड तोंडात घेतो. निखारा चावतो आणि निखाऱ्यावर चादर टाकून बसतो हे प्रत्यक्षदर्शनी सांगितले. भिश्या/ भयशा, म्हसोबा अंगामध्ये आला तर तो नदीवर जाऊन स्नान करतो किंवा जमिनीवर लोळतो. सुऱ्या/सुर्य देव स्वत:भोवती प्रदक्षिणा घालतो. गीरा स्वत:च्या अंगावरच पाणी शिंपडतो. भंडारी शिंदीच्या झाडावर चढतो. धोबी कपडे धुतो. कुटनदेव स्वत:लाच मारतो. किस कलया दुसऱ्याला हसवतो. रानभूत जंगलात भटकत असतो. जेव्हा त्याच्या शरीरामध्ये जी शक्ती जागृत होते तेव्हा तो त्या शक्तीचे प्रदर्शन करतो. ज्या माणसाच्या अंगात वारे येते त्याला त्याच्या नावाने न संबोधता देव वा देवा म्हणून हाक मारतात. दैवी शक्ती संचारलेली व्यक्ती बाभूळींच्या काट्यांवर चालू व झोपू शकते याची पुराव्यादाखल छायाचित्र उपलब्ध आहेत. एखादा गैर-आदिवासी आस्थेवाईकाला मावल्यांचे दृश्य बघून अंगावर काटे आल्यास नवल वाटणार नाही. इतका विशुध्द व निष्काम श्रध्देचा अनुभव कोणताही निरीक्षक अनुभव घेऊ शकतो.



(चित्र क्र. २ दैवी शक्तीतून बाभुळीच्या तीक्ष्ण काट्यावर झोपलेला कोकणा)

नाशिक जिल्ह्यातील कळवण, सुरगाणा, पेठ, सटाणा व दिंडोरी तालुक्यातील गावकरी वा भक्तगण दिवसभर सभोवतालच्या एकेका गावातील प्रत्येकाघरी अंगणात फेर धरून नाचतात आणि आपल्या मावल्यांसाठी धान्य संकलित करतात. रोज रात्री गावशिवाराबाहेर निश्चित ठिकाणी एकत्र येऊन पूजाअर्चा करतात. या पूजाअर्चाच्या काळात देवीचे उपवास करणारे भक्तगण विधी संपेपर्यंत गावशिवाराबाहेरच वास्तव्य करतात. या काळात उपवास करून फक्त रात्रीच भोजन घेतात. भगत लोक घांगळी किंवा थाळी वाद्याच्या सुरावर देवी-देवतांच्या कथा सांगून दोन ते दहा दिवस जागरण करतात. कळवण तालुक्यांमध्ये मात्र कोणा एका कुळाची वा कुटुंबाची स्वतंत्र डोंगर देवी असल्याचे आढळून येत नाही, असे असलेतरी गावांतील सर्व लोक तद्वतच रोजगार वा नोकरी निमित्ताने जे कोणी बाहेर-गावी गेलेले असतात असेही न चूकता किमान दोन दिवसासाठी हमखास गावी येतात. शेवटच्या दिवशी यथाशक्ती-भक्तीप्रमाणे विशेषत: मोठ्या घरकुलातून बोकड बळी दिला जात असल्यामुळे बाहेर गावच्या आप्तजणांना विशेष आमंत्रण असते. यातून समुदाय एकतेच दर्शन घडते.

शेवटच्या दिवशी भल्या पहाटे सर्वजण डोंगरातील कपार वा गुंफेजवळ जाऊन भक्तांकरवी पार्श्वभागाची पूजाविधी करतात. पूजा साहित्यामध्ये देवीसाठी सुवासिनीचे वाण म्हणजे ओटी भरण्याचे सामान त्यात कुंकू, हळद-हळकुंडे, हिरवा चूडा, साडी-चोळीचा खण, मंगळसूत्र, फणी,

खोबरे व सुपारी अर्पण करतात. सकाळच्या सुमारास सर्वजण देवी अर्थात त्या गडाचे मनोभावे दर्शन घेतात. भक्तगणातील काही धाडशी तरुण बोगद्यात प्रवेश करून लांबवर सरपटत जातात. सरपटत गेल्यानंतर पुढे-पुढे उभे राहून जाता येते इतका मोठा बोगदा वा गुंफा असल्याचे सांगतात. आत प्रवेश करणे तसे धोकादायक असते कारण त्यात सरपटणारे व चतु:स्पाद हिंस्त्र प्राणी असतात असे प्रत्यक्षदर्शी भक्तगणांचे म्हणणे असते. परंतु त्याचवेळी डोंगर देवीच्या कृपेने ते आपणास काहीही करीत नाहीत असेही सांगतात.

सकाळच्या पूजाविधीनंतर डोंगरावरून उतरून नदीवर स्नानादि डोंगरदेवीला पशूबळी अर्थात बोकडबळी दिला जातो. बळी देण्यापूर्वी बोकडांना आदल्या दिवसापासूनच गावकरी सोबतच 'खळी' या गडावर घेऊन गेलेले असतात. देवीला नैवेद्य दाखवल्यानंतर शेवटी गाव-जेवण केले जाते.

**भगताची भूमिका**

भगत या व्यक्तीला कोकणा, वारली, भिल्ल आणि महादेव कोळी यांच्या धार्मिक जीवनात विशिष्ट व श्रेष्ठ स्थान आहे. भगत एक दैवी शक्ती असलेला, धार्मिक विधी करणारा, आजारावर औषधोपचार करणारा, पंचायतीतील एक पंच, मध्यस्थ व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे चेटकिणीचा (Witch) शत्रू मानला जातो. तो मांत्रिक व धार्मिक कर्तव्य पार पाडतो. एखाद्याच्या आजाराचे निदान तोच करतो. सर्वसामान्य कोकणांच्या तुलनेत भगताला अधिक ज्ञान व माहिती असते असे ते समजतात. अलौकिक शक्तीला आपलेसे करण्याचे कसब, जादुटोणा व धार्मिक विधी यात पारंगत असून जादू मंत्रोच्चाराचे ज्ञान जसे-मोहिनी मंत्र, रोगनिवारक मंत्र, हवा पाण्यावर नियंत्रण मिळविण्याचे मंत्र, उत्तम पीक येण्याचे मंत्र, हिंस्त्र श्वापदापासून संरक्षण करणे वा बंदोबस्त करण्याचे मंत्र भगताला येत असतात. भगत अलौकिक शक्ती व सामान्य लोक यांना जोडणारा दुवाच असतो. दैवी शक्ती व दूष्टशक्ती यांच्यावर असलेला दृढविश्वास यांच्या धार्मिक प्रवृत्तीत पाहावयास मिळतो. यातून धार्मिक आणि आरोग्यदृष्ट्या भगताला महत्त्वाचे स्थान असल्याचे स्पष्टपणे आढळून येते. भूते व चेटकिणी यांचे नियंत्रण करणाऱ्या भगतांच्या शक्तीवर कोकणांचा विश्वास आहे. या जमातीत चेटूक करणारी स्त्री असते आणि लोकांचा त्याच्यावर विश्वास असतो. चेटकिणीची बाधा होऊन आजारपण आल्यावर भगताकडून उपचार करून घेतला जातो.



(चित्र क्र. ३ भगताकडील घांगळी वाद्य)

कोकणांच्या धार्मिक श्रध्दा पूर्ण करण्याच्या उद्देशाने भगत आपल्या अंगात देवता जागृत करतो व तो आपले भक्तगण समाधानी व्हावेत हे पाहतो. अशा तऱ्हेने सर्वसामान्यांना देवकार्यात प्रवेश मिळवून देण्यास सहायक असतो. तो पुजारी व मध्यस्थ अशा दोन्ही भूमिका पार पाडतो. देवानंतर भगत हीच महत्त्वाची शक्ती असल्याचे कोकणा मानतो, त्यामुळे या जमातीत त्याचे स्थान मोठे आहे.

भगत लोकांना मंत्रतंत्र, औषधी विज्ञान कितपत अवगत असते याचा अंदाज करणेही कठीण असते. कारण हे सर्वज्ञान गुप्त ठेवतात. कित्येकांजवळ असाध्य रोगांवरील उपाय करण्याचे ज्ञान असूनही ते त्याची वाच्यता करीत नाहीत. कारण दुसऱ्याला मंत्र व औषधे सांगितल्याने त्याचा प्रभाव कमी होऊन पुढे गुण येत नाही अशी धारणा या भगत लोकांत रूढ आहे. कित्येकाजवळ सर्पाची विषबाधा कमी करणारी, नष्ट करणारी औषधे-कंदमुळे, झाड-पाला, साल व पानेही माहीत असतात, विंचू दंशावर कुठल्यातरी पाल्याचा रस चोळतात आणि संपूर्ण विषबाधा नष्ट करतात. दूध उत्पन्नात वाढ करणे, डोळ्यातील डाग, मोतीबिंदू, मूळव्याध, मूतखडा, बंद मासिक पाळी पूर्ववत करणे व अडलेले बाळंतपण इत्यादी अनेक रोग बरे करणारे भगत ऊर्फ वैदू आहेत. प्रत्येक गावात भगत ही एक धार्मिक संस्था असते, भंगताकडे दैवी शक्ती असते, त्याला अनाकलनीय बाबी कळतात. त्यामुळे तो भूत व भविष्य सांगू शकतो व उपाय सुचवू शकतो असा कोकणांचा विश्वास आहे.

कोकणांमध्ये विविध देवदेवतांची पूजाविधी दोन पध्दतींची आढळते. त्यात कौटुंबिक स्तरावरील व गावस्तरावर सामूहिक पूजा असते. व्यक्तिगत-कौटुंबिक आणि सामूहिक स्वरूपात भगतांकडून नारळ व पशूबळी दिला जातो. सामूहिक पातळीवर मात्र वडिलोपार्जित पशूबळी देण्याचीच पध्दत रूढ दिसते. परंपरागत पध्दतीने जे चालत आलेले आहे तेच करीत असतात. त्या मागील कारणांचा सारासार विचार अजुनही फारसा करीत नाही. देव-देवतांचा कोप होऊ नये या एकाच हेतूने ते त्यांची पूजा करतात, कोकणांचे देव फार कडक आहेत, त्यांना प्रसन्न केले नाही तर ते नुकसान करतात अशी भावना असते. त्यामुळे कोणतीही कारणमीमांसा न करता परंपरेने चालत आलेल्या गोष्टी मूकपणे कराव्या, यातच ईश्वराची संतुष्टी समजत असावेत असे वाटते. आज कोकणांमध्ये वैचारिक पातळीवर मूल्य वा तत्त्वांसंबंधी बदलाच्या संधीची आवश्यकता आहे असे वाटते.

सुरगाणा तालुक्याच्या दक्षिणेकडील गावांमध्ये गावस्तरावर दोन दिवस विधी चालतो मात्र ते दरवर्षी पूजा करतात. याशिवाय गावातील एकेका कुटुंब वा कुळाची स्वतंत्र डोंगर देवी असते. तेही दोनच दिवसांचा विधी करतात पण पाच वर्षातून एकदा करतात. म्हणजेच परंपरागत पध्दतीने एका गावाची सामूहिक एक आणि कुलकुटुंब सदस्यांची ती दुसरी डोंगर देवी असते. तेथील देवीची पूजाअर्चा वा विधी परंपरेने गाव आणि कुटुंबातील सदस्य करीत आलेले आहेत.

स्थल, काल आणि स्थितीपरत्त्वे डोंगर देवीच्या पूजाविधी व पशूबळी देण्याच्या पद्धतीमध्ये मात्र तफावत असल्याचे जाणवते. काही गावांमध्ये कोंबड्या व बोकड बळी देण्याला तिलांजली देऊन त्याऐवजी पाच-सात नारळ फोडण्याची नवीनतम परंपराही रूढ केली आहे. देव-देवतांना फुले वाहून वा नारळ फोडूनही प्रसन्न करता येऊ शकते हे कदाचित देव-देवतांनी देखील मान्य केलेले असावे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्याचे कारण पशूबळी न देताही सुख-समृद्दी आणता येऊ शकते किंबहूना त्याहून अधिक येऊ शकते. हेही आदिवासी आणि कोकणा जमातींनी विशेष करून नवतरुणांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

❖❖❖

# आदिवासींच्या विकासासाठी सरकारच्या उपयोजना

• श्रीमती रूपाली एम. देवरे, नाशिक

**प्रस्तावना :**

१९ व्या शतकात मानसशास्त्रज्ञांनी 'आदिवासी' किंवा 'आदिवासी समुदाय' ही संज्ञा विकसित केली. या संज्ञेनुसार एकाच भूभागावर निवास करणाऱ्या सर्वसामान्य एकच नाव किंवा ठराविक आडनावे, कुळे लावणाऱ्या एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या विवाहसंबंध आणि व्यवसायाच्या बाबतीत एकाच प्रकारचे मग ते निषेधात्मक असो वा संमतीदर्शक असे नियम पाळणाऱ्या व निश्चितपणे एका विशिष्ट प्रकारची मूल्ये व विचारप्रणाली यांची जपवणूक करणाऱ्या कुटुंबाच्या समूदायाला आदिवासी समुदाय किंवा आदिवासी समाज असे म्हणतात. कुटुंबाच्या या समुहाला 'जमात' असेही म्हणतात.

भारतीय स्मृतिग्रंथात आदिवासी जमातींचा उल्लेख आहे. अनुलोम-प्रतिलोम शरिरसंबंधातून या निर्माण झाल्या असा उल्लेख आहे. रामायण-महाभारतात उल्लेख असलेले शबर, रक्श, निषाद, किरात, पुलिंद या जमातीच होत्या, ते आदिवासीच होते. रामायणातील शबरी, महाभारतातील एकलव्य आणि श्रीकृष्णाला ज्याच्याकडून मृत्यू आला तो व्याध किंवा शिकारी हे सर्व आदिवासीच होते.

आदिवासी याचाच अर्थ त्या त्या ठिकाणचे मूळ रहिवासी असाही होतो. आदिवासी हा इंग्रजीतील ॲब-ओरिजनल्स या शब्दाचा मराठी पर्यायी शब्द आहे. नागरी संस्कृती आणि वस्तीपासून दूर राहिलेले असे ते आदिवासी. संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी. मात्र भारतातील आदिवासींसाठी 'ॲब-ओरिजिनल' हा शब्द प्रयोग वापरणे हे शास्त्रीयदृष्ट्या अनावश्यक आहे. असे मत प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ, श्री. धुर्ये यांनी मांडले आहे. बरेचसे आदिवासी डोंगरदऱ्यातून, जंगलातून राहत असल्याने त्याचा उल्लेख 'गिरिजन' अथवा 'वनवासी' असाही होतो. थोडक्यात या शब्दांचा आशय एक असला तरी नि:संदिग्ध अर्थ प्राप्त करून देणे अवघड आहे. मात्र अनुसूचित जमातीच्या भारतीय घटनेच्या अनुच्छेद ३४२ काही मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहेत त्याअन्वये या समाजांना असा दर्जा दिला जातो अथवा काही ठळक वैशिष्ट्ये नक्की केली आहेत. उदा. प्रत्येक जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहते ते क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते. त्यामुळेच हा समाज इतरांपेक्षा अलग असतो.

आदिवासी समाजात कुळांची व्यवस्था असते आणि जमात ही अंतर्विवाही, मात्र कुळ ही बहिर्विवाही असतात. त्याचा धर्म हा संचेतनवादी असून तो निवासस्थाना पुरताच असतो. मात्र त्यात तंत्रमंत्र, जादुटोणा असतो. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. प्रत्येक जमातीची भाषा व बोली स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यांची अर्थव्यवस्था ही वस्तुविनिमय पद्धतीची असते. त्यांच्या परंपरांमुळे लोकांच्या वागण्यात सारखेपणा असतो याशिवाय अलिप्तता आणि एकाकीपणामुळे मागासलेपणा आणि बुजरेपणा हे ही या समाजाचे वैशिष्ट्य आहे.

आदिवासी समाज डोंगरदऱ्यात, पर्वतावर आणि जंगलात राहत आलेले आहेत. त्यामुळे इतर समाजापासून ते वेगळे आणि स्वतंत्र आहेत. सतत निसर्गाच्याच सान्निध्यात राहिल्याने त्यांच्या प्राथमिक गरजा ते निसर्गातूनच भागवितात. अन्नपदार्थ मिळविणे आणि संकलन करणे अशीच त्यांची व्यवस्था होती आणि त्यातून ती शेतीव्यवसायाकडे गेली. तरीही शेती हा व्यवसाय नसून गरजे एवढी अन्ननिर्मिती तसेच त्याचे स्वरूप आहे. जंगल वापरावर आलेल्या बंधनामुळे शेतीस चालना मिळाली. उत्पादनाची आणि संकलनाची त्यांची साधने ही साध्या स्वरूपाची, हाताने बनविलेली असतात त्यामुळे त्यांची संपूर्ण अर्थव्यवस्थाच प्राथमिक आणि वस्तुविनिमय स्वरूपाची आहे. बहुसंख्य आदिवासी समाजांची स्वत:ची अशी बोलीभाषा आहे परंतु त्यांना लिपी नाही. त्यांची भाषिक, सांस्कृतिक परंपरा मौखिक पद्धतीद्वारेच जतन होत आली आहे. त्यांच्यामध्ये बर्हिविवाही कुळी पध्दत असते. एका कुळातील सदस्य हे नाते संबंधाने बांधलेले असतात.

**आदिवासी संज्ञा.--**

(१) **"आदिम"**.-- डॉ. गोविंद गारे, डॉ. मांडवकर यांनी वन्य जमातीसाठी वापरलेले शब्द.

(२) **"अनुसूचित जमाती"**.-- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत म्हटले आहे.

(३) **"गिरीजन"**.-- गिरीकंदरात शेकडो वर्षे वास्तव्य केल्यामुळे आदिपुत्र किंवा वनपुत्र असे ही.

(४) **"वनवासी"**.-- अर्ध नग्न राहून लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ वणवण भटकल्यामुळे वनवासी किंवा वन्य जमाती.

(५) **"मूळनिवासी"**.-- आदिवासींचे कैवारी महात्मा गांधी व पुज्य ठक्कर बाप्पा यांनी व्यक्त केले आहे.

(६) **"धरतीची लेकरे"**.-- सहानुभूतीने.

(७) **"जंगलचे राजे"**.-- सुप्रसिद्ध समाजसेविका, सौ. कुसुम नारगोळकर, श्याम नारगोळकर यांनी म्हटलेले आहे.

वरील संज्ञावरून आदिवासींना काय-काय संबोधले जाते याविषयीची माहिती मिळते. अर्धनग्न राहून, कधी लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ वणवण भटकल्या त्यांना "वनवासी" किंवा "वन्यजमाती" म्हणून ओळखले जाते तर कोणी त्यांना उपहासाने "अरण्यक" किंवा "लंगोट्ये" तर कोणी "गिरिजन" किंवा "आदिपुत्र" तर कोणी 'धरतीची लेकरे', 'वनपुत्र' या नावांनी ओळखतात. सुप्रसिध्द समाजसेविका, सौ. कुसुम नारगोळकर व श्याम नारगोळकर यांनी त्यांना "जंगलाचे राजे" म्हणावे असे सूचविले आहे तर भारतीय राज्यघटनाकारांनी त्यांना "अनुसूचित जमाती" असा उल्लेख केला आहे.

**आदिवासी विविध व्याख्या :--**

आदिवासींच्या संदर्भात अभ्यासकांनी, संशोधकांनी, समाजशास्त्रज्ञांनी आजपर्यंत विविध व्याख्या मांडल्या आहेत. परंतु सर्वमान्य अशी एकही व्याख्या प्रचलित नाही त्यामुळे "आदिवासी" या संज्ञेच्या ज्या विविध व्याख्या मांडल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**(१) गिलीन आणि गिलीन यांच्यामते :--**

"एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा समान बोली-बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी म्हणतात".

**(२)** डी. एन. मजुमदार यांनी आदिवासींची सर्व लक्षणे लक्षात घेऊन त्यांची विस्तृत अशी व्याख्या केली आहे ते म्हणतात.--

"समान नाव असणारा एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय."

**(३) प्रा. भगवान भोईर यांच्यामते :--**

"आदिवासी म्हणजे भूतलावर पहिले पाऊल ठेवणारा माणूस, नागरी संस्कृतीपासून अगदी दूर जंगल दऱ्या-खोऱ्यात, दुर्गम भागात राहणारा माणूस म्हणजे आदिवासी, आदिवासी म्हणजे दुःखाची समस्त महागाथा".

वरीलप्रमाणे आदिवासींच्या संदर्भात विविध व्याख्या मांडण्यात आलेल्या आहेत.

**आदिवासी उपयोजना :--**

एवढे असून त्यापैकी ५०, ७५७ चौ. कि. मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्त्वे भिल्ल, गोंड, महादेव-कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ). कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ या पूर्वेकडील जिल्ह्यामध्ये आहे.

या सर्व अनुसूचित जमातीचा विकास करण्याकरिता आदिवासी विकास विभागामार्फत शिक्षण उच्चशिक्षण, प्रशिक्षण शिष्यवृत्ती, रोजगार / स्वयंरोजगार, वस्तीसुधार, शेतीपूरक उपक्रम अशा वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या अनेकविध योजना राबविल्या जातात. आदिवासी उपयोजना क्षेत्रात इतर विभागाच्या माध्यमातून वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या विविध योजना राबवल्या जातात. या सर्व योजनाद्वारे आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी व्यक्ती व आदिवासी उपयोजना क्षेत्राचा विकास करण्यात येतो.

भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांनी आदिवासी उपयोजनेची संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्यामुळेच संपूर्ण देशभर आदिवासी क्षेत्रात क्षेत्र विकासासाठी कामे सुरू झाली. महाराष्ट्रातही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपाययोजना शासनाने हाती घेतल्या. त्यामुळे या समाजाची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. काळाबरोबर विकासाच्या संकल्पना बदलतात. काळाबरोबर घडणारे बदल लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत वेगवेगळे निर्णय व योजना हाती घेण्यात आल्या. राज्य शासनाने श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून समितीच्या अहवालातील शिफारशी आहेत. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्केपर्यंत नियतव्यय उपलब्ध करून द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासून सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

सदर योजनांसाठी कमाल मर्यादेच्या अधिन राहून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्ह्यातील अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाह्य क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारूप आराखडा तयार करून जिल्हा नियोजन मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करतात याप्रमाणे प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजूर केलेला जिल्हानिहाय प्रारूप आराखडा संकलित करून राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्यय मंजुरी मिळाल्यानंतर मंजूर नियतव्यय अर्थसंकल्पीत करून प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतूद उपलब्ध करून देते. त्याप्रमाणे संबंधित विभागाकडून मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यात येतो व खर्चाची मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो.

**आदिवासी उपयोजनेची उद्दिष्ट्ये :--**

(१) सर्व स्तरांवर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी योजना आखणे.

(२) समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आदिवासी समाज अलग पडला होता त्याला मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे. त्याकरिता दळण-वळणाची साधने वाढविणे, शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पद्धतीची आदिवासींमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय व शोषण यामुळे त्यांच्या जीवनात उदासीनता आहे ती दूर करण्यासाठी आदिवासी तरुणांना व त्यांच्यातील नव्या नेतृत्वाला स्वत:चा विकास करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे. तोट्यात जाणारी आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपयोजना करणे व त्यायोगे आदिवासींचे जीवनमान उंचावणे.

आदिवासी विभागात शेती व्यवसायाला पूरक धंद्याचा अभाव आहे तो दूर करणे. आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पद्धतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थांचे जाळे पसरून त्याद्वारे पतपुरवठा करणे. आदिवासींच्या शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.

वरील उद्दिष्टे उपयोजनेत मांडण्यात आले. आदिवासी उपयोजनेसाठी असलेला निधी फक्त आदिवासी विकास कार्यक्रमांसाठीच राखून ठेवण्यात यावा इतर कोणत्याही दुसऱ्या कार्यक्रमासाठी त्याचा वापर करण्यात येऊ नये. यासाठी खात्रीची उपाययोजना म्हणजे प्रत्येक मुख्य लेखा शीर्षाखाली जनजाती क्षेत्र उपयोजना हे वेगळे गौणशीर्ष सुरू करण्यात आले आहे व आदिवासी उपयोजनेच्या अर्थसंकल्पातील तरतुदीच्या खर्चावर आदिवासी विभागाचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

आदिवासी उपयोजनेअंतर्गत खालील ९ मुख्य विकास शीर्षाखाली आदिवासी जनतेकरिता विविध वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्र विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

**१. कृषी संलग्न सेवा :--**

(अ) पीकसंवर्धन, (ब) फलोत्पादन, (क) मृद व जलसंधारण, (ड) पशुसंवर्धन (इ) दुग्ध विकास (ई) मत्स्य व्यवसाय, (उ) वने, (ऊ) सामाजिक वनीकरण (ए) सहकार.

**२. ग्रामीण विकास :--**

(अ) सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार, (ब) अवर्षण प्रवण कार्यक्रम, (क) जवाहर रोजगार योजना, (ड) रोजगार हमी योजना (इ) भूसुधार, (ई) सामूहिक विकास, (उ) नक्षलग्रस्त भागासाठी विविध योजना राबविणे, (ऊ) आदर्श गाव योजना, (ए) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम.

**३. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम :--**

**४. पाटबंधारे व पुरनियंत्रण :--**

(अ) मोठे व मध्यम पाटबंधारे (मंडळ), (ब) लघु पाटबंधारे (जलसंपदा), (क) लघु पाटबंधारे (ग्रामीण विकास विभाग), (ड) लघु पाटबंधारे (जलसंधारण विभाग) (इ) लघु पाटबंधारे (सहकार व वस्त्रोद्योग विभाग), (ई) आयकर विभाग, (उ) पुनर्वसन.

**५. विद्युत विकास :--**

(अ) ग्रामीण विद्युतीकरण,

(ब) अपारंपरिक ऊर्जा.-- आदिवासी उपयोजनेअंतर्गत खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येतात.

(१) नित्यनुतनशील ऊर्जा कार्यक्रम

**६. विद्युत व खनिजे :--**

(अ) मोठा व मध्यम उद्योग (वस्त्रोद्योग)

(ब) ग्रामीण व लघुउद्योग.-- सुशिक्षित बेकारांना बीज भांडवल सहाय्य, जिल्हा उद्योग केंद्र.

(क) ग्रामीण व लघुउद्योग (सहकार व वस्त्रोद्योग)

**७. वाहतूक व दळण-वळण :--**

(अ) रस्ते विकास-- राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते, बी. आर. ओ. मार्फत रस्ते विकास.

**८. सामान्य आर्थिक सेवा :--**

(अ) वन पर्यटन, (ब) स्थानिक विकास कार्यक्रम.

**९. सामाजिक व सामूहिक सेवा :--**

या विकास शीर्षाअंतर्गत मागासवर्गीय कल्याण या उपविकास शीर्षाखाली आदिवासी जनतेसाठी वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात व अनुक्रमांक ९ पैकी उर्वरित विकास शीर्षाअंतर्गत शासनाची इतर विभाग वैयक्तिक व क्षेत्रविकासाच्या योजना राबवितात.

**I. सामान्य शिक्षण :--** प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण.

**II. तांत्रिक शिक्षण :--**

(१) + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षण-- द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम, किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम.

(२) शालांत पूर्व व्यावसायिक शिक्षणात सुविधांची वाढ करणे.

(३) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

**III. क्रीडा व युवक कल्याण :--** आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खालीलप्रमाणे मुख्य योजना समाविष्ट आहेत.

(१) प्रत्येक गावात व्यायामशाळा व क्रीडांगण विकास.

(२) क्रीडांगणाचा विकास व तालुकापातळीवरील क्रीडांगणाचे बांधकाम.

(३) व्यायाम शाळांचा विकास.

(४) समाजसेवा शिबिरांचे आयोजन.

(५) ग्रामीण / शहरी क्षेत्रातील स्वयंसेवी संघटनांना वित्तीय सहाय्य.

**IV. कला व संस्कृती :--**

**V. सार्वजनिक आरोग्य :--** या आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.

**१. राज्यस्तरीय योजना :--**

(१) राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम.

(२) व्हिटॅमिन ए आणि ओरल रिहायड्रेशन सॉल्ट यांची खरेदी.

**२. जिल्हास्तरीय योजना :--**

(१) राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम

(२) पल्स पोलिओ प्रतिक्षेत्र कार्यक्रम.

(३) ग्रामीण रुग्णालयातील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील आंतररुग्णांना आहार सुविधा पुरविणे.

(४) अतिसंवेदनसील क्षेत्रासाठी १९९७-९८ मध्ये मंजूर केलेल्या योजना.

(५) दृष्टिदान योजना.

(६) प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र / ग्रामीण रुग्णालय बांधकाम.

(७) आरोग्य संस्थांना औषधी अनुदाने.

**VI. नागरी पाणीपुरवठा.**

**VII. ग्रामीण पाणीपुरवठा.**

**VIII. गृहनिर्माण.**

**IX. नगर विकास.**

**X. माहिती व प्रसिद्धी.**

**XI. मागासवर्गीयांचे कल्याण (स.क.वि.).**

**XII. मागासवर्गीयांचे कल्याण (आ.वि.वि.).**

**XIII. कामगार व कामगार कल्याण (उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन).**

**निष्कर्ष :--**

आदिवासींच्या विकासाच्या योजना तयार करताना आदिवासींच्या मुख्य समस्यांचा विचार करण्यात आला. त्यात आदिवासींचे जे शोषण होत होते ते थांबविण्याकरिता आदिवासींच्या आर्थिक उन्नतीकरिता या योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आदिवासींचे होणारे शोषण आज थांबविण्यात थोड्या-फार प्रमाणात का होईना सरकारला यश आले आहे. आदिवासींच्या शिक्षणाचा विचार करता आदिवासींच्या गावापर्यंत नाहीतर आदिवासींच्या वस्तीपर्यंत शिक्षणाची सुविधा शासनाने पुरविलेली आहे. ही सुविधा पुरविताना त्यांना आश्रमशाळांच्या सुविधा तर निवासीशाळा त्याचबरोबर वसतिगृहाच्या सुविधामुळे आदिवासींची मुले आज शिक्षण घेत आहेत. तसेच शहरी भागामध्ये आदिवासींच्या मुलांना शिक्षण घेता यावे याकरिता शासनाने इंग्रजी शाळा सुरू केल्या आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकरिता शहरात वसतिगृहे सुरू करून आदिवासींना शिक्षणाची सुविधा पुरविण्यात शासनाला यश आले आहे. जे उद्दिष्ट शासनाचे आहे ते पूर्तता होण्यास आज मदत झाली आहे. शेतीला होणाऱ्या कर्ज पुरवठ्यात पुर्वीच्या कालखंडात सावकार हा कर्जपुरवठा करीत होता. परंतु आज शेती व्यवसायाला आदिवासी विकासामार्फत सहकारी संस्थांची स्थापना करून शेतीला कर्जपुरवठा केला जात आहे. तर शेतीमालांची खरेदी ही आदिवासी विकासामार्फत होताना दिसते. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक ही या उद्दिष्टांमुळे काही प्रमाणात थांबलेली आहे. शेती व्यवसायाकरिता लागणारी अवजारे तर पाणीपुरवठ्याकरिता आवश्यक असलेल्या विहिरी, इलेक्ट्रिक पंप्स, डिझेल मशीन, पाईप लाईन करीता लागणारे पाईप अशा शेतीशी संबंधित आवश्यक असणारे अवजारे, साहित्य आदिवासींना मोफत तसेच अनुदानाच्या स्वरूपात पुरविण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर शेती व्यवसायाबरोबर जोड व्यवसाय करता यावा म्हणून दुग्ध व्यवसायाकरिता गाई, म्हशीचे मोफत वाटप करण्यात आले आहे. यावरून असे सिद्ध होते की, आदिवासींच्या विकासाकरिता आदिवासी विभागाने जी विविध उद्दिष्टे मांडली ती उद्दिष्टे काही प्रमाणात पूर्ण होताना दिसून येत आहेत. म्हणजेच आदिवासींचे जीवनमान उंचावण्याकरिता जी उद्दिष्टे शासनाने मांडली ती साद्य करण्याकरिता शासनाने केलेले प्रयत्न काही प्रमाणात का असेना पण यशस्वी होताना दिसतात.

**संदर्भ सूची :--**


(१) कुलकर्णी शौनक, "महाराष्ट्रातील आदिवासी", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

(२) नाडगोंडे, गुरूनाथ, (१९७९), "भारतीय आदिवासी", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती.

(३) भोईर भगवान, (१९९८), "उध्दवस्त पाखरे", स्वप्निल प्रकाशन, ठाणे प्रथम आवृत्ती.

(४) वार्षिक आदिवासी उपयोजना (२०१२-१३) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.

(५) लोकराज्य (ऑगस्ट २०१३).

(६) गोरे गोविंद (२००३) "आदिवासी विकास योजना", आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.

(७) आदिवासी विकास विभाग, माहिती पुस्तिका, २०११-१२.


❖❖❖

# 'सिकलसेल' जनजागृती एक गरज.

• श्रीमती रुपाली एम. देवरे,
नाशिक.

**प्रस्तावना :**

आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीच्या बाबतीत शिक्षणानंतर सार्वजनिक आरोग्य ही महत्त्वाची बाब समजली जाते. आदिवासींच्या सामाजिक सुधारणेच्या मार्गात आरोग्य विषयक नियमांची व औषधोपचाराविषयाची अनास्था हा एक मोठा अडथळा आहे. स्वच्छतेची राहणी, शुद्ध व पोटभर आहार ही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या साधनांपैकी दोन साधने आहेत. परंतु आदिवासींचे बहुतेक सर्व सामाजिक प्रश्न आर्थिक परिस्थितीशी निगडीत असल्यामुळे दरिद्री आदिवासींना स्वच्छतेची राहणी, समतोल आणि पोटभर आहार परवडत नाही. जिथे पिण्याच्या पाण्याची सोय नाही तिथे शुद्ध आणि मुबलक पाणी कसे मिळणार ? आणि तिथे उपाशीपोटी दिवस काढावे लागतात तिथे पोटभर व समतोल आहार कुठून मिळणार ? गरिबीमुळे आदिवासींना पिण्याच्या पाण्याची आणि पोटभर अन्नाची सोय आजपर्यंत करता आली नाही. अलिकडे शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा करणाऱ्या व आदिवासींच्या आरोग्यविषयक विविध समस्या सोडविणाऱ्या योजनांकडे शासनाने लक्ष वेधले आहे. त्यामुळे आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या सुटतील असा आशावाद निर्माण झाला आहे.

"आरोग्य म्हणजे सामाजिक भूमिका समर्थपणे निभावण्यासाठी लागणारी संपूर्ण तंदुरुस्ती."

संस्कृतीच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि धार्मिक अंगाप्रमाणे आरोग्यसुद्धा संस्कृतीचे एक अंग आहे. आरोग्यासाठी किंवा रोग प्रतिबंधनासाठी जे आचार-विचार आवश्यक असतात त्यांचा संस्कृतीमधील धार्मिक श्रद्धेशी किंवा अंधश्रद्धेशी संबंध असतो. आदिवासी समाजात वनस्पतीजन्य किंवा आधुनिक औषधे अशा विविध उपचार पद्धती समाजात अस्तित्वात आहेत. तंत्रमंत्र आणि धार्मिक उपचारही विशेषत: आदिवासी समाजात आढळतात. प्रत्येक समाजात औषधोपचार करणारे व्यावसायिक असतात. त्याप्रमाणे आदिवासी भागात भगत किंवा वैदू यांचा प्रभाव दिसून येतो. कारण त्यांना जंगलातील वनस्पतींची चांगली माहिती असते. त्याचप्रमाणे उपचारासाठी ते तंत्रमंत्राचाही वापर करतात. तसेच ते नात्यागोत्यातलेच असतात आणि उपचारासाठी ते कायम सापडतात. त्यामुळे आदिवासींचा त्यांच्यावर विश्वास असतो. परंतु सरकारच्या आरोग्यविषयक उपयोजनांमुळे यांचा प्रभाव कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

**आरोग्य आणि आदिवासी उपयोजना :**

प्रथमत: क्षेत्र विकासाची कल्पना आदिवासी क्षेत्रात होती. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी आदिवासी उपयोजनांची संकल्पना मांडली. त्यामुळे क्षेत्र विकासाची कामे सुरू झाली. परंतु क्षेत्राबाहेरील आदिवासींचा विकास व्हावा म्हणून क्षेत्र बंधन करण्यात आले त्यानंतर व्यक्ती विकासाची कल्पना आली.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकासासाठी तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रांत व क्षेत्राबाहेरील आदिवासी विकासाच्या योजनांची परिणामकारक शीघ्र गतीने अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने मंत्रालय पातळीवर आदिवासी विकास विभाग निर्माण करण्यात आला. १९७५-७६ पासून एकात्मिक आदिवासी प्रकल्पामध्ये गुंतवलेल्या सर्व मार्गाने मिळणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी आदिवासी उपयोजना सुरू करण्याची कल्पना साकार होऊ लागली.

या आदिवासी उपयोजनेअंतर्गत ९ मुख्य विकासशीर्षाखाली आदिवासी जनतेकरिता विविध वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्र विकासाच्या योजना राबविण्यात येतात.

त्यातील ९ नंबरच्या सामाजिक व सामूहिक सेवा या योजनेत आरोग्यविषयक उपयोजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्याला सार्वजनिक आरोग्य असे नाव देण्यात असून त्या अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात.

या सर्व योजना व त्यापासून मिळणारे लाभ आदिवासी जनतेपर्यंत विविध आरोग्य संस्थांद्वारे पोहचविले जातात. या आरोग्य संस्थांमध्ये १) उपकेंद्र, (२) प्राथमिक आरोग्य केंद्र, (३) ग्रामीण रुग्णालय, (४) जिल्हा रुग्णालय यांचा समावेश होतो.

वरील आरोग्य संस्थांद्वारे आदिवासींना ज्या विविध आरोग्यविषयक उपयोजनांचा लाभ मिळवून दिला जातो. त्यापैकी 'सिकलसेल' आजारावर संशोधिकेने या लेखात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कारण आजपर्यंत मातृत्व अनुदान योजना, कुपोषण निर्मूलन कार्यक्रम, कुष्ठरोग, क्षयरोग, यांचा आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झालेला आहे. परंतु त्यामानाने 'सिकलसेल' आजाराविषयक आदिवासींमध्ये जनजागृती हव्या त्या प्रमाणात झालेली नाही. 'सिकल सेल' आजार हा अनुवंशिक असल्याने या आजाराविषयी प्रचार, प्रसार व जनजागृती होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

**'सिकल सेल' आजार :**

सन १९१० मध्ये पहिल्या प्रथम जे. बी. हॅरिस या शास्त्रज्ञाने या आजाराचा उल्लेख केला. त्यानंतर १९२७ साली हटीन व गिलेस्पी यांनी खोलवर अभ्यास करून हा आजार रक्तामधील लाल पेशी फुटल्यामुळे होतो. हे सिद्ध केले. पॉलिंग व त्याच्या साथीदारांनी अथक परिश्रमानंतर १९४९ साली दोषी हिमोग्लोबीनमुळे लाल पेशी फुटतात व हा आजार होतो हे सिद्ध केले. १९८३ मध्ये गडचिरोलीत एक रुग्ण आढळून आला.

हा एक अनुवंशिक आजार आहे. अनिमिया म्हणजे अंगातील रक्तातील लाल पेशी, पांढऱ्या पेशी, चपट्या पेशी असतात. या सर्व पेशी आपल्या शरीरातील हाडांच्या रसामध्ये (बोन मॅरोमध्ये) असणाऱ्या पेशीपासून तयार होत असतात. जन्मापासून मरेपर्यंत हे काम कायम चालू असते. काही वेळा स्टेमसेलमध्ये जन्मत: काही दोष असतात. त्यामुळे लाल पेशी तयार होण्याची प्रक्रिया मंदावते. हिमोग्लोबीन लाल पेशींमध्येच असल्याने पर्यायाने हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होते व ॲनिमिया होतो. अशा तऱ्हेने जन्मत: स्टेमसेलमधील असणाऱ्या दोषामुळे होणाऱ्या अनेक प्रकारच्या ॲनिमियापैकी सिकलसेल ॲनिमिया हा एक प्रकार आहे.

सिकल हा इंग्रजी शब्द शेतामधील पिके कापण्याचा वक्राकार किंवा वर्तुळाकार विळा किंवा कोयता असा याचा अर्थ. सिकलसेल ॲनिमिया हा आजार रक्तामधील लाल पेशीमधील असणाऱ्या दोषामुळे होतो. निरोगी माणसाच्या रक्तामधील लाल पेशी सूक्ष्मदर्शक यंत्राखाली पाहिल्या असता त्या साधारणपणे गोलाकार दिसतात. ह्या पेशी बोन मॅरोमधील स्टेमसेलपासून तयार होत असतात. काही वेळा ह्या स्टेमसेलपासून तयार होणाऱ्या लाल पेशीमधील हिमोग्लोबीन वेगळ्या प्रकारचे असते. अशा हिमोग्लोबीनमधील प्रथिने हिमोग्लोबीन रक्त असे नाव दिले गेले आहे. अशा रुग्णांच्या लाल पेशींना सिकल लाल पेशी व दोषाला सिकलिंग गुणधर्म असे नाव दिले गेले आहे. सिकल पेशी बोनमध्ये असून जेव्हा रक्तात येतात, तेव्हा अशा लाल पेशींचे आयुष्यमान कमी होते व त्या लवकर फुटतात. त्यामुळे रक्तातील एकूण लाल पेशींची संख्या कमी होते व ॲनिमिया होतो. त्यामुळे या आजाराला सिकलसेल ॲनिमिया असे नाव दिले आहे.

तांबड्या पेशींचे सूक्ष्मदर्शक यंत्राखाली परिक्षण केल्यास, निरोगी पेशी (गोलाकार) तर सिकलसेल पेशी (कोयत्यासारख्या) आढळतात.




**सिकल सेल आजाराची लक्षणे :**

(१) अशक्तपणा, (२) सांधेदुखी, (३) सांधे सुजणे, (४) कावीळ झाल्यावर व्यक्ती पिवळी दिसते, (५) सतत तब्येत बिघडणे, (६) डोळे खराब दिसतात, (७) जखम झाली तर लवकर सुधारत नाही. (८) लघवी करताना त्रास होतो.

**सिकल सेल आजारावरील उपाय :**

या आजाराला रामबाण उपचार नाही. तरी रुग्णाला त्रास होऊ नये यासाठी खालील काळजी घेणे आवश्यक आहे.

(१) या रुग्णांची रोग प्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे रोग प्रतिबंधक लसीकरण करणे अत्यावश्यक असते.

(२) या रुग्णांना .......... हिपॅटायटीस-बी चे लसीकरण करणे आवश्यक आहे.

(३) रुग्णांनी थंडीपासून बचाव करावा.

(४) उन्हाळ्यात व इतर दिवशी भरपूर पाणी प्यावे.

(५) घरातील वातावरण खेळते ठेवावे. दरवाजे / खिडक्या बंद करून स्वयंपाक करू नये.

(६) तोंडावर पांघरूण घेवून झोपू नये.

(७) जास्त थकेपर्यंत काम अथवा व्यायाम करू नये. गरजेनुसार आराम करावा.

(८) बाहेर खाणे टाळावे.

(९) कमी हवेचा दाब असलेल्या उंच व थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचे टाळावे.

(१०) उघड्या विमानात / हेलिकॉप्टरमध्ये प्रवास करण्याचे टाळावे.

(११) समुद्राच्या पाण्याखाली जाऊन काम करणाऱ्या पाणबुड्याची नोकरी टाळावी.

(१२) संतुलीत आहार घ्यावा. त्यात हिरव्या पालेभाज्यांचे प्रमाण जास्त असावे.

(१३) फळांचे सेवन करावे.

(१४) डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रोज एक फोलिक ॲसिडची गोळी व व्हीटामीन बी-कॉम्प्लेक्स व झिंकच्या कॅप्सूल अथवा सायरप नेहमी व नियमित घ्यावे.

(१५) सोडीयम बायकार्बोनेटच्या गोळ्या क्रायसीसच्या वेळी काही दिवस नियमित घ्याव्यात.

(१६) डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पेनिसिलीनच्या गोळ्यांचा काही वर्षे सतत वापर करावा.

(१७) डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दुखण्यावरील औषधे घ्यावीत.

(१८) नुकतेच **हायड्रॉक्सी युरीया** हे नवे औषध बाजारात उपलब्ध झाले आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हे औषध घेतल्यास रुग्णांना वेदनांपासून ५०% आराम मिळतो. असे आढळून आले आहेत. या औषधांच्या नियमित सेवनाने रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होत नाही. त्यामुळे रुग्णांना वारंवार रक्त देण्याची गरज भासत नाही. परंतु हे औषध महाग असल्यामुळे गरीब रुग्णांना परवडण्यासारखे नाही. परंतु हे औषध सुरू असताना रुग्णाची नियमित रक्त तपासणी करावी लागते.

**सिकलसेल आजाराचे प्रकार :**

(१) सिकलसेल वाहक (Hb AS Pattern)

(२) सिकलसेल रुग्ण (Hb SS Pattern)

रक्तात सिकलसेल आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी सोल्युबिलिटी पद्धत वापरतात. त्यासाठी रक्ताचा एक थेंब व १० मिनिटांचा वेळ लागतो. सिकलसेलचा पॅटर्न ठरविण्यासाठी इलेक्ट्रोफोरेसिस पद्धतीचा वापर करतात. त्यासाठी दोन मिली लिटर रक्त व दोन तासाचा वेळ लागतो.

निसर्ग नियमानुसार अपत्याच्या निर्मितीसाठी आईकडून एक व वडिलांकडून एक असे दोन जिन्स सहभागी होतात. ज्या अपत्यामध्ये आई आणि वडिलांकडून प्रत्येकी एक-एक जिन्स (Hb A + NbA) सहभागी होतो, तेव्हा निरोगी अपत्य (Hb AA) जन्मास येते. ज्या अपत्यामध्ये दोघांपैकी एकाकडून निरोगी जिन (Hb A) व दुसऱ्याकडून सिकलसेल जिन (HbS) सहभागी होतात तेव्हा सिकलसेल वाहक अपत्य (Hb AS) जन्मास येते आणि ज्या अपत्यांमध्ये दोघांकडून प्रत्येकी एक-एक सिकलसेल जिन (HbS + HbS) सहभागी होतो तेव्हा सिकलसेल रुग्ण अपत्य (HbSS) जन्मास येते. सिकलसेल गर्भधारणेच्या प्रथम क्षणीच होत असतो. ह्या क्षणापासून ते व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत सिकलसेलचा एकदा निर्धारित झालेला पॅटर्न (AS किंवा SS) बदलत नाही किंवा औषधांचे सहाय्याने त्याला बदलविता येत नाही.

महाराष्ट्रात अंदाजे ३० लाख व्यक्ती सिकलसेल वाहक व १.५ लाख व्यक्ती सिकलसेल आजाराने ग्रस्त असावेत असा अंदाज आहे यापैकी १०.५० लाख सिकल सेल वाहक व ७० हजार सिकलसेल ग्रस्त रुग्ण हे आदिवासी समाजातील असावेत असा अंदाज बांधला जात आहे. सिकलसेल आजार जनजागृती व नियंत्रण कार्यक्रमाची सुरूवात सन २००७ पासून झाली. पण नाशिकमध्ये नोव्हेंबर २००८ पासून या कार्यक्रमांची सुरूवात झाली असून प्रकल्पाच्या सर्वेक्षणानुसार नाशिकच्या आदिवासी जिल्हातील एकूण ९ आदिवासी तालुक्यांमध्ये ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १३ ग्रामीण रुग्णालयांच्या कक्षेत सिकलसेल आजार जनजागृती व नियंत्रण कार्यक्रम सुरू आहे. आजपर्यंत जिल्ह्यात एकूण ४,६०,२७९ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये १५९५ वाहक व्यक्ती व ५८ सिकलसेलग्रस्त आढळून आले. नाशिकच्या प्रकल्प सर्वेक्षणानुसार आदिवासी तालुक्यामधील लोकसंख्या १२.०२ लाख इतकी असून आजमितीस झालेल्या रक्त चाचण्यांमधून सिकलसेल आजाराचे प्रमाण ५ ते ७% आढळते. हे प्रमाण वाढू नये यासाठी आदिवासी भागात सिकलसेल आजाराची कारणे, लक्षणे, परिणाम या विषयाची माहितीचा प्रसार होणे आवश्यक आहे.

**सिकलसेलच्या रुग्णांसाठी केंद्र सरकारचे प्रयत्न :**

(१) केंद्र शासनाने सिकलसेलचे नियंत्रण व्हावे म्हणून डिसेंबर २००७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण अभियानात याचा समावेश केला आहे व राज्याच्या मागणीनुसार आर्थिक मदत दिली जाते.

(२) देशातील सिकलसेल रुग्णांना मोफत रक्त प्रदान करण्याचा निर्णय केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने जुलै २००९ मध्ये घेतलेला आहे.

**सिकलसेलच्या रुग्णांसाठी राज्य शासनाच्या सोयी-सुविधा :**

(१) सिकलसेल रुग्णांना शासकीय व निमशासकीय दवाखान्यात मोफत रक्त, औषधे व उपचार दिला जातो.

(२) रुग्णांना अविलंब आरोग्य सेवा मिळावी म्हणून ओळखपत्र दिले जाते.

(३) सिकलसेल बाल रुग्णांसाठी अतिदक्षता वॉर्ड उपलब्ध आहे.

(४) संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दुर्धर आजार असलेल्या व्यक्तींना रुपये ६००/- प्रती महिना आर्थिक मदत.

(५) गर्भजल परिक्षणासाठी मोफत सुविधा उपलब्ध.

(६) प्राथमिक आरोग्य केंद्रात सोल्युबिलिटी पद्धतीने रक्त तपासणी व ग्रामीण रुग्णालयात इलेक्ट्रोफोरोसीस पद्धतीने ए एस / एस एस पॅटर्नची तपासणीची सोय उपलब्ध करून दिलेली आहे.

(७) सामान्य जनतेच्या जनजागृतीसाठी ११ ते १७ डिसेंबरदरम्यान सिकलसेल नियंत्रण सप्ताह राबविला जातो.

(८) गुंतागुंतीच्या सिकलसेल रुग्णांना जिल्हा रुग्णालयात आणि गंभीर आजारी रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार दिले जातात.

**सारांश :**

थोडक्यात, सिकलसेल हा आजार अनुवंशिक असून त्याचे प्रमाण वाढू न देण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार हे कितीही प्रयत्न करत असले तरी या आजाराच्या उच्चाटनासाठी सर्वांना सहकार्य करणे गरजेचे आहे. आफ्रिकेतील नागरिक त्यांच्या रुग्णांना मदत करतात. अमेरिकेतील नागरिक सिकलसेल रुग्णांसाठी स्वेच्छेने काम करतात. तसेच आपल्या देशातील नागरिकांनी सिकलसेल रुग्णांसाठी आपला वेळ देऊन सिकलसेल आजाराचा प्रचार करावा. तसेच पुढील काही गोष्टी करून सिकलसेलच्या उच्चाटनास मदत करावी.

(१) सिकलसेल रुग्णांच्या शिक्षणासाठी मदत करावी कारण हे रुग्ण कोणतेही मेहनतीचे काम करू शकत नाही म्हणून ते जर शिकले तर

त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळतील व त्यामुळे त्यांना चांगले जीवन जगणे सोपे होईल.

(२) समाजातील प्रत्येकाने स्वेच्छेने रक्तदान करावे कारण या रुग्णांना वारंवार रक्त द्यावे लागते.

(३) सिकलसेल रुग्णांत वाढ होऊ नये यासाठी लग्न ठरविताना कुंडली-मिलन केले नाही तरी चालेल पण रक्त तपासणी मात्र नक्की करून घ्यावी. (सिकलसेल तपासणी).

(४) आदिवासी भागात जनजागृती सिकलसेल आजाराबद्दल व्हावी यासाठी पथनाट्ये, चर्चासत्र, शिबिरे यांचे आयोजन करावे.

**संदर्भ सूची :**

(१) नागपूरे भावना, (डिसेंबर २०१०) महाराष्ट्र आरोग्यपत्रिका,

(२) रामटेके संपत (डिसेंबर २०१०) महाराष्ट्र आरोग्यपत्रिका, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.

(३) काटे सु. ल. (जुलै-सप्टेंबर २००३) सिकलसेल ॲनेमिया, हाकारा, पुणे.

(४) नायडू रोहिणी, 'सिकलसेल आजार' गौरी सामाजिक कल्याणकारी संस्था, नाशिक.

❖❖❖

# 'आदिवासी क्षेत्रातील तीन जलप्रणालीचा जलसंपत्तीच्या विकासासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा उपयोग तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे.'

• डॉ. विलास रामचंद्र उगले.

**प्रस्तावना :**

भूपृष्ठावरील प्रत्येक जलप्रवाहाच्या पहिल्या प्रवाहापासून पाण्याचे संरक्षण केले पाहिजे. जलस्त्रोतांचे व्यवस्थापन करून त्यांचे योग्य प्रकारे संरक्षण करण्यासाठी विशिष्ठ असा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. सदरच्या अभ्यास संशोधनात आदिवासी क्षेत्रामध्ये पर्जन्य कालखंडामध्ये सर्वात जास्त पर्जन्य पडत असतो, डिसेंबरपासून डोंगर दऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जलाची टंचाई निर्माण झालेली दिसून येते. यासाठी जलाच्या संरक्षणाकरिता भौगोलिक माहिती प्रमाणालीचा विचार केला पाहिजे. पुणे जिल्ह्यातील, आंबेगाव तालुक्यातील मध्य भागातील परंतु आदिवासी प्रवण क्षेत्रातील विशिष्ठ गावातील जल प्रणालीचा विचार केला आहे. तालुक्याच्या पश्चिम भागात पर्जन्य कालखंडात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. डिसेंबर ते मे महिन्यात पर्जन्य नसल्याने, त्यांचा परिणाम घरगुती आणि कृषी क्षेत्रावरसुद्धा काही मर्यादा पडतात. या सर्वाची परिणीती म्हणून स्थानिक गावातील लोक बिगर पर्जन्य काळात रोजगारासाठी इतर ठिकाणी स्थलांतर करतात. हे कोठेतरी थांबले पाहिजे म्हणून, पर्जन्य काळात वेगवेगळ्या जलसाठ्याचे पुनर्भरण होण्यासाठी बंधारे बांधून पाण्याची साठवण क्षमता वाढविता येईल यासाठी विशिष्ट प्रयत्न करणे काळाची गरज आहे. भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने स्थानिक लोकांच्या सहभागातून योग्यप्रकारे पाण्याची साठवण करता येऊ शकते. भौगोलिक दृष्टीकोनातून विचार केला तर प्राकृतिक रचनेचा संबंध जोडल्यास छोटे-छोटे बंधारे बांधताना तीन वेगवेगळ्या जलप्रवाहाचा विचार केला आहे. हे तीनही प्रवाह घोडनदीचे उपप्रवाह आहेत. यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा उपयोग झाला आहे. अस्तित्वात असलेले पर्जन्य, विशिष्ट अशी प्राकृतिक रचना, यांचा सखोल विचार करून जलसाधन संपत्तीची साठवण क्षमतेसाठी योग्य नियोजन करणे पर्यावरणीयदृष्ट्या शक्य होते. सदर अभ्यास क्षेत्रातील जलसाधन संपत्तीच्या साठवण क्षमतेमध्ये वाढ होण्यासाठी प्रयत्न केला आहे.

आदिवासी क्षेत्रातील जलव्यवस्थापन मुख्य हेतू माती, पाणी या साधनसंपत्तीचे व्यवस्थापन करणे ही आजच्या काळाची गरज आहे. जलस्त्रोताद्वारे प्राप्त झालेल्या, पावसाच्या पाण्याद्वारे पुनर्भरण करण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाल्यास कृषीक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासाबरोबरच समाजातील इतर अनेक प्रकारच्या गरजा पूर्ण होऊ शकतात. भविष्यात कालखंडामध्ये पाण्याची नितांत गरज निर्माण होणार आहे. त्यासाठी पाण्याचे प्रदेश निश्चित करणे काळाची गरज आहे. प्रथम जलप्रवाहाद्वारे पाण्याचे पुनर्भरण करीत असताना योग्य ठिकाणी बंधारे बांधण्याचे काम हाती घेणे आजमितीला गरज निर्माण झाली आहे. बंधारे बांधकाम करीत असताना पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन करणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे होणारे बाष्पीभवनाचा विचार, सप्तर्षी (१९९३), भगत (२००२), भगत आणि सप्तर्षी (२००४) यांनी केला आहे. आजच्या औद्योगिक क्रांतिमुळे प्रत्येक शेतकरी बांधव आपल्या विहिरी व कूपनलिकेचे जाळे निर्माण केले आहे. त्यामुळे जलस्त्रोतांची पातळी अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीची निर्माण झाली आहे. यांचा विचार करून पाण्याच्या प्राथमिक ते शेवटच्या स्त्रोतापर्यंत अनेक घटक पाण्याचे पुनर्भरण करीत नसतात त्यांचा कधीच विचार शेतकरी, सामान्य मानव करीत नाही. यासाठी सर्वसामान्य व्यक्तीला, शेतकऱ्याला विश्वासात घेऊन बंधाऱ्याचे पूर्वी काम होत नव्हते. त्यासाठीच भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) च्या उपयुक्ततेमुळे शक्य झाले आहे.

मोठ्या धरणापेक्षा किंवा मोठ्या बंधाऱ्यापेक्षा लहान आकाराचे बंधारे बांधकाम करीत असताना शेतकरी व सामान्य जनतेला स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे शक्य झाले आहे. पावसाच्या पाण्यामुळे जमिनीतील उपसा केलेले पाण्याचे पुनर्भरण करणे शक्य झाले आहे. आंबेगाव तालुक्यातील तीन स्त्रोतांचा मुख्य हेतू जलव्यवस्थापनांचे नियोजन करणे काळाची गरज लक्षात घेऊन भौगोलिक माहिती प्रणालीचे तंत्रज्ञान फार उपयुक्त ठरू शकते.

**अभ्यास क्षेत्र :**

अभ्यास क्षेत्राची निवड पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील आठ गावांच्या समोच्यदर्शक रेषेचा उपयोग करून घेतला. समोच्यदर्शक नकाशातील अक्षवृत्तीय विस्तार १९ अंश ते १९.५ अंश रेखावृत्तीय विस्तार ७३.४५ अंश ते ७३.५२ आहे. सदरचे अभ्यास क्षेत्र घोड नदीच्या उपप्रणालीचे तीन स्त्रोत विचारात घेतले आहे. त्यामध्ये देवीचा ओढा, करजूबाईचा ओढा, सालोबांचा ओढा या भागातील १०० सें.मी. ते ८० सें.मी. पर्जन्यमान आहे. प्राकृतिकदृष्ट्या विचार केला तर उतार अतिशय तीव्र स्वरूपाचा आहे. हा भाग पश्चिम घाटातील डोंगर रांगेचा आहे.

**कल्पना :**

अभ्यास क्षेत्राचा विचार करीत असताना भौगोलिक माहिती प्रणालीच्या साह्याने पुनर्भरण करण्यासाठी जलस्त्रोताच्या सिंचनासाठी बंधाऱ्याचे क्षेत्र शोधणे.

**उद्दिष्ट :**

पडणाऱ्या पर्जन्याच्या उपलब्धतेनुसार पुनर्भरण करताना भौगोलिक माहिती प्रणालीच्या सह्याने किती क्षेत्रावर पाणी उपलब्ध होते ते पहाणे.

**तंत्रज्ञान :**

भौगोलिक माहिती प्रणाली तंत्रज्ञानाचा उपयोग करून पडणाऱ्या पर्जन्याच्या उपलब्धतेनुसार पुनर्भरण होईल अशा बंधाऱ्यांची निर्मिती करणे. या तंत्रज्ञानात अस्तित्वात असणाऱ्या वेगवेगळ्या समोच्चरेषा, जलप्रणाली व गावाच्या सीमा यांचा विचार केला गेला आहे.

**पद्धती :**

अस्तित्वात असणाऱ्या समोच्च रेषेमधील सर्वात कमी व सर्वात जास्त किंमत यांच्या सहाय्याने भौगोलिक माहिती प्रणालीचे तंत्रज्ञान आपणास बंधाऱ्याचे क्षेत्र दर्शविते. दर्शविलेले क्षेत्र व त्या क्षेत्रात पडणाऱ्या पाऊसाची सरासरी यांचा उपयोग करून किती मीटर हेक्टर पाणी उपलब्ध होऊ शकते. त्याचप्रमाणे पहिला प्रवाह ते पाचव्या प्रवाहापर्यंत विहिरींना पुनर्भरणासाठी उपयोग होऊ शकतो का ? ते तपासण्यासाठी गावाच्या तीन प्रवाहांचा विचार केला आहे.

**जलस्त्रोतांचे व्यवस्थापन :**

जलस्त्रोतांच्या विकासासाठी प्रामुख्याने भौगोलिक घटकांमधील प्राकृतिक घटकांचा विचार करणे गरजेचे आहे. भौगोलिक घटकातील जलस्त्रोतांचा संबंध मानवी साधन संपत्तीच्या विकासाशी लावला जातो. पूर्वी ज्या भागात पाण्याची उपलब्धता होती त्या परिसरातील वस्त्यांचे जाळे किंवा मानवी वस्त्यांचे केंद्रीकरण झालेले दिसून येते. याचाच आधार घेऊन ज्या परिसरातील भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने निर्माण केले जाणारे बंधाऱ्यांच्या निर्मितीमुळे समाजाच्या विकासाबरोबरच कृषी क्षेत्राचा विकास चांगल्या प्रकारे करता येऊ शकतो. विकास प्राकृतिक घटकांशी निगडीत असल्याने त्यांचा टिकण्याचा कालखंड जास्त असू शकतो. अभ्यास क्षेत्रामध्ये जून ते सप्टेंबर काळात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो तर मार्च ते मे या कालखंडात चार गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. चार गावे टँकरमुक्त करण्यासाठी आणि जलस्त्रोताद्वारे पुनर्भरण करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा विचार करणे आजमितीला शक्य झाले आहे.

**तक्ता क्रमांक - १**

जलप्रणालीच्या व्यवस्थापनात भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर

| एकूण बंधाऱ्यांची संख्या | सरासरी पर्जन्यांचे पुनर्भरण हेक्टरमध्ये | एकूण क्षेत्रावरील पर्जन्याद्वारे पुनर्भरण | सरासरी पर्जन्यमान मिली मीटर | एकूण साठवण क्षमता (मीटर हेक्टर) मध्ये |
|---|---|---|---|---|
| १०६ | ४.९९ | ५२८.९४ | ८०० | ४२३.१५ |
| ६५ | ९.९९ | ६४९.३५ | ८०० | ५१९.४८ |
| ४८ | १४.९९ | ७१९.५२ | ८०० | ५७५.६१ |
| ३७ | १९.९९ | ७३९.६३ | ८०० | ५९१.७० |

वरील आकडेवारीचा विचार केला तर त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बंधाऱ्यांच्या मापनांचा विचार केला आहे. त्यावरून ४.९९, ९.९९, १४.९९, व १९.९९ हेक्टरच्या क्षेत्रातील जलप्रणालीच्या स्त्रोताच्या पाण्याचे पुनर्भरण करीत असताना मोठ्या धरण क्षेत्रापेक्षा छोटे-छोटे आकाराचे बंधारे बांधले तर त्याचा फायदा कृषीक्षेत्राबरोबरच सामान्य जनतेला पाण्याचा उपयोग होऊ शकतो. वरील आकडेवारीच्या सहाय्याने हेक्टरचा विचार केला तर शेवटच्या ३७ बंधाऱ्यांपैकी उपयोग ४ बंधाऱ्याचे बांधकाम केले तर ६३.९६ मीटर हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले तरी दोन गावांना पाणीपुरवठा होऊ शकतो. त्यापैकी पहिले गाव फदालेवाडी, उगलेवाडी व दुसरे गाव शिनोली यांना या बंधाऱ्याचा उपयोग चांगला होऊ शकतो.

**करजुबाईचा ओढा :**

या जलप्रणालीमध्ये दोन गावांचा समावेश होतो. एकूण लोकसंख्येचा विचार केला तर १९५३ इतकी आहे. हा भाग व्ही आकाराच्या दरीसारखा आहे. सरासरी पर्जन्यमान या भागातील ८०० मिली मीटर आहे. भौगोलिक माहिती प्रणालीने सहमत केलेले आकडेवारीचे चार विभाग केले आहेत. त्यांचा टेबल तक्ता क्रमांक २ नुसार माहिती देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक - २**

जलप्रणालीच्या व्यवस्थापनात भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर

| एकूण बंधाऱ्यांची संख्या | सरासरी पर्जन्यांचे पुनर्भरण हेक्टरमध्ये | एकूण क्षेत्रावरील पर्जन्याद्वारे पुनर्भरण | सरासरी पर्जन्यमान मिली मीटर | एकूण साठवण क्षमता (मीटर हेक्टर) मध्ये |
|---|---|---|---|---|
| ८६ | ४.९९ | ४२९.१४ | ८०० | ३४३.३१ |
| ३९ | ९.९९ | ३८९.६१ | ८०० | ३११.६८ |
| २७ | १४.९९ | ४०४.७३ | ८०० | ३२३.७८ |
| २१ | १९.९९ | ४१९.७९ | ८०० | ३३५.८३ |

वरील आकडेवारीचा विचार केला तर या भागातील ३३५.८३ मीटर हेक्टर क्षेत्र फार उपयुक्त ठरू शकते. कारण कमी बंधाऱ्यामध्ये जास्त पाणी आडू शकते. ही जलप्रणाली करजूबाईच्या ओढ्या संदर्भातील आहे. त्यामुळे त्यांचा फायदा पोखरकरवाडी पेक्षा पिंपळगाव घोडा गावाला जास्त होईल. यासाठी ३ बंधारे बांधले तर एकूण ४७.९७ मीटर हेक्टर पाणी गावाला मिळू शकते.

**सालोबांचा ओढा :**

सालोबांच्या ओढ्यामुळे १०,८९२ लोकसंख्येला उपयुक्त ठरू शकते. त्या दृष्टीकोनातून विचार केला तर जास्त बंधाऱ्यांची संख्या असूनही जलक्षेत्राखालील क्षेत्र कमी असल्याचे तक्ता क्रमांक ३ व दिसून येते.

**तक्ता क्रमांक - ३**

जलप्रणालीच्या व्यवस्थापनात भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर

| एकूण बंधाऱ्यांची संख्या | सरासरी पर्जन्यांचे पुनर्भरण हेक्टरमध्ये | एकूण क्षेत्रावरील पर्जन्याद्वारे पुनर्भरण | सरासरी पर्जन्यमान मिली मीटर | एकूण साठवण क्षमता (मीटर हेक्टर) मध्ये |
|---|---|---|---|---|
| २४६ | ४.९९ | १२२७.५४ | ८०० | ९८२.०३ |
| १२१ | ९.९९ | १२०८.७९ | ८०० | ९६७.०३ |
| ८९ | १४.९९ | १३३४.११ | ८०० | १०६७.३ |
| ६८ | १९.९९ | १३५९.३२ | ८०० | १०८७.५ |

वरील तक्त्यांचा विचार केला तर जास्त हेक्टरखालील क्षेत्र असलेल्या भागाचे बंधारे घेतले तर चार गावांच्या लोकसंख्येला व कृषीला फार उपयोगी ठरू शकतात. त्यामुळे अनेक विहिरी व कूपनलिकेचे पुनर्भरण होऊ शकते. त्यासाठी नकाशात दिलेल्या ठिकाणांपैकी वेगळ्याच रंगाने दर्शविलेले पाच बंधारे पुरेसे होऊ शकतात. या पाच बंधाऱ्याखालील क्षेत्र ७९.९५ मीटर हेक्टर क्षेत्रात पाणी आडविले जाऊ शकते. त्यामुळे प्रत्येक गावाला त्याचा फायदा होऊ शकतो. यासाठी ग्रामसभेला विश्वासात घेऊन ही प्रणाली उपयोगात आणली जाऊ शकते. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला त्याची माहिती प्राप्त होऊ शकते.

**निष्कर्ष :**

अभ्यास क्षेत्राचा विचार केला तर, या तंत्रज्ञानामुळे स्थानिक लोकांच्या सहभागामुळे बंधाऱ्याचे बांधकामाचा आकार निश्चित होईल. त्यामुळे पर्जन्याच्या पाण्याचे चांगल्या प्रकारे पुनर्भरण होण्यास मदत होईल. आदिवासी क्षेत्रातील भागात आजच्या कालखंडात लहान लहान बंधारे परंतु उपयुक्त असतील त्यांचा फायदा सर्व स्थानिकांना होईल त्यांचा परिणाम डिसेंबर ते मे मध्ये होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होईल.

**संदर्भ :**


1. Maximisation of Water Resource Harvesting Using GIS in the Ambegaon Tahsil, Dist. Pune (Maharashtra) Dr. Vilas R. Ugale, Dr. Praveen G. Sapatarshi, Dr. Jyotiram More, June (2007).
2. Social Impact of Dimbhe Dam in The Ambegaon Tahsil, Dist. Pune (Maharashtra),
   Dr. Vilas R. Ugale, Dr. Praveen G. Sapatarshi, January (2005).
3. Threat to Sustatinability of Livelihood due to Dimbhe Dam in the Submerged area of the Ambegaon Tahsil, Dist. Pune. Dr. Vilas R. Ugale, Dr. Praveen G. Sapatarshi, Dr. Jyotiram More June.
4. Saptarshi P. G. (1993) : "Resource appraisal and planning strategy for the Droughtprone areas A case study of the Karjat Tashil Dist. Ahmadnagar, Maharashtra, Unpublished Ph.D. thesis Submitted to University of Pune- 411 007. P. p. 232.
5. Bhagat V. S. (2002) : "Agro-Based Model for substainable Development in the Purandhar Tahsil of the Pune district Maharashtra" Ph.D. thesis. P.p. 271.
6. Williamson (1925) : Irrigation in Indo Gangatic Plain Geographical Journal Vol. p.p. 141-153.


**संज्ञा :**

GIS भौगोलिक माहिती प्रणाली, Water Resource जल साधनसंपत्ती Conservation संरक्षण Watershed जलविभाजक Season मोसम, ऋतू Water body जलाशय.

❖❖❖

# आदिवासींचे शिक्षण, काल आणि आज ...

• राजेंद्र मरसकोल्हे,

संयुक्त राष्ट्राने २०१० साली मानवी विकासाबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला. त्या अहवालात भारतातील बिहार, छत्तीसगड, झारखंड, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान आणि पश्चिम बंगाल येथील ४२ कोटी जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असून तेथील स्थिती आफ्रिकेतील अतिदरिद्री मानल्या गेलेल्या २६ देशांपेक्षाही हलाखीची आहे, असे या अहवालात नमूद केले आहे. सुदैवाने त्यात महाराष्ट्रातील आदिवासींच्या दारिद्र्याचा, गरिबीचा आणि शिक्षणाच्या दुरावस्थेचा उल्लेख नाही. छत्तीसगड, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, झारखंड ही आदिवासी बहुल राज्ये म्हणून सर्वपरिचित आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अहवालात महाराष्ट्राचा उल्लेख नसल्याने महाराष्ट्रातील जे अतिदरिद्री आहेत त्यांची अवस्था उल्लेखिलेल्या राज्यांच्या गोरगरिबांपेक्षा चांगली आहे, असा याचा अर्थ आपल्याला आपल्या सोयीने काढावा लागेल. महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, जव्हार, भामरागड, मेळघाट, पांढरकवडा, डहाणू, तलासरी इ. सारखे आदिवासी तालुके त्यांच्या महत्तम मागासलेपणासाठी, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, निवारा, रस्ते, पाणी, कुपोषण, कुमारी मातांचे प्रश्न, नक्षलवाद, बेरोजगारी, रोजगारासाठी स्थलांतर यासारख्या समस्यांसाठी नेहमी त्या-त्या भागात चर्चेत राहिले आहेत. त्यातच केंद्र आणि राज्य शासनाच्या हजारो कोटी रुपयांच्या तरतूदीनंतरही आदिवासींचे शिक्षण हा महत्त्वाचा मुद्दा अत्यंत दूर्लक्षित आणि कामापूरता चर्चेचा राहिला आहे.

भारतात स्वातंत्र्यापूर्वी इस्ट इंडिया कंपनीच्या कारकिर्दीत १८५४ साली पहिल्यांदा ख्रिस्ती मिशनरींच्या माध्यमातून देशातल्या अतिदुर्गम आदिवासी बहुल भागात शिक्षणाचा प्रसार करण्याचा विचार केला गेला. या घटनेला आता १६१ वर्षे पूर्ण झाली आहेत. ब्रिटिशांचा त्याकाळात दुर्गम भागात भारतीय लोकांना शिक्षण देण्याचा हेतू 'बाबु' तयार करण्याचा होता, असे जरी मानले आणि २०१५ साली १६१ वर्षानंतर व भारताला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्षे झाल्यावर चांगला हेतू जोपासल्यावरही आज बेरोजगार 'बाबू' ची संख्या झपाट्याने वाढत आहे. शासनाच्या शिक्षणविषयक धोरणाच्या अंमलबजावणीवर चांगल्या हेतूने वारेमाप निधी खर्च झाला असुनही शासनाची अपेक्षापूर्ती अद्याप झाली नाही. महाविद्यालये ही बेरोजगार पैदा करणारे 'कारखाने' आहेत, असे उपहासाने म्हटले जाते, त्यावेळी शिक्षणाचे जीवनातील उपयोजन हा कळीचा मुद्दा बनतो. भारतीय संविधानात कलम ३४२ अन्वये आदिवासींच्या आरक्षणासंबंधी खास तरतूद आहे. मात्र आदिवासी पूर्वीपासूनच शिक्षणापासून वंचितच राहिल्याने आरक्षणाचा पाहिजे तेवढा लाभ त्याला घेता आला नाही, ही वस्तूस्थिती कुणालाही नाकारता येणार नाही. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के लोकसंख्या असलेल्या आदिवासी जमातींची लोकसंख्या महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ५१ लाख २१३ एवढी आहे. (महिला-५१,९५,१८८, पुरुष-५३,१५,०२५) आहे. देशात जवळपास ५७३ जमाती आहेत, २७० हून अधिक आदिवासी भाषा या देशात बोलल्या जातात. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांतील ८० तालुक्यात ४५ अनुसूचित जमाती शहरी, ग्रामीण आणि अतिदुर्गम भागात वास्तव्यास आहेत. भारतीय संविधानाच्या कलम ४५ आणि ४६ अन्वये सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची राज्याची जबाबदारी आहे. शाळेत नाव नोंदविल्यावर शिक्षण सोडून देण्याचे, गळतीचे प्रचंड प्रमाण ग्रामीण भागात पहायला मिळते, सर्वेक्षणात अशा नोंदी जाणीवपूर्वक टाळल्या जातात त्यामुळे हे ध्येय अद्याप राज्याला पूर्णत्वास आणता आले नाही, याची साक्ष अलिकडेच २०१४ ला सादर केलेल्या प्रा. वर्जिनीस झाझा यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या संयुक्त आघाडी शासनाच्या काळातील अहवालावरून स्पष्ट होते. त्यात डॉ. उषा रामनाथन, डॉ. जोसेफ बारा, डॉ. कमल मिश्रा, श्रीमती सुनिला बसंत, डॉ. ऋषीकेश पांडा आणि महाराष्ट्रातून डॉ. अभय बंग, प्रशासकीय यंत्रणेमार्फत होत असलेली दलाली, निकृष्ट दर्जाचा साहित्य पुरवठा, शासकीय व खाजगी आदिवासी आश्रम शाळेतील मुलींचे लैंगिक शोषण, प्राथमिक शिक्षणात मातृभाषेचा येत असलेला अडसर, खाजगी आश्रम शाळेतील निकृष्ट दर्जाचे जेवण, शिक्षकांचा नाकर्तेपणा, शिक्षकांचा उदासिन दृष्टीकोन याबरोबरच एक अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे आदिवासींमध्ये आपल्या संविधानिक हक्काविषयी नसलेली जागरूकता आणि सामाजिक दबावाचा अभाव इ. कारणांमुळे अपेक्षित ध्येयापर्यंत आदिवासी जमाती पोहचू शकल्या नाही. जागरूकता नसल्यामुळे आणि विरोध किंवा रस्त्यावर उतरून एखाद्या चुकीच्या गोष्टीच्या विरोधात सर्व शक्ती एकवटून आंदोलन करण्याची क्षमता आदिवासींमध्ये अद्याप विकसित झाली नसल्याने त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात गैरआदिवासींनी घेऊन शैक्षणिक संस्था, अभियांत्रिकी, मेडिकल, तंत्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षणात अनुसूचित जमातीच्या खोटे प्रमाणपत्र तयार करून अनु. जमातीला मिळणाऱ्या शैक्षणिक आणि नोकरीतील सवलती गैरआदिवासींनी लाटल्या आहेत. राज्यात अशी प्रकरणे १ लाखाच्या वर असल्याचे स्वत: शासनाचे म्हणणे आहे व त्यांना सेवासंरक्षण देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे.

• संस्थापक अध्यक्ष, ऑर्गनाईझेशन फॉर राईटस् ऑफ ट्रायबल, नागपूर. मो. ९४२२१६३८०९.

राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींचे साक्षरतेचे एकूण प्रमाण ६५.७ टक्के आहे. राज्यात आज निरक्षर आदिवासींची संख्या ३५ टक्के आहे. बोटावर मोजता येईल इतके उच्चशिक्षित आदिवासी सरकारी नोकरी मिळवितात व इतर व्यवसायात आदिवासींचे प्रमाण नगण्य आहे. खाजगी क्षेत्रातील नोकरीत आदिवासींचे प्रमाणही फारसे समाधानकारक नाही. ग्रामीण आणि दूर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासींचा शिक्षणाकडे पाहण्याचा त्याने जोपासलेला दृष्टीकोन त्याला पुढारलेल्या समाजाच्या प्रमुख धारेत नेईल असे वाटत नाही. धर्म, अंधश्रद्धा, जातपात आणि व्यसनाधिनता, आज निरक्षरता नसली तरी अपुरे, जुजबी शिक्षण ही या लोकांपुढची आव्हाने आहेत. प्रामुख्याने मोठ्या संख्येने ग्रामीण भागात राहून आश्रमशाळेत आणि जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळेत जाणारा आदिवासी विद्यार्थी माहिती तंत्रज्ञानाच्या या वेगवान जगात टिकण्याची क्षमता धारण करू शकेल असे प्रामाणिक प्रयत्न शिक्षकांकडून होत नाहीत, त्याला जाब विचारणारी सक्षम यंत्रणा शासनाने कार्यान्वित केली नाही, आदिवासी लोकप्रतिनिधींची उदासिनता, सांविधानिक आयुधांचा वापर करून विधीमंडळातून आणि संसदेच्या दोन्ही सभागृहातून आदिवासी लोकप्रतिनिधींनी आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीवर, शिक्षणावर कधी चर्चा घडवून आणली असेल किंवा आदिवासींच्या दयनिय शैक्षणिक स्थितीवर प्रश्न विचारले असतील, असे क्वचितच आणि अपवादात्मक परिस्थितीत आजतागायत घडले आहे. हे चित्र बदलून जाब विचारण्याची क्षमता आदिवासींमध्ये निर्माण झाली पाहिजे. इमर्सनने शिक्षणाची साधी आणि सोपी व्याख्या केली आहे, तो म्हणतो 'Education aims to prevail over the cirucumstances' त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व सर्वात शेवटच्या आदिवासी माणसापर्यंत पोहचवणे व त्याला शिक्षणाच्या प्रक्रियेत सामील करून टिकविणे, शिकवणे, शिकलेल्या ज्ञानाच्या उपयोजनासाठी त्याला सक्षम करणे, हे शासनाचे आद्य कर्तव्य असून, शासनाच्या विकासाच्या सूचित आदिवासींच्या शिक्षणाचा अजेंडा अग्रक्रमावर असला पाहिजे.

ठिकाण-नागपूर,

दिनांक-१५ सप्टेंबर २०१५.

❖❖❖

# ९ ऑगस्ट - विश्व आदिवासी दिवस

• डॉ. संजय लोहकरे

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण आमसभेत दि. २३ डिसेंबर १९९४ रोजी पारित केलेल्या ठराव क्र. ४९-९१४ प्रमाणे ९ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस म्हणून जाहीर करण्यात आला. आदिवासी हे या भूमीचे मूळ रहिवासी आहेत, निसर्गात राहणारे व निसर्गातील घटकांचा उपयोग करून जीवन जगणारे आहेत, जंगलातील संपत्तीचे संवर्धन करून जगण्याचे नैसर्गिक संस्कार त्यांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविले जातात. भारतातील नैसर्गिक साधन-संपत्ती गेली हजारो वर्षे त्यांनी जपली, पर्यावरणाचा समतोल बिघडू दिला नाही. अशा जमाती टिकविणे व त्यांना त्यांच्या राहत्या जागी नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध करून देणे प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे. या भावनेतून प्रेरित होऊन जागतिक संघटनेने (युनोने) सन १९९४ ते २००४ हे दशक जागतिक आदिवासी दशक म्हणून घोषित केले. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस जगभर 'जागतिक आदिवासी गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. तद्नंतर कार्यक्रमाची आवश्यकता पाहून सन २००५ ते २०१४ हे दशक जागतिक आदिवासी दशक म्हणून पुन्हा घोषित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर यावर्षी महाराष्ट्रात पुणे, नाशिक, ठाणे, नंदुरबार, धुळे, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिराली जिल्ह्यातील विविध आदिवासी संघटना सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करून तसेच आदिवासी क्रांतिकारकांच्या शौर्याचा जयजयकार करीत गौरव दिन साजरा होत आहे. महाराष्ट्राशिवाय गुजरात राज्यात सागबारा, जि. नर्मदा, छोटा उदेपूर, बोडली, जि. बडोदा, झगडीया, व्यारा, सोनगड येथील आदिवासी एकता परिषद व भिल्लीस्तान विकास मोर्चा, मध्यप्रदेशातील खट्टी, जि. बडवाणी, बागली, जि. देवास येथील आदिवासी विकास संघटना, राजस्थानातील उदयपूर येथील भिल्ल महासंघ, आस्था संस्था, छत्तीसगडमधील आदिवासी विकास परिषद, झारखंडमधील रांचीची आदिवासी धरम परिषद, याशिवाय देशात दिल्ली, त्रिपुरा, नागालँड, प. बंगाल, आसाम, अरुणाचल प्रदेश आदि ठिकाणी ९ ऑगस्ट हा विश्व आदिवासी गौरव दिन साजरा करण्यात येत आहे.

आज जगभरातील आदिवासी जल, जंगल आणि जमिनीचे, नैसर्गिक साधन-संपत्तीचे संरक्षण करत असताना जागतिकिरणाच्या, विकासाच्या नावाखाली त्यांच्या संस्कृतीवर, भाषेवर, जल, जंगल, जमिनीवर, समूह जीवनावर आक्रमण होत आहे. त्यामुळे या देशातील मूळ निवासी आदिवासींची संस्कृती धोक्यात आली असून, त्यांचे निसर्गाशी नाते संपुष्टात येत आहे. आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी आदिवासींनी कोणाचेही शोषण केले नाही. तुमच्या भोगवादी संस्कृतीने, ग्लोबल वार्मिंगने संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोक्यात आणले आहे. हरित वायू दुष्परिणाम परिषदेतून युनोने एक महत्त्वपूर्ण निर्णय जगापुढे मांडला आहे. तो असा, 'जर नैर्सगिक सजीवसृष्टी वाचवायची असेल तर ती कायदे करून वाचणार नाही, ती आदिवासींच्या ताब्यात द्या. ते निसर्गावर जेवढं प्रेम करतात तेवढं अन्य कुणावरही करत नाहीत. तेच इथला निसर्ग वाचवू शकतात' हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. यातून आदिवासी जमाती किती महत्त्वाच्या आहेत हे जगाला ध्यानात घ्यावे लागेल. नैसर्गिक संसाधनांचा दुरुपयोग न करता त्यांचे संवर्धन करणे तसेच पूर्वजांपासून चालत आलेली नैसर्गिक संसाधनांची विरासत भावी पिढीकडे सोपविणे, हे आदिवासी संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आदिवासींची एक पारंपरिक धारणा आहे ती म्हणजे, 'ही पृथ्वी माझी नाही, तर मी पृथ्वीचा आहे'. म्हणजे तो या धरतीला जन्मदाती मानतो. तिचे रक्षण आणि संवर्धन करणे स्वत:चे कर्तव्य मानतो. मातेला आणि मातीला तो सारख्याच प्रतिष्ठेने वागवितो. पृथ्वी वाचली तरच त्यावरील जीवसृष्टी वाचेल, ही जाणीव आदिवासी समूहांनी जपली आहे. इतर समूहांना याची जाणीव व्हावी, देशातील राज्यव्यवस्थेला जाणीव व्हावी म्हणून हा विश्व आदिवासी दिवस साजरा व्हायला हवा.

आंतरराष्ट्रीयस्तरावर आदिवासी समूहांच्या हक्कासाठी दोन प्रमुख मसुदे आहेत. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (आय.एल.ओ.) संकेत क्र. १६९ (१९८९) तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने सप्टेंबर २००७ मध्ये मंजूर केलेला आदिवासी समूहाचा हक्काचा कायदा. परंतु या दोन्ही मसुद्यांबाबत भारत सरकारने भारतात आदिवासी लोक नाहीत असे नोंदविले आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासी शब्दाची नोंद नाही. भारताच्या संविधानात ५ वी ६ वी सूची असुनही त्याची अंमलबजावणी न करता उल्लंघन केले जाते. पेसा (पी ई एस ए) सारखे आदिवासींच्या हक्काचे कायदे होऊनही त्याची अंमलबजावणी होण्याऐवजी पायमल्ली तुडवले जातात. भारतीय स्वातंत्र्यात आदिवासी क्रांतिकारकांचा इतिहास नोंदविला गेला नाही. आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरा, खाज्या नाईक, तंट्या भील, बिरसा मुंडा, कुवरसिंग वसावा, बाबुराव शेडमाके, सिदू-कान्हू या व यासारख्या हजारो क्रांतिकारकांनी, देशभक्तांनी ब्रिटीशांविरुद्ध लढा दिला. या देशातील अनेक संस्थानिक इंग्रजांना शरण गेले परंतु आदिवासी समूहांनी मात्र आपल्या जल, जंगल आणि जमिनीसाठी इंग्रजांशी अखेरपर्यंत लढा

• लेखक आदिवासी साहित्य आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. संपर्क ९६५७५४९०७६.

दिला. जव्हारचे मुकणे राजांचे संस्थान देशाच्या स्वातंत्र्यानंतर विलीन करण्यात आले. १६५७ ला रणदुल्लाखान नावाच्या मुघल बादशहाने ४०० महादेव कोळ्यांच्या कत्तली करून शिवनेरी किल्ल्यावर मुंडक्यांचा ढिग रचला. शिवरायांच्या स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या या देशभक्तांच्या बलिदानाचा इतिहास लबाड इतिहासकारांनी लिहिला नसला तरी आजही किल्ल्यावरचा कोळी चौथरा सबंध देशातील आदिवासींसाठी प्रेरणादायी आहे. राजस्थान मानगड येथे १५०० आदिवासींना एकाचवेळी गोळ्या घालून ठार केले. हा जालियनवाला बाग हत्याकांडापेक्षाही अमानुष हत्याकांड होता. स्वातंत्र्याच्या या लढ्यात मुघल, इंग्रज, जमिनदार, शेठ, सावकार आणि आमचे शोषण करणारे, अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात आदिवासी देशभक्तांनी निष्ठेने लढा दिला. त्यांचा हा गौरवशाली इतिहास इथल्या प्रस्थापितांनी लिहिला नसला तरी इथल्या मातीला तो माहीत आहे. ती मातीच आता माणसे पेटवील !

आज जगभरातील आदिवासींनी आपले अस्तित्त्व टिकविण्यासाठी, बोली, संस्कृती, समूहजीवन, सहकार्याची, प्रेमाची माणुसकीची मूल्ये जगाला देण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. जगभर आदिवासी गौरव दिन साजरा करताना, भारतीय आदिवासींच्या सांस्कृतिक अस्मिता जपणे महत्त्वाचे आहे. ९ ऑगस्टला आदिवासी लोककला, नाट्य, चित्र, शिल्प या कलांचे सादरीकरण, प्रदर्शन भरवायला हवे. शहरात, चौकाचौकात, खेड्यापाड्यात या कलांचा आणि त्या सादर करणाऱ्यांच्या पारंपरिक भावनांचा आदर करणे गरजेचे आहे. आदिवासी क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास जगापुढे मांडून त्या क्रांतिकारकांच्या निष्ठेचा आणि प्रेरणांचा सन्मान व्हायला हवा. आदिवासी बोली या प्राचीन आहेत. या बोलीतील लोकनाट्य, लोकगीते, लोकसाहित्य तसेच आदिवासी बोलीतील साहित्याला प्रोत्साहन मिळेल अशा उपक्रमांची आखणी व्हायला हवी. या बोली जपण्यासाठी, टिकविण्यासाठी राज्य आणि केंद्राने केवळ निधी उपलब्ध करून न देता त्याची योग्य अंमलबजावणी व्हायला हवी.

या विश्व आदिवासी गौरव दिनाच्या निमित्ताने भारतातील तसेच महाराष्ट्रातील आदिवासी समुहांच्या इथल्या लोकशाही व्यवस्थेकडून काही अपेक्षा आहेत, त्या पूर्ण व्हायला हव्यात.

१. भारतीय राज्यघटनेतील Scheduled Tribes या शब्दासाठी 'आदिवासी' शब्दाची नोंद व्हायला हवी.

२. भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशभरातील आदिवासींचे आदिवासीपण नष्ट करून, त्यांचे वनवासीकरण करणे आणि त्याद्वारे देशभरातून तसेच परदेशातून वनवासी विकासाच्या नावाखाली निधी उभा करण्याचा प्रकार राजरोसपणे चालू आहे, तो थांबविणे.

३. आदिवासी मजुरांचा जनावरांसारखा लिलाव थांबविणे. हा लिलाव शहरातील बस स्टॅण्डवर, भर चौकात, रस्त्यावर चालतो. स्वातंत्र्यानंतरही या देशात आदिवासींचा जनावरांसारखा लिलाव होत असेल तर ती गोष्ट या देशातील अमानवीय आहे.

४. आदिवासी लोककला ठेकेदारांच्या कचाट्यात सापडल्या असून, त्यांचे नैसर्गिक सौंदर्य नष्ट होऊन, त्यात व्यापारी दृष्टीकोन निर्माण झाला आहे. तो प्रथम थांबवायला हवा. कारण आदिवासींच्या कला या त्यांच्या आनंदासाठी आणि धरतीच्या पूजेसाठी असतात.

५. आदिवासी हे या भूमीचे मूळ निवासी असल्याने त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीवर त्यांचा पारंपरिक हक्क आहे. तो त्यांना देऊन स्वतंत्र आणि स्वायत्त जिल्ह्यांची, तालुक्यांची निर्मिती व्हायला हवी. घटनेतील ५ व्या व ६ व्या सूचीतील त्यांचा स्वायत्ततेचा हक्का त्यांना मिळायला हवा.

६. गेल्या ६४ वर्षांनंतरही आदिवासी पाड्यापर्यंत प्राथमिक शिक्षण पोहोचलेले नाही. उदा. नंदुरबार जिल्ह्यात अतिदुर्गम भागात झापी, सिंधी, फलई, खडकी, भादली या गावांत स्वातंत्र्यानंतरही प्राथमिक शाळा भरलेली नाही. यासारख्या महाराष्ट्रात असंख्य गावांत प्रथम शिक्षण पोहोचायला हवे.

७. आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र 'आदिवासी शिक्षण आयोगाची' स्थापना करण्याची मागणी समाजाकडून होत आहे, ती पूर्ण व्हायला हवी.

८. देशभर होत असलेले आदिवासींचे धर्मांतर रोखायला हवे.

९. महाराष्ट्र सरकारच्या सेवेतील एक लाख पाच हजार पदे बोगस आदिवासींनी बळकावली आहेत. हा या राज्यातील आदिवासींवरील सर्वात मोठा अन्याय आहे. 'आमचा हक्क आम्हाला द्या' अशी महाराष्ट्रातल्या आदिवासींची सन १९९५ पासूनची मागणी आहे. ती या दिनाच्या निमित्ताने सरकारने पूर्ण करायला हवी.

१०. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागाची स्थापना करून त्यांच्यावर वर्षाला ४८८४ कोटी रुपये खर्च केला जातो. परंतु हा मुख्य प्रवाह म्हणजे नेमके काय ? आदिवासींना काय हवे आहे ? हे त्यांना विचारायला हवे. त्यांच्या गरजा आणि क्षमतांचा विचार करायला हवा.

११. आदिवासींचा सर्वांगीण विकास करताना शिक्षण, क्रीडा, कला, साहित्य, संगीत, उद्योगधंदे, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शेती, वैद्यकशास्त्र, प्रसारमाध्यमे अशा सर्वांगीण विकासाच्या विविध प्रवाहांत त्यांना संधी उपलब्ध करून द्यायला हवी.

१२. आदिवासींच्या काही पारंपरिक, मानवतावादी धारणा आहेत, त्या जपायला हव्यात. उदा. 'पहिली बेटी धनाची पेटी', सहकार्याची भावना जपणारी 'लाहे' पद्धती. 'ही पृथ्वी माझी नाही, तर मी पृथ्वीचा आहे', समाधान, सजीव सृष्टीवरील निष्ठा आणि त्यांची प्रतिष्ठा इ.

विश्व आदिवासी गौरव दिनाच्या निमित्ताने या त्यांच्या अपेक्षा पूर्ण व्हायला हव्यात. सबंध मानवजातीने या समूहांना, त्यांच्या मानवतावादी परंपरांना, मूल्यांना, त्यांच्यातील आदीमतेला जपायला हवे. सबंध देशाने हा गौरवदिन साजरा करायला हवा.

आपल्या बोलीला आदिवासी माणूस आपली दुसरी आईच मानतो. जन्म देणारी आई आपल्या शरीराचे भरण-पोषण करते तर बोली आपल्याला अनुभूतीचं, व्यक्तिमत्त्वाचं भरण-पोषण करते, आदिवासी बोली हा आद्य मानवाची भाषा आहे. त्यानेच भाषेचा शोध लावला. शिवाय या पृथ्वीच्या पाठीवरची त्याची धर्मपूर्व संस्कृती, धार्मिक जीवन, धर्मतत्त्वे, धर्मसंस्कार इथल्या माणसांना माणसावर, पशुपक्षांवर, निसर्गावर प्रेम करायला शिकवितात. या सर्वांसह आदिवासींनी एकत्र यावं. या देशातल्या स्वातंत्र्य दिनासारखा, प्रजासत्ताक विश्व आदिवासी गौरव दिन साजरा करावा अशी अपेक्षा करून सबंध जगभरातील आदिवासींना आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देऊन थांबतो.

❖❖❖

# आदिवासींचा विकास, वास्तव आणि अपेक्षा

• वाहरू सोनवणे,

पृथ्वीवरचा पहिला मानव म्हणून आदिवासींची ओळख आहे. आदिकाळापासून आदिवासी ' श्रम, समूह आणि सहकार्यावर ' आधारित जीवन जगत आहे. जीवन जगतांना जीवनात शोषण, दमन, विषमता आणि कोणत्याही प्रकारचा भेद नव्हता. ते प्रेम, विश्वासाचे जीवन जगत होते. पण मानव जीवनाच्या विकासक्रमात संपत्तीची उत्पत्ती झाली आणि तेथूनच मानव जीवनात शोषणाची प्रक्रिया सुरू झाली. स्वार्थ जागला, माझे-तुझे भेद निर्माण झालेत. भेदामुळे मानव जीवनात ताण-तणाव आणि अनेक समस्या निर्माण झाल्यात. शोषण, दमन आणि वर्चस्वावर आधारित भोगवादी संस्कृतीचा जन्म होतो. भोगवादी संस्कृतीच्या प्रभावाने आदिवासी आपले माणूसपण हरवून बसला. विषमता आणि भेदामुळे मानव जीवनात संघर्ष उभा राहिला. जोपर्यंत समता, स्वातंत्र्य, प्रेम, विश्वासाचे जीवन प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत हा संघर्ष चालुच राहणार, अशी स्थिती निर्माण झाली.

मानवी जीवन जगणाऱ्या आदिवासींना आपमतलबी धर्म, पक्ष, संघटनावाल्यांनी जीवन जगण्याची लालूच दाखविली. "तुम्ही आमच्या धर्मात या, आम्ही तुमचे प्रश्न सोडवू, कल्याण करू आणि तुमचा विकास करू", असे सांगून त्यांनी प्रथम आदिवासींना भाजीपाल्यासारखे वाटून घेतले. कोणी हिंदू धर्मात, कोणी मुसलमान तर कोणी ख्रिश्चन धर्मात गेला. अशाप्रकारे एकसंघ जीवन जगणाऱ्या आदिवासींना धर्म-पंथाच्या नावाने विभाजित केले. आदिवासी समाजाचे तुकडे झालेत.

राजकीय पक्षांनीही असेच आदिवासी समाजाला विकासाचे गाजर दाखवून "तुम्ही आमच्या पक्षात या आम्ही तुमच्या समस्या सोडवू, कल्याण करू, विकास करू" असे प्रलोभन दाखविल्याने आदिवासी त्या-त्या पक्षावर विश्वास ठेवून त्यांच्याकडे गेलेत. आज मागे वळून पाहिले, तर आदिवासींची परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली दिसते.

आजवर प्रत्येक धर्म, पक्ष, संघटना यांनी आदिवासींमध्ये अवलंबित्वाची भावना जागवून त्यांना गुलाम करून धर्म आणि पक्षाच्या दावणीला बांधले, स्वार्थासाठी त्यांचा वापर केला. आजपंत कोणीही आदिवासींना आपल्या पायावर उभे केले नाही. स्वावलंबनाची दिशा दाखविली नाही.

प्रश्न असा आहे की, आदिवासी विकासाचे प्रश्न आदिवासींपासून सुरू होतात की इतरांपासून ? कारण आदिवासींचा विकास हा आदिवासींचा प्रश्न नाही, जे आदिवासींचा विकास करू पाहतात, त्यांचा प्रश्न आहे.

विकासाचा एक भाग म्हणून देशात आदिवासी भागात नक्षली आणि सरकार यांच्यात संघर्ष सुरू आहे. पण विकासाबाबत आदिवासींना काय वाटते, हे त्यांना कोणी विचारले आहे का ? तर नाही, आदिवासींच्या विकासाबाबतीत देशातले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील तत्त्वाची मांडणी केली आहे. आदिवासींवर दबाव आणून आदिवासींचा विकास साधता येणार नाही. त्यांना त्यांच्या संस्कृतीच्या आधारावर आपले जीवन जगु द्यावे, आपला विकास करू द्यावा आणि जगण्याचा मार्ग मोकळा करावा. अशाप्रकारे पंचशील तत्त्वांची मांडणी केलेली आहे. या पंचशील तत्त्वांचा सरकार चालविणाऱ्यांना विसर पडलेला दिसतो. आदिवासींकडे दुय्यमतेने आणि अरेरे बिचारे ! अशाप्रकारे दयाभावनेने पाहिले जाते आणि 'त्यांचा विकासाचा साचा' आदिवासींवर लादला जातो, पण लादून विकास होत नाही. उदाहरणार्थ - शासकीय योजनांप्रमाणे आदिवासींना घरकुल योजनेत घर देण्यात येते. हे घर म्हणजे चार भिंती. या चार भिंतीमध्ये एक भिंत उभी केली जाते आणि त्यालाच घर म्हटले जाते. आदिवासी बकऱ्या, कोंबड्या, गाय, बैल पाळतात. याची व्यवस्था करण्यासाठी आदिवासींच्या घराची रचना कशी असावी याचा विचार केला गेला पाहिजे आणि तसे 'बजेट' केले पाहिजे. त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांचा आदरातिथ्याची घरात तशी रचना, व्यवस्था पाहिजे. पण आदिवासींवर दया दाखवल्यागत त्यांना घर देतात आणि घ्यायचे असेल तर घ्या, नाहीतर जा, असा आदिवासींकडे पाहण्याचा जो एकूणच दृष्टिकोन आहे तो बरोबर नाही.

आदिवासी संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि विकास करण्याच्या नावाखाली शासन आदिवासींना 'बँडबाजा' चे साहित्य देतात. 'बँडबाजा' देऊन आदिवासी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होणार नाही. उलट ऱ्हासच होईल. कारण 'बँड' दिल्याने बँडचे महत्त्व आदिवासींत वाढेल आणि आदिवासींचे परंपरागत वाद्य, ढोल, तुर, पावरी, मांदल, तुतड्या, बासुरी आदि पारंपरिक व वैभवशाली वाद्यांचे महत्त्व कमी होईल.

विकासाचा एक भाग म्हणून आदिवासी संस्कृतीला पाया मानून आदिवासी नाटकं, रोडाल्या, लग्नगीत, थाळीवर गायल्या जाणाऱ्या कथां, परंपरामधून जपलेल्या जीवनमूल्यांचा शोध घेतला पाहिजे. आदिवासी निवास विभागाकडून प्रकल्प आखला पाहिजे आणि त्यांचे रक्षण - संरक्षण झाले पाहिजे.

शब्दकोड्यात आडवे-उभे शब्द भरायचे असतात. योग्य शब्द भरले नाही, तर शब्दकोडे सुटत नाही. याप्रमाणे विकासनीतिचे पण आहे.

आर्थिक विकास करावयाचा असेल तर सामाजिक अंगाचे शोषण होता कामा नये आणि सामाजिक विकास करावयाचा असेल तर सांस्कृतिक

अंगांचा शोषण होता कामा नये, अशाप्रकारे सर्वांगीण विकासनीति आखली पाहिजे.

आदिवासी म्हणजे 'अरे ऽ रे ऽऽ बिच्चारा !' त्यांच्यावर दया केली जावे किंवा दडपशाही याच नजरेने आदिवासींकडे बघितले गेले आहे. 'त्याचे ऐकले तर बघा', आदिवासी किती सुधारले, त्यांचे ऐकले नाही तर 'साले, आदिवासी सुधारणार नाही', अशी प्रतिक्रिया येते.

आदिवासी जणु काय जन्मत: बिघडलेलाच आहे आणि त्याला सुधारण्याची जबाबदारी जणु काय आपलीच आहे, अशा तोऱ्यात सरकार आणि इतर राजकीय पक्ष, संस्था, संघटना वागत असतात.

आदिवासी अनेक प्रश्नाने ग्रस्त आहेत. आदिवासींचे जल, जंगल, जमिनीचा प्रश्न, वन जमीन अधिकाराचा प्रश्न, सालदार-शेतमजुरांचा प्रश्न, शोषण, दमन, अन्याय, अत्याचार, बलात्कारांचा प्रश्न, वेठ-बिगारीचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न, आरक्षणाचा प्रश्न या शैक्षणिक क्षेत्रातील असो, आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकार आणि त्यासोबत अनेक राजकीय पक्ष, संस्था, संघटना धाऊन येतात आणि भ्रष्ट कारभाराला धक्का न लावता प्रश्न सोडवतात, अशाप्रकारे प्रश्न सोडवता-सोडवता आदिवासींना आपल्या दावणीला बांधून त्यांचा वापर करून घेतात.

आदिवासी ही माणुस आहे. तो ही जीवनाच्या सुख-दु:खाबाबत विचार करतो, यावर कोणाचाच विश्वास नाही.

आदिवासी अंधविश्वासू आहे ; त्यांना आरोग्याविषयी ज्ञान नाही, म्हणून आदिवासींना विज्ञानाकडे वळवले पाहिजे. म्हणून आदिवासींचे जडी-बुटी-वनौषधी या पारंपरिक मौलिक ज्ञानाकडे दुर्लक्ष करून आदिवासींच्या ज्ञानाला हिणवण्यात आले आहे.

विकासाच्या नावाखाली रासायनिक खतांचा वापर, नफेखोरीवर आधारित शेती पद्धतीमुळे आदिवासी विकसनशील शेती तंत्र, ज्ञान भांडार याकडे दुर्लक्ष झाले पूर्वी तुर पेरल्यावर, मध्ये-मध्ये ज्वारीचे दाणे पेरायचे. ज्वारीला कणसं यायचे, ज्वारीचे कोवळे दाणे खाण्यासाठी चिमण्या यायच्या, ज्वारीच्या दाण्यांना खात असतांना त्यांना तुरींवर अळ्या दिसल्या तर, ते पटकन फस्त करायच्या अशाप्रकारे पुर्वी आदिवासी किड्यांवर, अळ्यांवर नियंत्रण ठेवत होते आणि आता संकरित बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा भरमसाठ वापर केल्याने जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो, उपजाऊपणा खालावतो, जमिनीची प्रत बिघडते, आयुष्यमान खालावते. एवढेच नाही तर पिकांवर रासायनिक खतांचा आणि किटकनाशके वापरलेले धान्य, कडधान्य, भाजीपाला खाल्ल्याने माणसाच्या खतात विषाचे प्रमाण वाढलेले आहे ; म्हणून शरीरातील प्रतिकार क्षमता कमी झाली असल्याने कोणत्याही रोगाची लागण सहज लागु शकते. म्हणून असल्या विकास नीतिचा विचार करून चालणार नाही, तर विकसनशील विकासनीतित जमीन आणि माणसांच्या आरोग्याचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

पाठ्य पुस्तकातही मूल्याधिष्ठित शिक्षण दिले जाते, पण त्यात आदिवासी माणुस आणि आदिवासी जीवन प्रणाली कुठं दिसत नाही.

मूल्यांवर आधारित जे शिक्षण दिले जाते, ते जीवनमूल्य कोणत्या समाज घटकांच्या जीवनातून काढले जातात, हे बघणे आवश्यक आहे, पण 'ज्याच्या हातात काठी तोच पारधी', या म्हणीप्रमाणे ज्या हातात लेखणी तोच तज्ञ, तोच विद्वान आणि या तज्ञांच्या विद्वानाच्या वर्चस्वामुळे पाठ्यपुस्तकात आदिवासी जीवनमूल्यांचे प्रतिबिंब दिसून येत नाही.

पाठ्यपुस्तकात स्वातंत्र्य - लढ्याच्या इतिहासात आदिवासी क्रांतिवीरांचे योगदान नाकारण्यात झाले आहे. इंग्रजांच्या गुलामीच्याविरोधात लढतांना आदिवासी क्रांतिवीर राघोजी भांगरे यांना महाराष्ट्राच्या ठाणे तुरुंगात फाशी झाली, तर झारखंड रांचीच्या तुरुंगात जननायक बिरसा मुंडा शहिद झाले. एवढेच नाही, तर इंग्रज आणि देशातले सेठ-सावकार, जमिनदार यांचे शोषण, दमन, अन्याय, अत्याचार, बलात्काराच्या विरोधातल्या लढाईत आदिवासी क्रांतिवीर तंट्या भिलला मध्यप्रदेश जबलपुरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली. खाज्या नाईकने सातपुडा पर्वत रांगेत, 'आंबापाणीची' लढाई लढली, म्हणून इंग्रजांनी खाज्या नाईकचे 'डोकं' कापुन धरणगांवला एका निंबाच्या झाडाला आठ दिवस टांगुन ठेवले, जालियनवाला बागेच्या हत्याकांडापेक्षाही भयानक हत्याकांड मानगडच्या पर्वतात झाला. इंग्रजांच्या विरोधात लढणाऱ्या आदिवासींना घेराव करून चौफेर गोळीबार केला. त्यात १५०० हून अधिक आदिवासी ठार झाले. मानगडचा पहाड रक्ताने लहुलुहान झाले. महात्मा गांधीच्या आवाहनावरून असहकार चळवळीत पुढाकार घेतला म्हणून आदिवासी 'दसरोबा' ला अटक झाली. येरवडा पुणे येथे तुरुंगात असतांना या आदिवासी बालिकेला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या धर्मपत्नी कस्तुरबा गांधी यांनी लिहता-वाचता शिकवलं, पण वेडली गांव गुजरातच्या या आदिवासी बालिका दशरीबाचे योगदान देशाच्या इतिहासकारांना माहीत नाही. देशाला माहीत नाही.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आदिवासी गावात मुलांच्या हातात तिरंगा झेंडा देतात आणि 'एक रुपया चांदीचा, देश आमचा गांधीचा' अशा घोषणा आदिवासी मुलांकडून वदवून घेतात.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आदिवासीने रक्त सांडले, फासावर गेले आणि देश फक्त गांधीचा कसा ? 'देश आमचाही आहे' म्हणून देशातल्या शाळा, कॉलेजात दिली जाणारी व्यक्तीवाचक घोषणा बदलावी अशी आदिवासींकडून मागणी होत आहे.

आदिवासींचे प्रश्न सोडवून विकास करतो, म्हणणाऱ्यांनी आदिवासींमध्ये भांडण लावण्याचे प्रकारही घडले आहेत. ठाणे जिल्ह्यात पक्षाच्या नावाने भावाभावात भांडण लावण्याचे प्रकारही घडले. भाऊ-भाऊ वैरी झालेत. एकमेकांच्या लग्नात, मरणा-धरणात ते जात नाहीत. तसेच गुजरातमध्ये डांग जिल्ह्यात आदिवासींनी धर्माच्या नावाने एकमेकांवर हल्ले केले. घरदार आणि सारे जीवन उद्ध्वस्त झाले.

खरे तर, माणसाला माणुसकी मिळणे हाच विकासाचा पाया असावा. आदिवासी एक मानव समूह आहे. त्याला विचार आहे, आचार आहे, जीवन आहे, जीवनाची दिशा आहे. आदिवासी संस्कृतीला केंद्र मानून आदिवासी विकासाचे नियोजन केले पाहिजे. विकास योजना आखली पाहिजे. आदिवासींचे प्रश्न सोडवणाऱ्यांनी आदिवासींसमोर अनेक प्रश्न उभे केलेत. धर्मांध शक्ती ही आदिवासी संस्कृतीवर आक्रमण करत आहे आणि शोषण, दमण आणि विषमतेवर आधारित भोगवादी संस्कृती आदिवासींवर लादत आहेत. समता, बंधुभाव, प्रेम, विश्वासाची आदिवासी संस्कृती नष्ट करीत आहे.

विकासाच्या नावाने आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याची भाषा करीत, त्यांना जातीत समावेश करण्याचा डाव आहे. आदिवासी मुख्य प्रवाहात येणे, म्हणज शोषण, दमन आणि भेदावर आधारित जातीय प्रवाहात येणे. आदिवासी जात नाही, जमात आहे, तो जातीत आला तर जातींचे सर्व दोषांचा बळी होईल आदिवासीत जीवघेणी हुंड्याची परंपरा नाही. आदिवासी महिला आत्महत्या करत नाही. जर जातीचा स्वीकार केला तर आदिवासी महिलाही आत्महत्या करायला लागतील.

आदिवासी महिला इतर जातीच्या महिलांपेक्षा स्वतंत्र आहेत, मुक्त आहेत. आदिवासी जातीत आल्यावर या महिलांच्या स्वातंत्र्यावर गदा येईल. आदिवासींच्या संस्कृती आहेत, म्हणून ती जपली पाहिजे, असे नाही, तर आदिवासी संस्कृतीत सर्वात अधिक मानवी मूल्ये आहेत आणि आदिवासी संस्कृतीत सर्व मानवाला मानवी मूल्यांच्या आधारावर आपल्यांत सामावून घेण्याची क्षमता आहे ; म्हणून आदिवासी संस्कृती जपली पाहिजे.

❖❖❖

# आदिवासी भाषांचे संशोधन व संवर्धन : काळाची गरज

• प्रा. माधव सरकुंडे, यवतमाळ.

मानवी संस्कृतीत भाषेनी अत्यंत महत्त्वाची भूमिका वठवली आहे. तिने मानवाने केलेले विविध कार्य व विचार संचित करून ठेवले आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या संचिताचे वहन करून सांस्कृतिक व सामाजिक विकासात भर टाकली आहे. हजारो वर्षे खर्ची घालून मानवाने ज्या सभ्यता (Civilization) उभ्या केल्या त्यांचे यथार्थ दर्शन आपणास भाषेच्याच माध्यमातून होते. म्हणून भाषा मानवी जीवनाचा आरसा आहे, असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. भाषा कशा निर्माण झाल्या या विषयी आधुनिक काळात अनेक सिद्धांत मांडले आहेत. ही गोष्ट थोड्या फार प्रमाणात भारतातही झाली. तथापि, या भाषा तज्ज्ञांनी आदिवासी भाषांकडे मात्र पूर्णत: दुर्लक्ष केल्याचे दिसते. आदिवासी भाषा अतिप्राचीन असल्यामुळे त्यामध्ये प्रचंड ज्ञान साठा आहे असा विचार करणे तर मग दूरचीच गोष्ट.

भारतात लोकसंख्येच्या घनतेच्या दृष्टीने विचार केला तर सर्वात जास्त आदिवासी राहतात. फ्रान्स देशाच्या एकूण लोकसंख्येच्या दुप्पट आदिवासी भारतात राहतात. संख्येतच सांगतो म्हटले तर आज भारतात बारा कोटी आदिवासी राहतात. आजच्या घडीला भारतात ६३५ मुख्य आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. या जमातीच्या उप-जमातींची संख्या तर हजारोच्या घरात आहे. कधी काळी यातील प्रत्येक जमातीची एक स्वतंत्र बोली भाषा होती. त्या बोली भाषेत निसर्ग आणि मानवी जीवनाविषयीचे प्रचंड ज्ञान सामावलेले होते. परंतु आर्यांच्या आगमनापासून इंग्रजी राजवटीपर्यंत आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर जी आक्रमणं झाली त्यातून आदिवासी बोली भाषांचे अतोनात नुकसान झाले.

एक सांस्कृतिक समाज व्यवस्था दुसऱ्या सांस्कृतिक समाज व्यवस्थेवर विजय मिळवत असते तेव्हा विजय झालेली समाज व्यवस्था पराभूत झालेल्या समाज व्यवस्थेत रूढ असलेली सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व धार्मिक मूल्ये प्रथम नष्ट करून टाकत असते; आणि नंतर त्या गुलाम समाज व्यवस्थेवर आपली स्वत:ची मूल्ये लादत असते. भारतातील आदिवासी समाज व्यवस्थेचे नेमके हेच झाले. या देशात आतापर्यंत जे विदेशी आले त्या सर्वांचा आदिवासी समाज समूहांशी संघर्ष झाला. या संघर्षात ज्या आदिवासी जमाती पराभूत झाल्या त्यांच्यावर जेत्यांनी आपली संस्कृती लादली. त्यांना दास-दस्यूंचे जीवन बहाल केले. त्यांनी या दास-दस्यूंचे सारेच नाकारले. आदिवासी जी भाषा बोलत ती अशुद्ध नि गावंढळ आहे असा ठपका ठेऊन पद्धतशीरपणे आदिवासींच्या भाषां मोडीत काढल्या. अशा प्रकारे भारतातील आदिवासींच्या हजारो भाषां लुप्त पावल्या. काही विद्वान सांगतात की, आदिवासी भाषांना लिपी नसल्यामुळे त्या नष्ट झाल्या किंवा होत आहेत. ही गोष्ट थोड्या फार प्रमाणात खरी असली तरी सगळ्याच आदिवासी भाषांना लिपी नव्हती असे नाही. **गोंडी, कोया, बोडो, संस्थाली, खारीया, खासी, मुंडारी, गारो इत्यादी** आदिवासी भाषांना लिपी आहे. संस्थाली भाषेला तर पाच प्रकारच्या लिपी आहेत. असे असतानाही भारतीय संविधानात राष्ट्रीय भाषा केवळ बोडो आणि संस्थाली या दोनच भाषेचा समावेश आहे. विशेष म्हणजे गोंडी भाषा भारतातील ११ टक्के लोक बोलतात. परंतु या भाषेला दर्जा दिला गेला नाही. या उलट राज भाषेच्या यादीत अशा एका भाषेचा अंतर्भाव आहे की, जी ०.५ टक्के लोकसुद्धा बोलत नाहीत.

पारतंत्र्यांच्या काळात परकीय लोकं आपल्या देशावर राज्य करत होते. त्यांना या देशाला लुटणे एवढेच ठाऊक होते. या देशातील वैभवशाली संस्कृती, भाषा व परंपरा जपून ठेवावे हा विषय त्यांच्या डोक्यात नव्हता. म्हणून त्यावेळी आदिवासी भाषा व संस्कृतीकडे दुर्लक्ष झाले असेल. परंतु स्वातंत्र्याच्या काळातसुद्धा आदिवासी भाषा व संस्कृतीकडे दुर्लक्ष होत असेल, तर निश्चितपणे असे म्हणावे लागेल की, आमच्या शासनातील सांस्कृतिक विभाग आणि या देशातले भाषा तज्ज्ञ व अभ्यासक यांना आदिवासीबद्दल कमालीची अनास्था आहे. आदिवासी भाषांचा अभ्यास त्यांना अभ्यासच वाटत नाही. कुणी माना अथवा मानू नका, आदिवासी संज्ञाच आमच्या समाजात निषिध्द ठरत आहे. प्रभू कोकणे नावाचा एक प्राध्यापक आपल्या पुस्तकात म्हणतो की आदिवासी हा शब्द तुच्छता दर्शक आहे. अशा स्थितीत मग आदिवासी भाषांचा अभ्यास करण्यासाठी कोण स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेणार आहे ? माझ्या मते आदिवासी भाषांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न न होण्यामागे हे एक मुख्य कारण असावे.

आजसुद्धा भारतात शे-दोनशे आदिवासी भाषा अस्तित्वात आहेत. त्यांना लिपी नाही हे खरे आहे. परंतु या भाषांमध्ये फार मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. या भाषांमध्ये हजारो गीत, कथा आणि लोकपरंपरा आहेत. आदिवासी भाषांमध्ये जी सांस्कृतिक मूल्ये आहेत ते जतन केली पाहिजेत. त्यातून भारतीय संस्कृती समृद्ध होणार आहे. तथापि, असे होताना दिसत नाही. त्याउलट आदिवासी भाषांना कुचकामी ठरवून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. आदिवासी भाषांना लिपी नाही म्हणून त्यांना नष्ट होऊ देणे हे सूज्ञपणाचे लक्षण नाही. आमच्या शासनाने आणि साहित्यिक विचारवंतानी पुढाकार घेऊन आदिवासी भाषांचे संवर्धन करण्यासाठी उपक्रम राबविले पाहिजे. आदिवासी भाषांसाठी देवनागरी लिपी वापरून

या भाषांमधील प्राचीन ज्ञान, विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामधील सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाचे तंत्र समजून घेतले पाहिजे. आदिवासीमध्ये कोणत्या प्रकारची न्याय व्यवस्था होती. दंड विधी कशी होती. कृषक व्यवस्था कशा स्वरूपाची होती. लौकिक व पारलौकिक जीवनाविषयीचे विचार, देव, धर्म, नि मृत्युविषयी आदिवासी समाजाचे काय चिंतन आहे इत्यादी साऱ्यांचे दर्शन आदिवासी भाषांमधून होते. म्हणून विद्यापीठस्तरावर **आदिवासी भाषा विज्ञान विभाग** निर्माण करून त्याद्वारे आदिवासी भाषा, साहित्य व मौखिक परंपरांचा अभ्यास व्हावा.

आफ्रिकाखंडातील अनेक देशातील आदिवासी भाषांना लिपी नाही. त्यांनी त्यांच्या भाषा इंग्रजी लिपीमध्ये लिहणे सुरू केले. या आफ्रिकन भाषाचे लिखाण इंग्रजी लिपीतून झाले तरी त्या लिखाणाचा बाह्य जगातल्या लोकांना काहीच अर्थ लागत नव्हता. परंतु यामुळे एक मात्र निश्चित झाले. इंग्रजी लिपीमधून या भाषांचे लिखाण झाल्यामुळे त्या भाषांविषयी जागतिकस्तरावर कुतुहल निर्माण झाले. अनेक जागतिक लेखक, विचारवंत व भाषा विश्लेषक अफ्रिकन भाषांचा अभ्यास करू लागले. आफ्रिकन भाषा शिकू लागले. साहित्य निर्माण करू लागले. त्यामधून आफ्रिकन लोकजीवनाचा जगाला परिचय झाला. त्याच बरोबर इंग्रजी भाषेला विदेशी न मानता शाळा, महाविद्यालय व न्याय व्यवस्थेत सर्रास इंग्रजी भाषेचा वापर त्या ठिकाणी होऊ लागला. नेल्सन मंडेला आपल्या आत्मकथनात म्हणतात: **इंग्रजी भाषेच्या पावलानेच आमच्या देशात प्रगती आली.** नायजेरीयातील चिन्युआ अॅचेबीसारखा जागतिक किर्तीचा लेखक इंग्रजीच्या दुधातूनच उपजला. भारतातील आदिवासीमध्ये मात्र असे काहीच होताना दिसत नाही. भाषांना लिपी नाही म्हणून दुसऱ्या एखाद्या भाषेच्या लिपीत आपली भाषा लिहण्याचे प्रयत्न भारतीय आदिवासींनी केलेला दिसत नाही. माझ्या मते असा प्रयत्न येथील आदिवासींनी करावा. किमान त्यांच्या स्वत:च्या विकासासाठी तरी.

शाळा महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांची गळती थांबवायची असेल तर अभ्यासक्रमात आदिवासी भाषांचा समावेश होणे काळाची गरज आहे. देवनागरी लिपीतून या भाषांचे लेखन होऊन त्यातून साहित्य निर्माण व्हावे आणि हे साहित्य आश्रमशाळा आणि इतरही शाळांमध्ये पहिल्या वर्गापासून बारावीपर्यंत अनिवार्य करावे. विद्यापीठ स्तरावरसुध्दा या भाषांचा व त्यातील साहित्याचा ऐच्छिक अभ्यास अंतर्भूत करण्यात यावा. असे झाले तर निश्चितच आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. ते घेत असलेल्या शिक्षणात त्यांना त्यांचे प्रतिबिंब दिसेल तर ते तिथे रमतील. अमरावती विद्यापीठातील प्रा. मधुकर वाकोडे ह्यांची कोरकू आदिवासी जमातीच्या जीवनावर आधारित **झेलझपाट** नावाची कादंबरी आहे. त्यामध्ये दहावीत शिकला असलेला कोरकूचा एक मुलगा मध्येच शाळा सोडून देतो. शाळा सोडण्याचे कारण तो सांगतो खरेच विचारात घेण्यासारखे आहे. तो म्हणतो; **या शिक्षणात मला माझ्या समाजाचे काहीच दिसत नाही म्हणून माझे मन या शिक्षणात रमत नाही.**

विश्वातील पहिला माणूस म्हणून आदिवासीला सन्मान दिल्या जातो, या माणसाकडे जे अनुभवजन्य ज्ञान, विज्ञान आहे. त्याकडे कुणीच गांभीर्याने लक्ष घालत नाही. त्याच्याकडे जी नैतिकता व प्रामाणिकता आहे ती कुणालाच भावत नाही.

आज आपल्या समाजात कमालीचे दुहीचे नि सामाजिक अविश्वासाचे भयावह वातावरण निर्माण झाले आहे. त्यातून नागरिकांच्या मनातील सलोख्याची भावनाच लयाला जात आहे. मला प्रामाणिकपणे वाटते की, हे सारे काही घडत आहे ते केवळ आम्ही नैतिक दायित्व आणि प्रामाणिक व्यवहाराला फाटा दिल्यामुळेच. आदिवासी समाजाकडे बघितले तर असे दिसते की, त्याठिकाणी नैतिकतेची बंधन काटेकोरपणे पाळली जातात. आदिवासी लोक नैतिकतेला दैवी संकेत मानतात, म्हणूनच ते कधीच नैतिक नियमांचे उल्लंघन करत नाहीत. त्यामुळे आदिवासी समाजात हिंसा, बलात्कार व फसवेगिरी पहायला मिळत नाही. या उलट सुसंस्कृत व सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या आमच्या नागरी समाजात या गोष्टी रोज घडताना दिसतात. त्यासंबंधाने कोर्टकचेऱ्या होताना दिसतात. प्रामाणिकतेच्या संदर्भात तर आदिवासी समाजाला तोड नाही. उदाहरण म्हणून राजस्थान येथील एका भिल्ल तरुणाची घटना या ठिकाणी मुद्दामहून सांगाविशी वाटते. एकदा एका भिल्ल मुलाच्या बहिणीची उच्चभ्रु वर्गातल्या मुलाने शेतात छेड काढली. त्यातून त्या भिल्ल मुलात व वरच्या वर्गातील मुलात भांडण झाले. चांगलीच मारामारी झाली. दुर्दैवाने त्या भिल्ल मुलाच्या हातून छेड काढणारा मुलगा मारला गेला. ही घटना घडली गावाच्या बाहेर एका शेतात. मग ते प्रकरण पोलीसमध्ये गेले. तिथून न्यायालयात गेले. भिल्लाचा मुलगा निर्दोष सुटला, कारण त्याच्या विरोधात पुरावा देणारी एकही व्यक्ती नव्हती. न्यायाधिशाने निर्णय दिला की, भिल्लाच्या पोराने हा खून केला नाही. तेव्हा हा भिल्ल पोरगा कोर्टात ओरडू ओरडू सांगत होता की, खून मीच केला ! अशी ही आदिवासीची प्रामाणिकता आहे. काही झाले तर सत्य वचनापासून ढळायचे नाही. **सत्यमेव जयते ना नृतम्** हे आदिवासी माणसाला ठाऊक नाही. परंतु काहीही झाले तरी तो सत्याची कास मात्र सोडत नाही. सत्यावर नितांत निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे आपले ऐहिक जीवन जगायचे हा आदिवासी संस्कृतीचा सार आहे. हाच त्याचा सुखी जीवनाचा सिद्धांत आहे. याच विचारातून आदिवासी समाज व्यवस्था जन्माला आलीय. त्यातून एक सामाजिक मूल्य व्यवस्था (Value System) निर्माण झाली. आदिवासींची मूल्य व्यवस्था अत्यंत पवित्र आणि आदर्श आहे. तिचे संवर्धन होणे काळाची गरज आहे. महात्मा गौतम बुध्दाने त्याकाळी हे काम केले आहे. गृहत शिखरावर वास्तव्याला असताना बुध्दाने आपल्या शिष्योत्तम आनंदाला आदिवासी समाज व्यवस्थेबद्दल जे काही सांगितले ते ऐकून आजच्या आदिवासी माणसाची छाती फुगेल. दुसऱ्या एका ठिकाणीसुद्धा बुध्द म्हणतात: **संघाची कल्पनाच मी आदिवासींकडून घेतली.** अॅरीस्टॉटल देखील म्हणतात की, लोकशाहीचे निर्माते आदिवासीच आहेत.

२६ डिसेंबर २००४ रोजी इंडोनिशियाच्या किनाऱ्यावरून निघालेली त्सुनामी लाट भारतापर्यंत येऊन पोहचली होती. दक्षिण भारतातील समुद्र किनारी राहणाऱ्या लोकांना त्सुनामीचा जबरदस्त धक्का बसला.

त्सुनामी ओसरल्यानंतर समुद्रशास्त्रज्ञ, श्री. एस. झेड. काशिम त्सुनामीचा अंदमानातील आदिवासींवर काय परिणाम झाला ह्याचा अभ्यास करण्यासाठी तेथे गेले होते. त्यांनी त्या ठिकाणच्या पहाडी आदिवासी लोकांशी संवाद केला आणि त्सुनामीत किती आदिवासी मेले असा प्रश्न त्यांना केला. तेव्हा ते आदिवासी म्हणाले. **एकही** नाही. परत काशिमने प्रश्न केला हे कसे शक्य झाले ? तेव्हा ते आदिवासी म्हणाले त्सुनामी येणार हे आम्हाला अगोदरच कळाले होते. कारण समुद्रातील जीवांचा आम्हाला चांगला अभ्यास आहे. समुद्रात असे काही अघटीत घडायचे असेल तर त्यांच्या हालचाली बदलतात. तसेच आमच्या कोंबड्या, बकऱ्या आणि म्हशी दावे तोडून पर्वताच्या उच्च भागाकडे धाव घेतात. तेव्हा आम्ही समजतो की आता मोठी लाट येणार. मग आम्ही पण उंच ठिकाणी निघून जातो. या त्सुनामीत आम्ही असेच केले. म्हणून आमच्यापैकी एकही त्सुनामीत मेला नाही. त्यावर श्री. एस. झेड. काशिम आपल्या सहकाऱ्यास म्हणाले हे आदिवासी अद्भूत आहेत. यांच्याकडे प्रचंड ज्ञान, विज्ञान आहे. त्सुनामीचे वातावरण निर्वाळल्यानंतर आपण या लोकांचा अभ्यास करू या. या लोकांना हजारो प्रकारची वन औषधीसुद्धा माहिती आहे.

खरेच आपणास आदिवासीकडे असणाऱ्या ज्ञान, विज्ञान, आदर्श समाज रचना, मूल्य व्यवस्था, पावित्र्य, सद्‌गुण, सलोखा, मानवतावाद, समता, न्याय, लोकतांत्रिक राज्य व्यवस्था, सामूहिक कृषक व्यवस्था इत्यादी समजून घ्यायचे असेल तर आदिवासी भाषांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण हा सारा खजिना आदिवासी भाषामध्ये दडून आहे. एखाद्या कथेत आपण बघतो की एखाद्या जुन्या पर्वताच्या दरीत अथवा गुफेत खजिना गाडलेला असतो. तो कसा प्राप्त करावा या विषयीची माहिती एखाद्या जुन्या ग्रंथात असते. परंतु त्या ग्रंथाची भाषा गुढ असते. ती एखाद्यालाच वाचता येते. अशी कथा आपण टीव्हीवर बघतो किंवा पुस्तकात वाचतो. ही कथा किती खरी किती खोटी याविषयी काही म्हणायचे नाही. परंतु आदिवासींच्या संदर्भात हे असेच आहे. आजही निसर्गातील अनेक घटनांचा आणि रहस्यांचा खरा अर्थ आदिवासींनाच ठाऊक आहे. त्यांच्याकडे असलेल्या माहितीत मुलगामी ज्ञान, विज्ञान दडले आहे. उदा. टमाटे आपण सर्वच खात असतो. परंतु टमाटरच्या पानात विष असते. एखाद्या व्यक्तीने टमाटरचे पानं खाल्ले तर तिला विष बाधा होते. ही फक्त मेळघातील कोरकुनांनाच माहीत आहे. अर्जुनाच्या कोवळ्या पालवीत जनावरांची हगवन बसविण्याची ताकद असते हे फक्त आंध जमातीलाच ठाऊक आहे अशा असंख्य महत्त्वाच्या गोष्टी आहेत की, ज्या फक्त आदिवासींनाच ठाऊक आहेत. म्हणून आदिवासीकडे असणाऱ्या ज्ञानाचा भारतीय समाजाला फायदा व्हावा असे वाटत असेल तर हे ज्ञान ज्या ज्या आदिवासी भाषांमध्ये आहे त्यांचा साकल्याने अभ्यास व्हावा त्याचबरोबर आदिवासी लोकजीवनाचा व संस्कृतीचासुद्धा अभ्यास व्हावा. त्यासाठी देश पातळीवर व राज्य पातळीवर स्वतंत्र **आदिवासी साहित्य संस्कृती मंडळ** निर्माण करण्यात यावेत. असे झाले तर रोज लुप्त होत चाललेल्या आदिवासी भाषा आपण वाचवू शकतो. त्यातील ज्ञान, विज्ञान संवर्धित करू शकतो.

❖❖❖

# अनुसूचित जमातींसाठी संविधान तरतुदी आणि खोट्या जमात प्रमाणपत्रांचे वाढते प्रमाण

• पद्माकर एन. सहारे,
•• विष्णू एम. कऱ्हाळे.

संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू पुराणातील चार वर्णांपेक्षा (सवर्ण) वेगळ्या ज्यांना हिंदू सामाजिक व्यवस्थेत कोणतेच स्थान नव्हते अशा तीन वर्गांचा (अवर्ण) निर्देश केला. ज्यात अ. अस्पृश्य जाती, ब. वन्य जमाती (आदिवासी), आणि क. भटक्या-गुन्हेगारी जाती आहेत. या तीनही समूहांना हिंदू सामाजिक व्यवस्थेतील अधिकार व आत्मसन्मानापासून वंचित केलेले होते. यात स्पष्टपणे दोन समूह ज्यात वन्य जमाती आणि गुन्हेगारी जाती-भटक्या जमाती यांना वेगळे केले आहे. परंतु एकमात्र निश्चित की, या सर्व जाती-जमातींसाठी विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

ब्रिटिश राजवटीत १९२८-३० च्या काळात ओ. बी. एच. स्टार्ट या इंग्रज सनदी अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय कल्याणासाठी समिती स्थापन केली. या समितीमध्ये मा. डॉ. सोलंकी, मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मा. ए. व्ही ठक्कर (ठक्करबाप्पा) इ. ख्यातनाम मान्यवर सदस्य होते. तत्कालीन मुंबई राज्यातील अस्पृश्यांचा आणि आदिवासी जमातींच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याविषयी अध्ययन केले गेले. स्टार्ट यांच्या समितीने दिलेल्या अहवलात मागास वर्गाचे तीन भागात वर्गीकरण केले. त्यात अ. शोषित वर्ग (Depressed Classes), ब. आदिम व पहाडी जमाती (Aboriginal and Hill Tribes) आणि क. इतर मागास वर्ग (Other Backward Class) असे असून हा अहवाल २९ मे, १९३३ मध्ये प्रकाशित झाला. या मूळ अहवालाचा आधार घेऊन व त्यात योग्य त्या सुधारणा करून १९५० च्या संविधान तरतुदीमध्ये राज्याची अनुसूचित जाती व जमातींची अनुसूची घोषित केली.

देशातील जातीव्यवस्थेच्या वारसागत स्थितीमुळे शोषित समूहांचे प्रतिनिधित्त्व नगण्य आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर प्रथमत: अनुसूचित जाती-जमाती समुदायांना सूचीबद्ध केले. संविधान निर्मात्यांचे मानणे होते की, जातिव्यवस्थेच्या कारणाने जाती व जमाती ऐतिहासिकदृष्ट्या शोषित व मागास राहिले आहेत. त्यांना समाजात समान संधी आणि आत्मसन्मान मिळाला नाही, म्हणून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहभाग कमी राहिला. हा संरक्षणात्मक भेदभाव धोरण तरतुदीचा मुलभूत सिद्धांत आहे. भारतीय संविधान परिच्छेद ३४२ नुसार जे परिशिष्ट प्रस्तुत करण्यात आले व त्यानुसार राज्यनिहाय अनुसूचित जमातींची अनुसूची आहे.

परंतु अनुसूचित जाती-जमाती अनुसूची व्यतिरिक्त काही जमाती काही जाती अशा आहेत, त्यांची नावे अनुसूचित जातींसारखी किंवा अनुसूचित जमातीसारखी आहेत, काही जातींच्या-उपजातींची नावे सारखी आहेत. तेव्हा अशा नामसदृश्य वा नामसाधर्म्याचा आधार घेऊन काही जाती या अनुसूचित जमातींच्या घटनात्मक तरतुदी व संवैधानिक सुरक्षिततेचा फायदा घेताना आढळतात. जमातींच्या नावाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या सवलती मिळवण्यासाठी अनेकांच्या तोंडाला पाणी सुटले आहे. अनुसूचित जमातींच्या अनुसूचीत समावेशनासाठी अनेकांचे प्रयत्न सुरू आहेत. असे की, कोळी जातीचा अनुसूचित जमातीत समावेश करावा यासाठी मोर्चे काढले जात आहेत तसेच धनगर समुदायाला अनुसूचित जमाती अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी सामान्य नागरिकांना वेठीस धरले जात आहे.

वर्तमानात काही जातींचे लोक जमातींचा दावा करून खोटी वा बोगस प्रमाणपत्रे प्राप्त करून मूळ वा खऱ्या आदिवासींच्या जागा व सेवा-सुविधा हडप करीत असून मूळ आदिवासींना संविधान अधिकार वा हक्कांपासून वंचित करीत आहेत. राज्यातील विशिष्ट जाती संवर्गातील लोकांनी आदिवासी जमाती सूचीतील साम्य नावाचा फायदा घेऊन अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीकडून मोठ्या प्रमाणात बोगस जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतली आहेत. बिगर-आदिवासी जमात प्रमाणपत्र प्राप्त करण्यात सफल होत असून जाती वैधता प्रमाणपत्राच्या आधारावर शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश अथवा शासकीय सेवेमध्ये नियुक्ती प्राप्त करून संधी व सेवांचा लाभ घेत आहेत. याचा दुष्परिणाम असा होता की, संविधान तरतुदीनुसार मिळालेल्या आरक्षणाच्या सुविधेपासून खरे सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीय विशेषत: आदिवासी वंचित होत आहेत.

१९९५ पूर्वीच्या राज्य शासनाच्या सेवेतील ९५००० बिगर-आदिवासींनी जातीतील नामसदृश्याचा फायदा घेऊन जमातीची प्रमाणपत्रे प्राप्त करून

• सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
•• उप-कुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

घेतली आहेत. आदिवासींच्या राखीव जागा बळकावणाऱ्या या बिगर-आदिवासी प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी आक्रमक मागणी आदिवासी संघटनांकडून होत आहेत. खोटे प्रमाणपत्र दाखल करणारे लाखो कर्मचाऱ्यांची दुसरी पिढी ही ५ ते ७ लाख (अपत्ये) असून सर्व क्षेत्रातील शैक्षणिक व नोकरीविषयक फायदा घेत आहेत. तथाकथित **'बोगस आदिवासी'** संघटनेचे पदाधिकारी जात वैधता पडताळणी समितीवर दबाव टाकून प्रमाणपत्र प्राप्त करीत आहेत. यामुळे आदिवासींना तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणात तसेच शासकीय सेवेपासून वंचित रहावे लागत आहे. **परिणामी शासनाकडे आदिवासींच्या प्रगतीची खोटी आकडेवारी जमा होत असून विकासाचे खोटेच चित्र उभे राहते. यातून सामाजिक व शैक्षणिक मागास, आर्थिकदृष्ट्या गरीब, नैतिकदृष्ट्या प्रामाणिक व निरागस आदिवासी मात्र विकासापासून कोसो दूर राहतो.**

१५ जून, १९९५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय पारित करून जे बिगर-आदिवासी जाती नामसदृश्य आधारे जमातींचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले आहे, अशांसाठी विशेष मागास प्रवर्ग (SBCs) तयार करून त्याकरिता स्वतंत्ररित्या २ टक्के आरक्षणाची तरतूद अनुज्ञेय आहे, म्हणजेच त्यांचे समायोजन करण्यात आलेले आहे. पण अशी माहिती हाती आलेली आहे की, कोळी व तत्सम् जाती, मुन्नेरवार, मुन्नुरवार, मुन्नूर, तेलगु मुन्नूर, मुन्नूरवार तेलगु, मुन्नूरकापू, कापेवार, तेलगु कापेवार व मुन्नरवाड या जातींना राज्य शासनाने विशेष मागास प्रवर्गात आरक्षण निश्चित केलेले असताना सुद्धा ते अनुसूचित जमातीच्या जात वैधता पडताळणी कार्यालयांकडून मोठ्या प्रमाणात अनुसूचित जमातीचे म्हणूनच प्रमाणपत्र काढण्याचा घाट घालत आहेत. अशासारखी ५ ते ६ हजार प्रकरणे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद येथे उघड झालेली आहेत. या कार्यालयाकडून अनुसूचित जमातीकरिता निश्चित केलेल्या निकषांची पायमल्ली करून सर्रासपणे जमातीच्या प्रमाणपत्राचे वाटप करण्याचे काम राजरोसपणे सुरू आहे.

निसर्ग नियमामध्ये जो सबल वा सुदृढ असतो तोच अस्तित्त्वाच्या संघर्षात तग धरू शकतो याउलट दुर्बल हे काळाच्या ओघात नामशेष होतात, असा सामाजिक डार्विनवादाचा सिद्धांत मूळ आदिवासींसाठी लागू ठरतो. इतिहास काळापासून वर्चस्ववादी नेहमीच अधीनस्थांचे अधिकार हिरावून ऐषारामी जीवन जगतात. तेव्हा अशा तथाकथित क्रूर लोकांपुढे आदिवासींना नेहमीच हतबल व्हावे लागते. पण राज्यातील राज्यकर्त्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती आरक्षण ही कोणा लाचाऱ्याला वाढलेली भीक नाही, तो त्यांचा हक्क आहे; लाचार ते आहेत जे दुसऱ्याचा हक्क हिरावून घेतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या शोषणाचे व पिळवणुकीचे मार्ग भिन्न होते ते बहुधा आर्थिक स्वरूपाचे होते. त्यातून कसेबसे तग धरून राहिलेल्या आदिवासींना इतरांच्या सामाजिक प्रवाहाबरोबर आणण्यासाठी संरक्षणात्मक भेदभाव धोरण अवलंबिले गेले. मात्र अलिकडच्या काळात शोषणाचे व पिळवणुकीचे केवळ मार्ग बदलले आहेत, शोषण मात्र थांबलेले नाही. काही धनदांडग्यांना आदिवासी म्हणून सवलती लाटायच्या आहेत. दुसरीकडे आदिवासी जमातीच्या नामसाधर्म्य वा नामसादृश्याचा गैरफायदा घेऊन लाखोंच्या संख्येने बिगर-आदिवासी सरकारी नोकऱ्यांचा लाभ घेत आहेत. त्या खोट्या प्रमाणपत्राद्वारे नोकरीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करा असा केंद्र सरकारचा आदेश असतानाही गेली अनेक वर्षे त्यांना संरक्षण दिले जात आहे. त्यामुळे बोगस-आदिवासी जमातींचे दाखले घेऊन सरकारी नोकरी लाटण्याची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सरकारच घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करीत असल्याची ओरड आदिवासी जमाती वर्षानुवर्षे करीत आहेत. पण कोणीही त्यांचे म्हणणे ऐकायला तयार नाही.

राज्यातील अनुसूचित जमातींच्या मूळ लोकसंख्यांमध्ये अनेक बोगस-लोकांचे आगमन-प्रस्थान निरंतरपणे सुरू आहे. हे सन १९६१ ते २०११ पर्यंतच्या दशवार्षिक जणगनना आकडेवारीवरून सामान्य नागरिकाला सुद्धा आकलन होऊ शकेल असे भयानक वास्तव आहे. खाली काही जमातींच्या स्तंभाकृती आधारे बिगर-आदिवासींची बोगसगिरी समजता येईल.

तक्ता. क्र. १




तक्ता. क्र. २



तक्ता. क्र. ३




तक्ता. क्र. ४




तक्ता. क्र. ५




तक्ता. क्र. ६




तक्ता. क्र. ७




तक्ता. क्र. ८




तक्ता. क्र. ९




तक्ता. क्र. १०



तक्ता. क्र. ९




तक्ता. क्र. १०




वरील सर्व दशवार्षिक जनगणना आकडेवारी आधारे केलेल्या स्तंभाकृतीवरून लक्षात येते की, १८ सप्टेंबर, १९७६ नंतर म्हणजेच वास्तव्य क्षेत्रबंधन हटविल्यानंतर बोगसगिरींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे मूळ आदिवासी लोकसंख्येत एकदम भर पडलेली दिसते, हे मात्र आपणास १९७१ व १९८१ मधील जनगणनेच्या तौलनिक अध्ययनावरून सहज लक्षात येईल. मात्र १९६६ पासून तहसीलदारऐवजी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडून जमात प्रमाणपत्र वितरणाची तरतूद आणि २००० पासून जमात वैधता प्रमाणपत्र घेण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे २००१ आणि २०११ च्या जनगणनेमध्ये काही जमातींची लोकसंख्या घटल्याचे दिसते अर्थात मूळ आदिवासींमधील बोगस लोकांची भाकड संख्या काही प्रमाणात कमी झालेली दिसून येते. सन १९२१ नंतर देशाची व राज्याची लोकसंख्या नेहमीच नैसर्गिकरित्या वाढत असल्याचे राष्ट्रीय जनगणना अहवाल सांगतो; परंतु राज्यातील अनुसूचित जमातींमधील बोगसगिरी मात्र यास अपवाद आहे हे वरील जमातींच्या लोकसंख्याविषयक आकडेवारीवरून सिद्ध होते. काही बिगर-आदिवासींना प्रयत्न करूनही जमात प्रमाणपत्रे न मिळाल्यामुळे लोकसंख्यात घट (२००१ व २०११ जनगणनेनुसार) झाल्याचे दिसते.

केंद्र सरकारच्या सूचनेनुसार ७ मार्च, १९९६ नंतर तहसिलपातळीवरून जमातीचे प्रमाणपत्र देण्याची तरतूद बदलून अप्पर जिल्हाधिकारी महसूल विभाग यांच्याकडून प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केल्यामुळे बोगसगिरीला काही प्रमाणात आळा बसला आणि २००० पासून जमात वैधता प्रमाणपत्र घेण्याची तरतूद केल्यामुळे यावर आणखीच वचक बसलेला दिसतो हे वरील स्तंभाकृतीतून आकलन होते; परंतु याचा अर्थ असा नव्हे की, बोगसगिरी संपलेली आहे. एक अत्यंत गंभीर बाब म्हणजे ज्या जमातींची लोकसंख्या दशवार्षिक जनगणनेप्रमाणे १९८१ पासून कायम चढत्या स्तंभामध्ये दिसते त्या जमातींमध्ये अजूनही बोगसगिरी मोठ्या प्रमाणावर चालू आहे. उदा. कोळी महादेव, कोळी मल्हार, कोलाम-मन्नेरवारलू व ठाकूर, ठाकर यामध्ये सर्वाधिक बोगसगिरी आहे.

राज्यातील ४५ अनुसूचित जमातींपैकी निम्म्यावर जमातींच्या नामसाधर्म्यांचा गैरफायदा काही बलशाली वा बलदंड जातींकडून जाहीरपणे घेतला जात आहे, ही वस्तुस्थिती दि. २४ एप्रिल १९८५ च्या शासन निर्णयाने मान्य केली आहे. खऱ्या समुदायातील जमाती व नामसादृश्याचा फायदा घेणाऱ्या बिगर-आदिवासी गटातील जातीमधील फरक स्पष्ट करणारी माहिती पुन्हा तपासून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी दि. १० सप्टेंबर, १९९७ च्या शासन निर्णयान्वये श्री. सुधीर जोशी, तत्कालीन मा. मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीला अहवाल दि. ११ सप्टेंबर, २०१२ रोजी शासनास प्राप्त झाली आहे. सदर अहवाल स्वीकारण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेत ४ जानेवारी, २०१२ रोजी राज्य जमाती सल्लागार परिषदेच्या ४७ व्या बैठकीमध्ये चर्चा झाली. त्यानुसार राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीतील जमातींपैकी एकूण १७ जमातींबाबत मानववंशशास्त्रीय वा लोकसंस्कृतिवर्णनात्मक अध्ययन (Ethnographic study of 17 tribes) करण्यासाठी नियोजिले आहे, ज्यात अधिक बोगसगिरी सुरू आहे. त्यातील तडवी भिल्ल, धानका, तडवी, गोंड गोवारी, माना, कमार, कवर, कनवर, कौर, छेत्री, नायकडा, नायका, चोळीवाला, कोकणा, कोकनी, मन्नेरवारलू, कोळी ढोर, टोकरे कोळी, कोळी महादेव, कोळी मल्हार, कोया, धनगड, परधान, ठाकूर व तत्सम्, ठाकर व तत्सम् इ. चे अध्ययन केले जाणार आहे. या अभ्यासाच्या उद्दिष्टांमध्ये मुख्यत: आदिवासींची मूलभूत ओळख आणि इतिहास, त्यांची शारीरिक वैशिष्ट्ये, भाषा, त्यांची जन्म, विवाह आणि मृत्युविषयक जीवनपद्धती, धर्माबाबतच्या संकल्पना, रितीरिवाज, देवदेवता, श्रद्धा आणि चालीरिती यांना समजणे आणि त्यांचे सामाजिक, आर्थिक जीवनाचे विविध पैलू तसेच समुदायातील नातेसंबंधाच्या विविध पैलूंचा अभ्यास अंतर्भूत आहे. त्याचप्रमाणे आंतर सामुदायिक संबंधांना समजण्यावर भर दिलेला आहे. या आणि अशा अनेक मानववंशशास्त्रीय दृष्टीने अध्ययन केले जाणार आहे. या अभ्यासामुळे येत्या काळात जमाती वैधता प्रमाणपत्र देण्याकरिता जात वैधता पडताळणी समितीतील प्रशासकीय अधिकाऱ्यांना जमातीसंदर्भातील अभ्यास मार्गदर्शक ठरणार आहे आणि विशेष बाब म्हणजे बोगस-आदिवासी प्रमाणपत्र वितरणावर मोठ्या प्रमाणावर पायबंद घालता येऊ शकणार आहे.

आजमितीस तरी, महाराष्ट्र शासनाद्वारे राज्यसेवेतून निवड झालेल्यांमधून आठ अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती कार्यालयांमधून सह-आयुक्त दर्जाचे आणि उप-विभागीय पोलिस अधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांच्यामार्फत कामकाज केले जात आहे. परंतु सदर बोगस वा नामसादृश्याच्या आधाराने खोटे वा बोगस जात वैधता प्रमाणपत्रांची संख्या लक्षात घेता अर्थात बोगसगिरीवर प्रतिबंध घालण्यासाठी राज्यातील सर्व आठ समित्यांवर भारतीय प्रशासकीय सेवा (आय. ए. एस.) आणि भारतीय पोलिस सेवा (आय. पी. एस.) दर्जाच्या सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली तरच या बोगस वा नामसादृश्याचा फायदा घेऊन खऱ्या आदिवासींना विकासापासून कोसो दूर लोटण्याचा जो घाट घातलेला आहे त्यास निश्चित पायबंद बसेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने मूळ आदिवासींचा विकास होऊ शकेल. भारतीय संविधान तरतुदीनुसार या आणि अशा संबंधीच्या विकासाबाबत दखल घेण्याची व सुरक्षितता प्रदान करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्याची असून वरील निर्णयाबाबत शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची व फलदायी ठरणार आहे आणि याकडे संपूर्ण मूळ आदिवासी समुदायांचे आशादायी लक्ष लागलेले आहे.

अलिकडेच राज्यामधील अनुसूचित जमाती कल्याण समितीने किनवट, जि. नांदेड आणि नागपूर या आदिवासीबहुल भागांमध्ये अचानक भेटी दिलेल्या आहेत आणि या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस वा नामसादृश्याचा फायदा घेणाऱ्यांचा भंडाफोड झालेला आहे. या समितीच्या धडक कार्यवाहीमुळे त्यांच्या कामाच्या माध्यमातून मूळ आदिवासी समुदायाला एक आशेचा किरण दिसत असल्याचे वाटत आहे.

❖❖❖

# आदिवासी उत्थान कार्यक्रम कुपोषणमुक्तीचे यशस्वी प्रतिमान (मॉडेल)

**प्रस्तावना :**

अलीकडे आदिवासी समाजातील कुपोषण ही गंभीर समस्या झाली आहे. मुंबई हायकोर्टाने याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनास याबाबत विचारणा केली. त्याच्या फलस्वरूप महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागांतर्गत जामखेडच्या डॉ. रजनीकांत आरोळे, पद्मभूषण यांची सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प ही संस्था आणि आमची महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांना संयुक्तपणे आदिवासी उत्थान कार्यक्रम ५ वर्षांसाठी महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांतील ९ आदिवासी बहुल तालुक्यांसाठी मंजूर केला. कार्यक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही जानेवारी २००५ पासून निधीच्या उपलब्धतेनुसार मार्च २०१३ पर्यंत झाली. हा कार्यक्रम शासन व स्वयंसेवी संस्था यांच्या भागीदारीतून चालावा असा मनोदय शासनातर्फे व्यक्त करण्यात आला होता. त्याप्रमाणे या भागीदारीचे एक उत्तम प्रतिमान निर्माण झाले व त्याप्रमाणे फलनिष्पत्ती झाली. शासन व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त समित्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम चालविण्यात आला.

**कार्यक्रमाचे वैशिष्ट्य :-**

हा कार्यक्रम कर्मचाऱ्यांच्यामार्फत न राबविता गांव-पाड्यातील आदिवासी महिला व पुरुष स्वयंसेवक व मार्गदर्शकांच्या माध्यमातून राबविण्यात आला. स्त्री-पुरुष समसमान प्रमाणात असलेल्या एकंदर ५६३ मानव संसाधकांपैकी केवळ ७ क्षेत्रकार्यातील तालुका समन्वयक कर्मचारी स्थानिक बिगर आदिवासी होते. इतर सर्व आदिवासी कार्यकर्त्यांना रुपये २५०/- ते ४००/- पर्यंत प्रती महिना असे मानधन देण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आदिवासी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण झाले. या कार्यक्रमाचा समारोप स्वयंसेवकांचा मेळावा व दीक्षांत समारंभ नाशिक येथे राज्यमंत्री, श्री. पद्माकर वळवी व आदिवासी विकास विभागाचे आयुक्त, श्री. संभाजीराव सरकुंडे, भा.प्र.से. यांच्या उपस्थितीत २२ नोव्हेंबर २०१२ रोजी संपन्न झाला.

**ध्येय :-**

शासनाच्या भागीदारीत आदिवासी समाजांच्या आरोग्यकेंद्रीत शाश्वत आणि एकात्मिक विकासाचे प्रतिमान विकसित करणे.

**मुख्य उद्देश :-**

१. महिला व मुलांच्या कुपोषण, आजार व मृत्युचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने तसेच साथीच्या आजारांचे नियंत्रण करण्यासाठी गावपातळीवर औषध पेटी, गहू व डाळयुक्त न शिजवता खाण्यासारखा आहार, झबले-टोपडे वितरण, परसबाग व इतर कार्यक्रम.

२. आश्रमशाळा व अंगणवाडी ह्या दोन संस्था व विकासाचे केंद्र म्हणून विकसित करणे.

३. सुलभ ग्रामीण तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकी तंत्रज्ञान, मत्स्यपालन अशा कृतींद्वारा अन्न सुरक्षितता व आहारासाठी उदरनिर्वाहाच्या साधनांची क्षमता विकसित करणे.

४. सर्वांगीण विकासाच्या योजना, ध्येयधोरणे याबाबत माहिती देऊन पंचायतराज संस्था व समाज यांचे सबलीकरण करून त्यांना विकास कार्यक्रमात सहभागी करून घेणे.

५. आदिवासींमध्ये अस्मिता, स्वत:ची सांस्कृतिक ओळख व राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे संवर्धन करणे.

**तात्त्विक बैठक :-**

पुण्याच्या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदे (मास) चा दृष्टीकोन लोकांच्या नजरेतून त्यांच्या संस्कृतीकडे, समस्यांकडे पाहून त्याची उकल लोकांच्या सहभागातून करणे असा आहे. संस्कृती व समाज एकात्मिक असतात. म्हणून सांस्कृतिक-सामाजिक परिवर्तन करावयाचे झाल्यास वेगवेगळ्या अंगांना बदलता येत नाही. एका अंगास जरी प्राधान्य दिले तरी सर्व एकात्मतेचा विचार करावा लागतो. काही संस्था आरोग्याच्या माध्यमातून, काही शिक्षणाच्या माध्यमातून तर काही उपजीविकेच्या माध्यमातून परिवर्तनाची दिशा ठरवितात. शासकीय विभाग वेगवेगळ्या अंगांचा स्वतंत्रपणे विचार व कृति करतात. परंतु आदिवासी विकास विभाग सर्व आदिवासी प्रदेश, लोक, समाज व संस्कृती परिवर्तनाबद्दल कृतिशील आहे.

विकास शाश्वत होणे म्हणजे विकासाचा विचार, कृति व दिशा हे संस्कृतीचे अंग बनणे. संस्कृती ही जन्मल्यापासून व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य अंग बनते व त्यामुळे तिची प्रमुख मूल्ये व एकात्मता अबाधित राहते. समाजाचा विकास म्हणजे मानव सभासदांचा विकास. मानव विकास व मनुष्यबळ विकास या संकल्पना एकमेकांस पूरक आहे. मानव विकास हा विकासाचा दृष्टीकोन व ध्येय आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे ध्येय आदिवासी जनतेचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने शाश्वत व सर्वांगीण विकासाचे, मानव विकासाचे प्रतिमान (मॉडेल) विकसित करणे हे आहे. कुपोषण कमी करण्याच्या प्रक्रियेतून हे मॉडेल घडू शकते, या तात्त्विक भूमिकेतून कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला व त्याची अंमलबजावणी करताना, प्रत्येक टप्प्यातून शिकून त्यात बदल करण्यात आले. शासनाच्या आदिवासी विकास योजनेत या मॉडेलचा अंतर्भाव झाल्यास कार्यक्रम व त्याची फलनिष्पत्ती शाश्वत होईल.

आदिवासी उत्थान कार्यक्रमाने प्रत्यक्ष कृती-कार्यक्रमांवर किती खर्च केला व अंमलबजावणीसाठी प्रशासकीय बाबींवर किती खर्च याचेही गणित अभ्यासण्यासारखे आहे आणि हे अर्थकारण शासनाच्या बजेटमध्ये बसण्यासारखे आहे. म्हणजेच आदिवासी उत्थान कार्यक्रम शासनाचा अंगीकृत कार्यक्रम म्हणून शाश्वत स्वरूपात अंगिकारला जाऊ शकतो.

आदिवासी उत्थान कार्यक्रम प्रकल्प नसून कुपोषण केंद्रित प्राधान्याने आरोग्यविषयक विकास कार्यक्रम आहे. प्रत्यक्ष कृति कार्यक्रमाद्वारे सर्वांगीण विकासाचे प्रतिमान शासन-स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून निर्माण करण्याचा हा एक रचनात्मक प्रयोग आहे. कार्यक्रमात संशोधन कर्मचारी नसूनही ९ कार्यक्षेत्रांची अंमलबजावणी साधारणतः ५५० आदिवासी स्वयंसेवक-मार्गदर्शकांनी केली तरी कार्यक्रमाच्या दस्तैवजिकरणाकडे लक्ष पुरवण्यात आले. त्यासाठी कार्यक्रमात असणाऱ्या सगळ्या लोकांचा आधारभूत सर्व्हे स्थानिक आदिवासी युवकांकडूनच करविण्यात आला. फलनिष्पत्तीचे मोजमाप केवळ सांख्यिकी आकड्यात न घेता, लोकांच्या त्यांच्या भाषेतील प्रतिक्रियाही घेण्यात आल्या. या आकडेवारीवरून बोध घेऊन संशोधन संस्थांना, विद्यापीठांना संशोधन प्रकल्प आखण्यास मदत होईल.

आदिवासी उत्थान कार्यक्रम महाराष्ट्रातील सर्व आदिवासी बहुल तालुक्यात व सगळ्या प्रमुख आदिवासी समाजांना स्पर्श करणारा असल्याने महाराष्ट्राच्या आदिवासींची परिस्थिती आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे स्पष्टपणे समजते.

## कार्यक्षेत्राचा तपशील

| क्र. | कार्यक्षेत्र | ग्रामपंचायती | प्रमुख आदिवासी समाज | गावे | पाडे | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अकोले, जि. अहमदनगर | १६ | महादेव कोळी | ३० | २३ | १७३०६ |
| २. | अक्कलकुवा, जि. नंदुरबार | ३ | भिल्ल | ११ | ५८ | १६९८७ |
| ३. | धडगाव, जि. नंदुरबार | ५ | भिल्ल व पावरा | ३१ | ९२ | २५४३२ |
| ४. | धारणी, जि. अमरावती | ७ | कोरकू | १९ | ०० | १६८९५ |
| ५. | एटापल्ली, जि. गडचिरोली | ७ | माडिया | ४१ | २० | ११८०२ |
| ६. | जव्हार, जि. ठाणे | ९ | ठाकर, वारली, कोकणा, कातकरी, ढोरकोळी | १९ | ४१ | १९५३६ |
| ७. | मोखाडा, जि. ठाणे | ७ | ठाकर, वारली, कोकणा, महादेवकोळी | १२ | ७५ | २४३१३ |
| ८. | कर्जत, जि. रायगड | १५ | कातकरी व ठाकर | ०० | ६७ | २१८०१ |
| ९. | झरीजामणी, जि. यवतमाळ | ११ | कोलाम व गोंड | २३ | ४६ | १४३७६ |
| | एकूण | ८० | | २०९ | ४४८ | १६८०४८ |

कोणत्याही कार्यक्रमात जनतेच्या सक्रिय सहभागाशिवाय अपेक्षित फलनिष्पत्ती होत नाही. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रत्येक गाव-पाड्यावर स्वयंसेवकांकडे मोफत आयुर्वेदिक व आधुनिक औषध पेट्या सामान्य उपचारासाठी ठेवण्यात आल्या. परसबागांसाठी भाज्यांच्या बियाणांचे मोफत वाटप. तसेच तलावांत मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले. मुख्यतः स्त्रीया व मुलांसाठी आरोग्य कँप, नवजात बालकांना थंडी वाऱ्यापासून संरक्षणासाठी झबले-टोपड्यांचे दोन संच मोफत देण्यात आले.

कार्यकर्त्यांचे ज्ञान व कार्यक्षमता महिन्यातून दोनदा एक दिवसीय प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. त्याशिवाय समाजातील इतर घटकांनाही प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेतला.

### आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रात विकासाकरिता प्रशिक्षणातून तयार झालेले प्रशिक्षित आदिवासी मनुष्यबळ

| | |
|---|---|
| १) दाई प्रशिक्षण | ५०० दाई |
| २) वैदू प्रशिक्षण | ३४९ वैदू |
| ३) पंचायतराज प्रशिक्षण | ३४४ ग्रामपंचायत सदस्य |
| ४) आरती संस्था प्रशिक्षण | १४५ ग्रामीण तंत्रज्ञ |
| ५) पपेट संस्था प्रशिक्षण | १५० पपेट शो कलाकार |
| ६) शिवणकला वर्ग प्रशिक्षण | २९५ प्रशिक्षित संसाधक |
| ७) बांबू हस्तकला प्रशिक्षण | १८४ बांबू हस्तकलाकार |
| ८) स्वयंसेवक प्रशिक्षण | ५०० आदिवासी विकास कार्यकर्ते |
| ९) मार्गदर्शक प्रशिक्षण | ८० आदिवासी विकास मार्गदर्शक |
| एकूण | २५४७ |

**कार्यक्रम व ठळक फलनिष्पत्ती :-**

१) गरोदर महिलांना चौथ्या महिन्यापासून बाळंतपणापर्यंत एकवेळ संपूर्ण जेवण (वरण, भात, भाजी, पोळी/भाकरी व कधीकधी अंडी, मासे, फळे) दिल्याने नवजात बालकांच्या जन्मवजनात वाढ दिसून आली.

२) आयुर्वेदिक स्तन्यजनन पदार्थ, जसे शतावरी, अश्वगंधा, पिंपळी, ज्येष्ठमध युक्त सत्तू पूरक आहार स्तनदा मातांना ६ महिने दिल्याने पुरेशा प्रमाणात दुग्ध (स्तन्य) निर्मिती वाढली. त्यामुळे अर्भक अवस्थेतील कुपोषण थांबले.

३) ६ महिने ते २ वर्षे वयाच्या बालकांना तयार पूरक आहार म्हणून पोषक सत्तू दिल्याने कुपोषणात लक्षणीय घट झाली.

४) दायांना व इतर महिलांना बाळंतपणाचे व शिशुपालनाचे प्रशिक्षण दिल्याने नवजात मृत्युत घट तसेच स्वयंसेवकांमार्फत अवघड बाळंतपण व शिशुच्या प्रकृतिबाबत जागरूकता तसेच वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याबाबतच्या कृतिमुळे बालमृत्युत घट झाली. बाळंतपणे गावात बांधलेल्या स्वच्छ दाईकुटीत करण्याकडे कल वाढला.

५) व्हिटामीन व मायक्रो-न्यूट्रिअंटच्या उपलब्धीसाठी परसबागेतील भाज्यांसाठी दरवर्षी मोफत बियाणे वाटप करण्यात आले.

६) नवजात बालकांना थंडी-वाऱ्यापासून संरक्षण मिळण्यासाठी व जन्मनोंदणीसाठी झबले-टोपडे-दुपट्याचे दोन संच दिले, त्यामुळेही बालमृत्यू व आजाराचे प्रमाण कमी झाले.

७) प्रत्येक स्वयंसेवकाच्या घरी साधारण आजारांवरील उपचारासाठी ॲलोपॅथी व आयुर्वेदाची मोफत औषध पेटी चोवीस तास उपलब्ध झाल्याने आजारांवर तत्काळ नियंत्रण मिळविता आले.

८) स्वयंसेवकांमार्फत मुलांची त्यांच्या घरी जाऊन दर महिन्याला वजने घेतल्याने वजनाचा व कुपोषणाचा संबंध जनतेच्या लक्षात आला.

९) स्वयंसेवकांची वजन घेण्याची व अंगणवाडी चार्टवर नोंदविण्याची क्षमता वाढली. त्यामुळे लोकांचे संघटन करणे व शासकीय योजना त्यांच्यामार्फत पोहोचवण्याचे प्रयत्न करण्याचा आत्मविश्वास वाढला.

१०) ग्रामपंचायत सदस्य, वैदू, दाई, पपेट तयार करून खेळवणे, बांबूकाम, निर्धूर चुली तयार करणे, शिवणकाम इ. चे प्रशिक्षण मिळाल्याने आपापल्या कामाबद्दल आत्मविश्वास वाढला. बऱ्याच स्वयंसेवकांची त्यांच्या समाजात पत वाढली. काहींना अंगणवाडी सेविका, आशा, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच अशी मानाची पदे किंवा आर्थिक पदे मिळाली.

११) तालुका कर्जत, झरी-जामणी, जव्हार, एटापल्ली येथे आदिवासी समाजाच्या वस्त्या, पाडा, वाडी गावठाणापासून काही अंतरावर असल्याने व आदिवासी आणि जातीवाचक शेतकरी समाज यांच्यात सामाजिक दुरावा असल्याने आदिवासी मुले गावठाणातील अंगणवाड्यांचा लाभ घेऊ शकत नव्हते. त्यासाठी पाडा/वाडी/वस्त्यांवर मिनी अंगणवाडीच्या रूपात आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत खेळवाड्या सुरू केल्या. त्यापैकी बऱ्याच खेळवाड्यांचे रूपांतर मिनी अंगणवाडीत करण्यात आले.

१२) शासन व स्वयंसेवी संस्था भागीदारीत रचनात्मक आदिवासी विकास व कुपोषणमुक्तीचे काम करू शकतात, याचे आदिवासी उत्थान कार्यक्रम हे चांगले उदाहरण आहे. महाराष्ट्रातील आदिवासी प्रदेशातली पहिले पोषणगृह आदिवासी उत्थान कार्यक्रमाने जव्हार, जि. ठाणे येथे चालविले.

थोडक्यात, आदिवासी स्वयंसेवक व मार्गदर्शक यांची परिवर्तन घडविण्याची क्षमता वाढली. (ही प्रक्रिया चालू राहिल्यास गावपाडा पातळीवर विकासाचे नियोजन व त्याची अंमलबजावणी तसेच शासकीय योजनांचा उपयोग करण्याची जिद्द निर्माण होईल. त्यासाठी प्रशिक्षित आदिवासी मनुष्यबळ केवळ मानधनावर विकासाची, सर्वेक्षणाची काम करण्याची संधी मिळावी. मोठ्या प्रमाणावर महिला व तरुणांना प्रशिक्षणाची सोय करावी. कर्मचारी वर्ग तयार होणार नाही याची खबरदारी घ्यावी.)

डिसेंबर २००५ मध्ये स्थानिक शिक्षित तरुणांच्या माध्यमातून पायाभूत सर्वेक्षण घेण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यात २०१२ पर्यंत कार्यकर्त्यांच्या रजिस्टरमधील आकड्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यावरून कुपोषणाचे प्रमाण श्रेणी ३ मध्ये ८.८ टक्क्यावरून २.३ पर्यंत खाली आले व श्रेणी ४ चे प्रमाण ३ टक्क्यांवरून ०.३७ टक्क्यांपर्यंत घटले. श्रेणी २ चे प्रमाण २५ टक्क्यांवरून १९ टक्क्यांपर्यंत कमी झाले, तर साधारण श्रेणी ३१ टक्क्यावरून ४७ टक्क्यांवर वाढली.

**आदिवासी जनतेच्या कार्यक्रमाविषयी बोलक्या प्रतिक्रिया**

**गरोदर माता जेवण कार्यक्रम :-** "आम्हाला इथं मिळायचा तो खाना बेस. चांगला वाटस ना. माझं वजन वाढलं. पहिला बाळ कमी वजनाचा होता. इथं जेवला ना तो बाळ तीन वजनाचा भरला. पहिली तीन बाळं कमी वजनाची. हा चांगला झाला. म्हणजे वजन वाढत जात असा. घरी असताना एकची एकच भाजी, नाहीतर दिवस कोरडा पण जायचा." ***(गरोदर माता, पासोडी पाडा, जव्हार).***

**सकस खाऊ :-** "लोकांना आता एवढं तरी समजत की, वजन कमी झालं की बाया घरच्या घरी पदार्थ बनवतात आणि मुलांना देतात. जे घरात असेल ते डाळ, तांदूळ, नागली बनवून देतात." ***(ग्रामस्थ बेरीस्ते).***

**वजन नोंद :-** "वजन वाढतं का वाढत नाही, वजन कमी होतं तेच पाहण्यासाठी वजन करायचा. वजन कमी झाला म्हणजे आईला काळजी रहातो ना." ***(ग्रामस्थ, कोंढारवाडी, अकोले, जि. अहमदनगर).***

**झबले-टोपडे-दुपटे संच :-** "कपड्यांचा तर खूप चांगला उपयोग आहे. आधी जुने कपडे वापरायचे. हे कपडे नीट वापरता येतात. मुलांना आजारापासून वंचित ठेवतात. मुलांची काळजी घेणं वाढलं." ***(लक्ष्मण मुकणे, कातकरी, जव्हार, जि. ठाणे).***

**परसबाग :-** आम्हाला वेगवेगळ्या भाज्या खायला मिळतात, जेवणात फरक पडला.

**औषधे :-** मालसिंगकडे औषधे असतात, रात्री अपरात्री गरजेच्या वेळी औषध देतो व त्याचा फायदा होतो. औषध नसले तर आम्हाला पिंपळखुटा, मोलगीला जावे लागते. पैसे नसले तर मरावे लागते. आजारी पडलं की पैसा पुढे आणी आम्ही मागे, असा प्रवास असतो. आमच्याकडे कुठे पैसा आहे ? ***ग्रामस्थ : दुधलीपादर, जुगलखेत, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार.***

**दाई प्रशिक्षण :-** कार्यक्षेत्रातील स्वयंसेवकांनी गाव पाड्यात बाळंतपण करण्यास सुरूवात केली. काही स्वयंसेविकांनी ( ज्या दाईसुद्धा आहेत) २० ते ३० सुरक्षित बाळंतपणे केली आहेत.

**दाई कुटी :-** "बाळंतपण करण्यासाठी बांधली ना बाबानो. पण आता जी आली बाई ती तथंच निजेल ना त्याचा फायदा झाला."

**सारांश :-**

शासन-स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून व जनतेस विश्वासात घेऊन कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी केल्यास अपेक्षित फलनिष्पत्ती होते. आदिवासी विकासातील त्रुटीचे एक प्रमुख कारण असे की, विकासाचा निधी व कार्यक्रम हे एकमार्गी विभागांमार्फत राबविण्यात येतात परंतु त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे किंवा समन्वयाचे अधिकार आदिवासी विकास विभागाकडे नाहीत. आदिवासी उत्थान कार्यक्रमातही शिक्षण, आरोग्य, महिला बाल कल्याण, बांधकाम इ. विभागांच्या तालुका व गांव-पाडा पातळीवरील शासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग व समन्वयात अडचणी निर्माण होत असत. काही प्रमाणात, स्थानिकपातळीवर अनौपचारिक पद्धतींनी त्याचे निराकरण झाले तरी शासन यंत्रणेत त्याबाबत रचनात्मक परिवर्तन करण्याची गरज आहे.

❖❖❖

# आदिवासी संस्कृती

• डॉ. भौमिक देशमुख

'आदिवासी' या संस्कृत शब्दाचा अर्थ म्हणजे आधीपासून वास्तव्य करणारा ! विशिष्ट देशांत, प्रदेशात किंवा प्रांतात इतर परप्रांतातील लोक वास्तव्यास येण्याअगोदरचे मूळ लोक म्हणजे 'आदिवासी' होय. भारतात त्यांना कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टीकोनातून 'अनुसूचित जमाती' म्हणतात. या प्रशासकीय नावात सांस्कृतिक आणि सामाजिक आशय मात्र नाही. 'आदिवासी' या शब्दाचा काळाच्या ओघात अनुवंशिकतेपेक्षा सांस्कृतिक आशयच जास्त गडद झालेला आहे. एके काळी अनुवंशिकदृष्ट्या आर्य, द्रविड आणि आद्रविड म्हणजे 'आदिवासी' स्वतंत्र वंश म्हणून स्पष्ट ओळख होती. परंतु कालौघात आर्य आणि द्रविड जीवनसंस्कृतीतील अंतर जवळजवळ संपुष्टात आले तर आदिवासी मात्र वांशिक, सांस्कृतिकदृष्ट्या त्यांची ओळख टिकवून आहेत आणि म्हणून आदिवासी संस्कृतिविषयी जाणून घेण्याची जिज्ञासा लोकांमध्ये अजूनही प्रबळ आहे.

माणूस भोवतालच्या निसर्गामध्ये जीवनाच्या प्रगतीला अनुकुल असे बदल करून म्हणजे त्यावर संस्करण करून आपले जीवन अधिक सुरक्षित आणि समृद्ध बनवितो. हे करीत असताना तो स्वत:चे मन, बुद्धी आणि कल्पकता यांच्यावरही संस्कार करून त्यांचा अधिक चांगला वापर करतो, या साऱ्यांना स्थूलमानाने संस्कृती म्हणता येईल. म्हणजे धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेचे परंपरेने वाढत जाणारे प्रतीक म्हणजे संस्कृती होय. संस्कृतीत भौतिक सृष्टीतील परिवर्तन व त्याचबरोबर मानसिक परिवर्तन हातात हात घालून येत असते. (द. ता. भोसले).

आदिवासी संस्कृती ही निसर्गपूजक आहे. आदिवासी समाज शतकानुशतके निसर्गाच्या सान्निध्यात वास्तव्यास असल्यामुळे उपलब्ध नैसर्गिक साधने व घडणाऱ्या विविध घटना यांच्याबरोबरच्या सहयोगातून एक जीवनशैली विकसित झाली, ती पुढे संस्कृती म्हणून स्थिरावली. आदिवासी जीवन तात्विक पातळीवर व्यापक व उदात्त असेल तरी बदलत्या काळानुसार ही व्यापकता व औदार्य व्यावहारीक जीवनात विशिष्ट पद्धतीने कार्यान्वित व स्थापित झालेली आहे. त्याला काही लोक आदिवासी धर्म देखील म्हणतात. परंतु आदिवासी धर्मापेक्षा आदिवासी संस्कृती जास्त व्यापक आहे.

आदिवासी संस्कृतीची वैशिष्ट्ये विविध असली तरी प्रामुख्याने १. निसर्गोपासना आणि २. देवके (totems) ही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. आदिवासींचे जगणे हे निसर्गाधारीत आणि निसर्गाभिमुख असते. आपले अस्तित्व हे निसर्गामुळेच आहे. अशी त्यांची ठाम समजूत आहे. नैसर्गिक स्त्रोत हीच आपली उपजीविकेची आणि उन्नतीची साधने आहेत म्हणून निसर्गाचे ऋण व्यक्त करण्यासाठी, निसर्गाच्या उत्तराईतून मुक्त होण्यासाठी, निसर्गाला शरण जाऊन सूर्य, चंद्र, आकाश, पृथ्वी, जल, वायू, अग्नी, वीज, वृक्षवेली, हिंस्त्र प्राणी वाघ, सिंह, साप आणि अन्य निसर्गात आढळणाऱ्या बारीक-सारीक गोष्टी, पशु-प्राणी इत्यादींची आदिवासी लोक पूजा करतात, पूजेचे स्वरूप स्थानिक जीवन रहाटणीवर आधारित असते. उदा. शेती व शेतीशी संबंधित काम करणाऱ्या किंवा शिकार करणाऱ्या महाराष्ट्रातील भिल्ल, वारली, कोकणा-कोकणी, ठाकूर, महादेव कोळी, गोंड, परधान. कोलम, कातकरी या जमाती सुगीच्या हंगामात पिकांची कापणी आणि काढणी करण्यापूर्वी सूर्याची मनोभावे पूजा करतात. ही पूजा कोणत्याही विशेष साहित्य वा सामुग्रीशिवाय केली जाते. शेतीत आलेल्या पिकांची प्रातिनिधीक २-३ कणसे कापून त्यांच्यावर पाण्याचे थेंब शिंपून सूर्याच्या दिशेने ही कणसे वाहिली जातात; आता अलिकडे आदिवासींकडेही नारळ, अगरबत्या, कुंकू उपलब्ध होऊ लागल्यापासून या वस्तुंचा वापर पूजेत होत असताना दिसतो. आदिवासींमधील काही कुटुंबे ह्याप्रसंगी स्वेच्छेने जीवंत कोंबडी निसर्गाला अर्पण करतात. कोंबडी अर्पण केल्याच्या काही वेळानंतर कुटुंबातील आणि शेजारी-पाजारी मंडळी ह्या कोंबडीला पकडून, मारून चविष्ट मटन शिजवून नैवेद्य म्हणून निसर्गाला दाखवितात आणि जेवणाचा आस्वात घेतात. तिच गोष्ट खळ्यात पिकांची मळणी झाल्यानंतर आकाशात चंद्र असेल तर चंद्राच्या साक्षीने धान्याची पूजा करतात. या प्रसंगी भरून आलेले पीक, धन-धान्याचे भरलेले शिवार किंवा शिकारीसाठी पूरक स्थिती, गुरे-ढोरे आणि निसर्गाचे प्रतिक म्हणून सर्वोसर्वा 'सूर्य' आणि त्याखालोखाल 'चंद्र' या सर्वांचा पवित्र संयोग एक दुसऱ्याप्रती आदर व्यक्त करण्याच्या भावनेतून घडलेली ही कृती असते. चंद्र आणि सूर्याने आम्हाला भरभरून दिले म्हणून त्याच्याप्रतीचा आदर आम्ही व्यक्त करतो या एका सुंदर कल्पनेचा हा अविष्कार असतो.

दुसरे उदाहरण सांगता येईल की, या आदिवासी जमाती आश्विन वद्य द्वादशीला लक्ष्मीपूजनाच्या पाच दिवस आधी 'वाघबारस' हा प्रसंग साजरे करतात. या दिवशी गावच्या शीवेवर बकऱ्याचा बळी देऊन वाघाला शरण जातात, आदर व्यक्त करतात. वाघ हा प्राणी त्यांचे पाळीव प्राणी शेळ्या, मेंढ्या भक्ष्यस्थानी ठेवतो तर दुसऱ्या बाजूला आदिवासींना धोका असणाऱ्या काही हिंस्त्र प्राण्यांपासून वाघ त्यांचे

• लेखक प्राध्यापक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.

संरक्षण करतो, तेव्हा ही परतफेड करण्यासाठी वाघाची पूजा केली जाते. वाघबारसेला नैवेद्य म्हणून बोकडाचे मटन घरात न शिजवता अंगणात शिजवतात आणि जेवतात. वाघाचा प्रसाद बाहेरच लागू पडतो असे काहीसे कारण ते सांगतात. अर्थात या सर्व घटना आणि कृतीमागील शास्त्रीय कारण त्यांना सांगता येत नसले तरी निसर्गाप्रतीची एक प्रखर आसक्ती, ओढ आणि आदर दिसून येतो. हजारो वर्षापासून चालू असणाऱ्या या प्रथांना अलिकडे समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ 'सर्वात्त्मवाद ' किंवा 'चेतनावाद' म्हणतात. म्हणजेच आत्म्याचा सर्व सजीव व निर्जीव गोष्टीत सार्वत्रिक वावर आहे आणि म्हणून निसर्गातील या सर्व चेतन-अचेतन गोष्टीतील आत्म्याचा आपण आदर केला पाहिजे, असे काहीसे विवेकी कारण ते सांगतात. ते काहीही असो पण आदिवासी मात्र निर्मळ भावनेने निसर्गाचा एक घटक म्हणून आपली कर्तव्ये पार पाडून समाधानी राहण्याचा प्रयत्न करतो.

मध्य व पश्चिम महाराष्ट्रातील कोकणा आणि भिल्ल या जमातींमध्ये 'डोंगरीदेव' अथवा 'भाया' हा उत्सव कार्तिक पौर्णिमेस उत्साहात तेवढ्याच आध्यात्मिक गांभीर्याने साजरा केला जातो. विशाल पर्वतराजींच्या कपारात किंवा बोगद्यात 'कणसरी' म्हणजेच धन-धान्याच्या देवतेले वास्तव्य असून या देवतेच्या कृपादृष्टीमुळेच आपण आपली शेती व गुरे-ढोरे सुखी आहोत या भावनेतून निसर्गाचे ऋण व्यक्त करण्यासाठी आणि पुढे चिरंतन सुखासाठी डोंगरीदेवाची ही पूजा पारंपरिक, निसर्ग नियमाप्रमाणे ते करतात. पूर्वी आठवडाभर चालणारा हा उत्सव आता दोन-तीन दिवसावर येऊन ठेपला. दरवर्षी डिसेंबरमध्ये साजरा होणाऱ्या या उत्सवामध्ये किशोरवयीन आणि युवा आदिवासींना एकप्रकारे आध्यात्मिक शिस्तीचे धडे मिळतात. पहाटे ४ वाजता नदीवर सुरू होणाऱ्या स्नानापासून ते रात्री उशीरापर्यंत जवळपासच्या पाड्यांवर जाऊन डोंगर देवाची पारंपारिक गाणी गात फेर धरून नाचत प्रत्येक घरातून धनधान्याच्या रूपात प्रसाद घेणे आणि घरातील सर्व माणसांना, गुरांना सुखी राहण्याचा आशीर्वाद देणे, याला ते 'गाव मागणे' म्हणतात. या सर्व प्रक्रियेत विविध पात्रे महत्त्वपूर्ण सांस्कृतिक भूमिका पार पाडतात; त्यात 'मुदानी' अथवा 'भगत' यांचे स्थान मध्यवर्ती असून संपूर्ण उत्सवाचे नियंत्रण आणि नियमन त्यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. उत्सवात सहभागी व्यक्तींना 'माऊली' म्हणून स्थान दिले जाते. उत्सव काळात आठ-दहा दिवस संपूर्ण शाकाहार घेतला जातो. इतर अपवित्र समजल्या जाणाऱ्या गोष्टी दूर ठेवल्या जातात आणि शेवटी पौर्णिमेच्या रात्री डोंगरावर सर्व 'माऊल्या' भगतासह 'कणसरा' मातेची म्हणजेच धनधान्याच्या देवतेची दिर्घपूजा आटोपून पहाटे खाली उतरतात. वरती डोंगरावर 'कणसरी' माता आणि इतर वन्य देवातांना शाकाहरी नैवेद्य दाखवून पूजा केली जाते तर खाली उतरून आल्यावर नदीवर काही शिवार व गाव देवतांसाठी 'मांसाहरी' नैवेद्य म्हणून कोंबड्या आणि बोकडांचा स्वरुपात दिला जातो. रात्री भंडारा घालतात. या उत्सवामध्ये तन आणि मन आहे त्यापेक्षा अधिक निर्मळ व स्वच्छ, पारदर्शक करण्यासाठीचा हा पवित्र सोहळा एक प्रकारची आध्यात्मिक बैठक घालून देत असतो. या उत्सवाचा अविष्कार वेगवेगळ्या फलनिष्पतीतून त्यांना अनुभवावयास येतो जसे, खोटे न बोलणे, चोरी न करणे, मद्यपान न करणे, स्त्रियांचा क्रियाशील सहभाग, शरीर आणि मनाचे पावित्र्य राखणे म्हणजेच मन निसर्गाशी एकरूप करणे, निखळ मनाने चराचर सृष्टीकडे पहाणे या सर्वांच्या एकात्मिकरणेतून प्रचंड सकारात्मक उर्जा प्राप्त होणे इत्यादी ! 'डोंगरी देव' उत्सव म्हणजे आदिवासी निसर्गपूजक असल्याचे द्योतक आहे. मनाची एकाग्रता वाढून पुढचे वर्षभर सकारात्मक राहण्यासाठी उर्जा मिळते. हि एक मोठी उपलब्धी या उत्सवाची आहे.

आदिवासी संस्कृतीचे दुसरे ठळक वैशिष्ट्य म्हणजे 'देवकाची प्रथा' (Practice of totemism) होय. आदिवासी जमातीत विविध कुळे असतात. ह्या कुळांची निर्मिती सजीव अथवा निर्जीव वस्तूंपासून झालेली असते, असा त्यांचा समज आहे. ज्या सजीव अथवा निर्जीव वस्तूपासून कुळांची उत्पत्ती झाली किंवा ज्या सजीव किंवा निर्जीव वस्तूच कुळांच्या संस्थापकांशी अगदी निकटचा संबंध होता अशी त्या कुळातील सदस्यांची दृढ श्रद्धा असते त्या सजीव अगर निर्जीव वस्तूला 'देवक' (totem) म्हणतात. सामान्यत: पशू, पक्षी, झाडे आदी सजीव वस्तूंना आणि सूर्य, चंद्र, वारा आदी निसर्गशक्तींच्या सारख्या निर्जीव वस्तूंना देवक मानण्यात येते. साहजिकच देवक अतिशय पवित्र समजले जाते आणि देवकाचे चिन्ह हे त्या कुळाचे प्रतीक आहे असे समजले जाते. प्रत्येक कुळाचे स्वतंत्र देवक असते. कुळसदस्यांनी देवकाला ठार मारणे अगर देवकाचा खाण्यासाठी उपयोग करणे हे अगदी निषिद्ध मानले जाते. देवकांचे चित्र कुळाच्या निशाणावर काढण्यात येते आणि ते सदस्यांच्या शरीरावर गोंदण्यात देखील येते. कुळाला देवकाचे नाव दिले जाते. समान देवक असलेल्या दोन कुळांमध्ये विवाह होत नाही. महाराष्ट्रातील वारली, कातकरी, महादेव कोळी, कोकणा-कोकणी, भिल्ल. माडिया, गोंड, कोलाम, परधान या जमातींमध्ये देवकांची प्रथा आढळून येते. वास्तविक जगातील सर्वच आदिवासी जमातींमध्ये देवकांची प्रथा होती आणि आजही आहे. परंतु अलीकडे काही अभ्यासकांच्या मते देवकांच्या प्रथेचा ऱ्हास सुरू झालेला आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील आदिवासी जमातींमध्ये देवकाची प्रथा अजूनही प्रचलित आहे. हे लोक उंबर, जांभूळ, आपट्याचे झाड, साल वृक्ष, साग, वड आदी वृक्षांशी त्यांच्या कुलाचा संबंध असल्याचे सांगतात. तर वाघ, हरीण, अस्वल, कोल्हा, मगर, मोर, नाग इत्यादी पशू-पक्ष्यांशीही ते आपले कुलसंबंध सांगतात. स्थानिक काही नद्या, डोंगर, टेकड्या, रानभाज्या, राना-वनातील काही अज्ञात सजीव, निर्जीव वस्तूंशीही ते आपले कुळ-नाते असून त्यांचे पावित्र्य जपणे त्यांचे कर्तव्य समजतात. या सजीव-निर्जीक वस्तूंना 'देवक' म्हणून पिढ्यान-पिढ्या मौखिक परंपरेतून संक्रमित करत त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान देतात. ही देवके त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. आपल्या कुळाची निर्मितीच मूळात या वस्तूंपासून झालेली आहे म्हणून त्या वस्तूंची हानी म्हणजेच आपल्या जीवनाची वाताहत होणे, अशा भावनेतून ते या वस्तूंकडे म्हणजे देवकांकडे पहातात.

त्यांच्या या निसर्गभिमुख दृष्टींकोनामुळे वन-संपत्ती, पशु-धन आणि एकूणच निसर्गसंपदेचे आदिवासींकडून संरक्षण झालेले आपल्याला दिसते. निसर्ग असेल तरच आदिवासी वाचू शकतो असे जे आपण म्हणतो ते या सांस्कृतिक अर्थाने म्हणावयाचे असते. त्यांचा उदरनिर्वाह वन-संपदेवरच होतो असे म्हणतांना आदिवासी जीवनाच्या या अतिशय प्राथमिक अवस्थेविषयी आपण बोलतो, परंतु गेल्या ३०-४० वर्षात शिक्षणामुळे प्रगत झालेली आदिवासी कुटुंबे देखील त्यांचा हा सांस्कृतिक वारसा टिकविताना दिसून येतात. निसर्गाशी असलेल्या जन्मोजन्मीच्या या नात्यांमुळे निसर्ग ही त्यांची आई आहे आणि आईचा घात आम्ही कधीच करणार नाही असे सातपुडा, सह्याद्री, गोंडवना या भागातील आदिवासींचे म्हणणे आहे.

आदिवासी निसर्ग संस्कृतीचा अविष्कार चित्रकला, नृत्य या प्रकारांमधून अधिक ठळकपणे दिसतो. आजूबाजूला घडणाऱ्या विविध घडामोडी ते चित्ररूपात व्यक्त करतात. चित्रातील आडव्य-तिडव्या रेषांमध्ये एक अनोखे सौंदर्य लपलेले दिसते. उदा. एकमेकांच्या हातात हात घालून चालणारी माणसे, गुरांच्या पाठीशी चालणारा गुराखी, डोक्यावर हंडा घेऊन चालणारी आदिवासी स्त्री, लहान बाळाला कापडाच्या झोळीत टाकून पाठीला बांधलेली झोळी, बाळाला अंगावरचे दूध पाजणारी आदिवासी स्त्री असे कित्येक प्रसंग आदिवासी माणूस अस्सलपणे कापडावर, सपाट मोठ्या खडकावर, त्याचप्रमाणे दगड, कागद अथवा लाकडावर काढतो. ही जिवंत चित्रे निरागस आदिवासी जीवनाविषयी अधिक कुतूहल निर्माण करतात. पारंपरिक आदिवासी चित्रकाराच्या मनात चित्र रेखाटतांना निसर्गाप्रती एक समर्पणाची भावना असते, एकमेकांप्रती प्रेम, जिव्हाळा आणि कणव दावविण्याची एक मनाची स्थिती असते. या भावनेतून ते चित्रकलेकडे पहातात. चित्रकलेकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून त्यांनी कधीच पाहिले नाही. आज वारली चित्रकलेचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो परंतु त्या कलेतून बिगर आदिवासी कलाकार आर्थिक मिळकत मोठ्या प्रमाणावर करतात, परंतु एखाद दुसरा अपवाद वगळता आदिवासी चित्रकार चित्रकलेतून कमाई करताना दिसत नाही. आदिवासी जीवनातील सांस्कृतिक ठेव्याकडे व्यापारी दृष्टीकोनातून आदिवासींनी कधीच पाहिले नाही.

आदिवासींचा आनंद आणि दु:ख व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणजे 'नृत्य' विशेषत: सुख, समाधान आणि आनंदाच्या प्रसंगी विशिष्ट ताल आणि सुरांवर बेधुंदपणे मोजक्याच टप्प्यांमध्ये नृत्य करण्याची आदिवासींची कला म्हणजे जीवनात समाधान मिळविण्याचे तत्वज्ञान अंतर्भूत आहे, असे नेहमीच वाटते. विवाह, सण, समारंभ, सुगीचे दिवस, उत्सव, देवकपूजा, निसर्ग उत्सव अशा नानाविध प्रसंगामध्ये आदिवासी लोक रात्र-रात्र नृत्याविष्कार दाखवित असतात. सुगीच्या दिवसात वारली लोक 'तारपा' नृत्य करतात तर भिल्ल लोक होळी, सुगी, विवाह या प्रसंगात भिल्ली नृत्य आणि कोलाम, गोंड, परधान ही मंडळी 'दंडार' नृत्य करतात. कोकणा लोक डोंगरी देव उत्सवात 'कणसरा' नृत्य तर लग्नादिप्रसंगी टिपरी नृत्य करतात. पौराणिक पात्रे साकारण्यासाठी 'बोहडा' नृत्य कोकणांमध्ये सुप्रसिद्ध आहे. प्रत्येक आदिवासी जमात निसर्गाशी एकरूप होऊन नृत्यविष्कार दाखवित असतात. या नृत्यांमध्ये मानवी मन, निसर्ग आणि समर्पण या भावनिक घटकांच्या संमिश्रणातून प्रचंड सकारात्मक उर्जा प्रतीत होते. या उर्जेमध्ये निसर्गलहरींचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. कारण निसर्ग न थकणारा आणि न थांबणारा असतो आदिवासी माणूस नृत्य, गाण्यात तासन्तास थकत नाही. ही निसर्ग लहरच आहे, असे वाटल्याशिवाय राहत नाही.

आदिवासी जीवनातील साधेपणा, शिस्तबद्ध, सुसूत्रीत, स्वयं-नियंत्रित सहकार वृत्ती, समानता, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता, ऐक्य या कित्येक गुणांचा अविष्कार विविध प्रकारची आदिवासी गाणी आणि नृत्यांच्या प्रकारातून प्रत्ययाला येते.

निसर्गाकडून मिळालेल्या या देणगीमुळे आदिवासी चोरी करीत नाही, भिक मागत नाही, बलात्कार, खून मारामाऱ्या या अवगुणांपासून आदिवासी माणूस दूर असतो. आदिवासी आणि निसर्ग हे दोन्हीही सजीव घटक एकमेकांप्रती इतके घट्ट आहेत की दोन्हींच्या या नातेसंबंधातून एक अद्वितीय संस्कृती विकसित झाली, जी सातत्याने मानवी जीवनाला मार्गदर्शन करते.

❖❖❖

# आदिवासी सांस्कृतिक महोत्सव २०१६-१७

• सरोजिनी द. क्षिरसागर

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या संस्थेमार्फत दरवर्षी शहरी भागात **आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे** आयोजन करण्यात येते. या महोत्सवामध्ये **(१) आदिवासी हस्तकला प्रदर्शन**- पाच दिवस, **(२) आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा**- एक दिवस, **(३) आदिवासी लघुपट महोत्सव (फिल्मशो)**- तीन दिवस असे **३ कार्यक्रम एकत्रित** आयोजित करण्यात येतात.

आदिवासींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच आदिवासी संस्कृती, हस्तकला, नृत्यकला, केशभुषा, वेशभुषा व रहाणीमान यांचे दर्शन शहरी भागातील नागरिकांना होण्यासाठी व यामुळे आदिवासी हस्तकलेचे जतन, संवर्धन होवून प्रचार व प्रसार होण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सन २०१३ पासून शासनाने अशा प्रकारचे आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, महाराष्ट्र राज्यातील प्रमुख शहरात साजरे करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवात सहभागी झालेल्या आदिवासी कलाकारांना शासन मानकानुसार निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. तसेच प्रवासभत्ता, वस्तूवहातूक भत्ता, दैनिक भत्ता, पेहराव भत्ता, मानधन इत्यादी देय भत्यांची रक्कम सर्व सहभागी आदिवासी कलाकारांना धनाकर्षाद्वारे अदा करण्यात येते. या महोत्सवाचे स्वरूप खालील प्रमाणे आहे.

**(१) आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री - (५ दिवस)**

या कार्यक्रमातील आदिवासी हस्तकला प्रदर्शनात ५ दिवसासाठी, ६० आदिवासी हस्तकलाकारांना वस्तू विक्रीसाठी ३० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येतात. या स्टॉलवर हस्तकला वस्तुंचे प्रदर्शन करून वस्तूंची विक्री करण्यात येते. अशाप्रकारे आदिवासी कलाकारांच्या हस्तकलेने बनविलेल्या वस्तूंना शहरी भागात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येते. या प्रदर्शनास नागरी भागातील हौशी नागरिक कुतूहलाने भेट देतात व हस्तकलेच्या वस्तू आवडीने विकत घेतात. वस्तू विक्री करून आलेली संपूर्ण रक्कम संबंधित कलाकारास मिळते त्यामुळे आदिवासी हस्तकलाकारांना आर्थिक लाभ होतो व यातूनच त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, पर्यायी आदिवासी हस्तकलेचे जतन, संवर्धन होवून प्रचार व प्रसार झाल्याचे दिसून येते.

**(२) आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा - (१ दिवस)**

या कार्यालयात नोंद असलेल्या महाराष्ट्रातील १० ते १२ आदिवासी नृत्यपथकांना आमंत्रित करण्यात येते. यातील एका नृत्यपथकात २० ते २५ कलाकार असतात. प्रत्येक नृत्यपथकास १० ते १५ मिनिटे नृत्य सादरीकरणासाठी देण्यात येतात. अशाप्रकारे ३ तासात १० आदिवासी नृत्यांचे या नृत्यस्पर्धेत सादरीकरण होते. या १० पथकांचे सादरीकरणाबाबत नृत्यस्पर्धेदरम्यान ३ परिक्षकांकडून परिक्षण करण्यात येते. यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने येणाऱ्या, प्रथम ३ क्रमांकावरील आदिवासी नृत्यपथकांना प्रोत्साहनपर ३ बक्षिसे जाहिर करण्यात येतात व बक्षिसांची रक्कम अनुक्रमे रुपये १०,००१/- रूपये ७,५०१/- व रुपये ५,००१/- या प्रमाणे असून नृत्यस्पर्धा संपतास संबंधित नृत्यपथकांना रोख स्वरुपात अदा करण्यात येते.

**(३) आदिवासी लघुपट महोत्सव - (३ दिवस)**

आदिवासी कला, जीवन व संस्कृतीवर आधारित या संस्थेने तयार केलेले ९० लघुपट/माहितीपट आहेत. या लघुपटांपैकी काही लघुपट ३ दिवस प्रोजेक्टरवर या कलामहोत्सवात प्रदर्शित करण्यात येतात. यातून या महोत्सवात येणाऱ्या नागरी भागातील हौशी प्रेक्षकांना हे लघुपट पहाण्याची संधी मिळते. तसेच यातून त्यांना महाराष्ट्रातील आदिवासींची संस्कृती, वेषभुषा, केशभुषा, दागदागिने, लग्नपद्धती. विविध आदिवासी भाषा इत्यादी अनेक बाबींची ओळख होते व यातूनच आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन होवून प्रसार घडून येतो.

**सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात पहिला आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, पालघर, जिल्हा ठाणे येथे संपन्न**

या संस्थेमार्फत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात पहिला **आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, पालघर** जिल्हा ठाणे येथे लायन्स क्लब ऑफ पालघर या ठिकाणी दिनांक **२७/१/२०१७ ते ३१/१/२०१७** या ५ दिवसाच्या कालावधीत आयोजित करण्यात आला. या कालावधीत **आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील एकूण ५५ आदिवासी हस्तकलाकार उपस्थित होते. या प्रदर्शनात त्यांनी हस्तकलेने बांबूपासून बनविलेल्या शोभेच्या वस्तू, धातूच्या वस्तू, वारली पेंटीग, गोंडी पेंटीग, वनौषधी, पेपर मुखवटे, काष्ठशिल्प, वूडन लॅम्प, पेपर क्राफ्ट, गवतापासून बनविलेल्या वस्तू, खाद्य पदार्थ इत्यादी वस्तू प्रदर्शित करून विक्री केल्या. यातून मिळणारी संपूर्ण रक्कम कलाकारांना मिळाली व अशा प्रकारे शासनाकडून हस्तकला वस्तूविक्रीसाठी शहरीभागात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली.

• सांस्कृतिक अधिकारी, आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, राणीचा बाग, जुने सर्कीट हाऊस जवळ, पुणे-४११००१. मोबाईल क्रमांक ८६९८८३९३०३ ईमेल - sarojineekshirsagar77@gmail.com

या प्रदर्शनातील हस्तकलाकारांपैकी एक हस्तकलाकार श्री. मधुकर वाडू, मुक्काम कोढाण, तालुका मनोर, जिल्हा पालघर हे उत्तम वारली चित्रकार असून ते शहरी भागाजवळ रहात असल्याने त्यांना इंग्रजी व जर्मन भाषा शिकण्याची आवड निर्माण झाली. त्यामुळे ते युरोप येथे जावून आपल्या वारली चित्रकलेचे प्रदर्शन व विक्री करू शकले. ते ह्या संस्थेच्या आदिवासी हस्तकला प्रदर्शनात नेहमी सहभागी होत असत. त्यामुळे त्यांचा शहरी भागातील व्यक्तींशी संपर्क आल्याने त्यांना संभाषण कौशल्य प्राप्त झाले. त्यांच्या वारली चित्रकलेची जास्तीतजास्त विक्री झाल्याने त्यांना स्वयंरोजगार मिळाला व यातून त्यांना वैयक्तिक विकासाची संधी मिळाली.

तसेच याच महोत्सवात दिनांक **२८/१/२०१७ रोजी** सायंकाळी ५ ते ८ या दरम्यान आदिवासी **पारंपरिक नृत्यस्पर्धेचे** आयोजन करण्यात आले. या वेळी महाराष्ट्रातील ७ आदिवासी नृत्यपथकांनी या स्पर्धेत भाग घेवून विविध भागातील आदिवासी नृत्यांचे सादरीकरण केले. यात लेझीम नृत्यपथक-जुन्नर, जिल्हा पुणे, ढोल नृत्यपथक डहाणू, जिल्हा पालघर, पावरी नृत्यपथक-सुरगाना जिल्हा नाशिक, तारपा नृत्यपथक सोनसरी, जिल्हा पालघर, ठाकर नृत्यपथक सुरगाना जिल्हा नाशिक, सांबळनृत्यपथक सुरगाना, जिल्हा नाशिक इत्यादी आदिवासी पारंपरिक नृत्यांचे प्रत्येक २५ ते ३० मिनिटे सादरीकरण करण्यांत आले. या नृत्यस्पर्धेचे परीक्षण करणाऱ्या ३ परीक्षकांनी गुणानुक्रमे प्रथम ३ क्रमांक जाहिर केल्याने त्या पथकांना नृत्यस्पर्धा संपताच खालीलप्रमाणे बक्षिसांची रोख रक्कम अदा करण्यात आली.

१०. प्रथम क्रमांक - बक्षिस रुपये १०,००१/- पावरी नृत्यपथक, सुरगणा, जिल्हा नाशिक.

११. द्वितीय क्रमांक - बक्षिस रुपये ७,५०१/- तारपा नृत्यपथक, डहाणू, जिल्हा पालघर.

१२. तृतीय क्रमांक - बक्षिस रुपये ५,००१/- लेझिम नृत्यपथक, जुन्नर, जिल्हा पुणे.

तसेच या महोत्सवात आदिवासींच्या कला, जीवन व संस्कृतीवर आधारित या संस्थेने तयार केलेल्या ९० लघुपटांपैकी काही लघुपट ३ दिवस प्रोजेक्टरवर प्रदर्शित करून **दिनांक २९/३/२०१७ ते ३१/३/२०१७** या ३ दिवसाच्या कालावधीत **लघुपट महोत्सवाचे** आयोजन करण्यात आले. यातून या महोत्सवात येणाऱ्या नागरी भागातील हौशी प्रेक्षकांना हे लघुपट पहाण्याची संधी मिळाली. तसेच यातून त्यांना महाराष्ट्रातील आदिवासींची संस्कृती, वेषभुषा, केशभुषा, दागदागिने, लग्नपद्धती, विविध आदिवासी भाषा इत्यादी अनेक बार्बीची ओळख झाली व यातूनच आदिवासी संस्कृतीचे जतन, संवर्धन, प्रचार व प्रसार झाल्याचे दिसून येते.

**सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील दुसरा आदिवासी सांस्कतिक महोत्सव, पुणे, जिल्हा पुणे**

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात दुसरा आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, पुणे येथे दिनांक **२४/३/२०१७ ते २८/३/२०१७** या ५ दिवसाच्या कालावधीत आयोजित करण्यात आला. या ५ दिवसाच्या कालावधीत यासंस्थेच्या प्रांगणात **आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील एकूण ७२ आदिवासी हस्तकलाकार सहभागी झाले होते.

या महोत्सवात **दिनांक २५/३/२०१७** रोजी सायंकाळी **आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा** अल्पबचत भवन, क्वीन्स गार्डन, पुणे आयोजित करण्यात आली. या नृत्यस्पर्धेत महाराष्ट्रातील १४ आदिवासी नृत्यपथकांनी भाग घेवून यामध्ये धामणीनृत्य, ढोलनाच, तारपानृत्य, डोग-यादेवनृत्य, सांबळनृत्य, पावरीनृत्य, लेझिमनृत्य, कालिचिडीनृत्य, होळीनृत्य, टिपरीनृत्य, घोरनृत्य, बोहाडानृत्य, गौरीनाच इत्यादी विविध आदिवासी नृत्यांचे सादरीकरण केले.

तसेच या महोत्सवात आदिवासींच्या कला, जीवन व संस्कृतीवर आधारित या संस्थेने तयार केलेल्या ९० लघुपटांपैकी काही लघुपट **दिनांक २६/३/२०१७ ते २८/३/२०१७** या ३ दिवसाच्या कालावधीत प्रोजेक्टरवर प्रदर्शित करून या संस्थेच्या प्रांगणात **लघुपट महोत्सवाचे** आयोजन करण्यात आले.

❖❖❖

# आदिवासी सांस्कृतिक महोत्सव २०१८

आदिवासी विकास विभागाअंतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत सन २०१३-१४ पासून आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

आदिवासी कलेला शहरी भागात बाजारपेठ मिळवून देवून त्यांच्या कलेला प्रोत्साहन देणे, संवर्धन व जतन करणे तसेच त्यांच्या संस्कृतीची ओळख नागरी भागातील लोकांना करून देणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे.



सन २०१३-१४ पासून आदिवासी सांस्कृतिक महोत्सवामध्ये पाच दिवसांचे आदिवासी हस्तकला प्रदर्शन व एक दिवस पारंपरिक नृत्यस्पर्धा एकत्रितपणे आयोजित करून, याच कार्यक्रमामध्ये आदिवासी जीवन, संस्कृती, कला यावर या कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या लघुपटांचा महोत्सव शहरी भागातील निमंत्रितांसाठी आयोजित करण्यात येतो. अशाप्रकारे एका आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील चार प्रमुख शहरात सदर महोत्सवाचे आयोजन करण्याची योजना आहे.



सदर महोत्सवाचे चालू वर्षी पुणे येथे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात २८, क्वीन्स गार्डन, पुणे येथे दिनांक १५ मार्च २०१८ ते १९ मार्च २०१८ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. दिनांक ५ मार्च २०१८ ते १९ मार्च २०१८ दरम्यान आदिवासी हस्तकला प्रदर्शन (५ दिवस), दिनांक १६ मार्च रोजी (एक दिवस) आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा व दिनांक १७ मार्च ते १९ मार्च २०१८ रोजी आदिवासी लघुपट महोत्सव (३ दिवस) असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून १३० आदिवासी हस्तकलाकार व एकूण १० नृत्यपथकातील २०५ नृत्यकलाकार सहभागी झाले होते. सर्व हस्तकलाकार व नृत्यकलाकार यांची निवास, भोजन इत्यादी व्यवस्था आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात आली होती. तसेच सर्व कलाकारांना प्रवास भत्ता, पेहराव भत्ता इत्यादी शासकीय नियमानुसार अदा करण्यात आले.

आदिवासी हस्तकला प्रदर्शनासाठी उपस्थित हस्तकलाकारांनी विक्री करण्यासाठी वारली पेंटींग, गोंडी पेंटीग, मेटलच्या कलाकृती, बांबुच्या कलाकृती, लाकडी शिल्प, पेपरमेशी मुखवटे, वनौषधी, आदिवासी दागदागिने इत्यादी होत्या. प्रदर्शनादरम्यान सुमारे १२ लाख रुपयांची वस्तुविक्री झाली. तसेच अंदाजे रुपये ८ लाखाची ऑर्डर मिळाली आहे.



आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे औचित्य साधून यावर्षी प्रथमच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व बिझनेस इथिक्स फाऊंडेशन, पुणे येथील तज्ज्ञ व्यक्तींच्या सहयोगाने आदिवासी विकासाकरिता कुठले प्रकल्प राबविता येतील याविषयी दिनांक १५ मार्च रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने आदिवासींसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मूल्यमापन करणे, आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबंधीत विषयांवर संशोधन करणे, विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे, लघुपटांची निर्मिती व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे इत्यादी विषयांवर चर्चा झाली.

सदर बैठकीमध्ये वरील उद्दिष्ट पार पाडण्यासाठी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने आदिवासींच्या विकासास परिणामकारक दिशा देणारे विविध उपक्रम राबविता येते शक्य होईल असे उपस्थितांनी सांगितले.

सदर बैठकीस मा. आयुक्त, डॉ. श्री. किरण कुलकर्णी, सहआयुक्त, श्री. भालेकर, उपसंचालक श्रीमती सीमा जोशी, जिल्हा समन्वयक सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, डॉ. शिवाजी पाचरणे, श्रीमती सविता कुलकर्णी व इतर एन.एस.एस. समन्वयक तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती असे एकूण ४६ जण उपस्थित होते.



मा. आयुक्त, डॉ. श्री. किरण कुलकर्णी यांचे संकल्पनेतून सदर हस्तकला प्रदर्शनासाठी व नृत्यस्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ अंतर्गत एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांची मदत घेण्यात आली होती. कार्यक्रमादरम्यान सर्व व्यवस्थेसाठी एन.एस.एस.च्या सुमारे ७० ते ८० विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून हस्तकलाकारांना व नृत्यपथकांना अतिशय मोलाचे सहकार्य केले.

आदिवासी कलाकार हस्तकलेच्या आकर्षक वस्तू तयार करतात. परंतु त्यांची विक्री करताना होणारी भंबेरी एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांमुळे झाली नाही. शहरी भागातील लोकांशी बोलताना ते लाजतात. त्यांना वस्तूचा भाव करता येत नाही. अशिक्षित असल्याने वस्तू खरेदीची पावती त्यांना ग्राहकांना देता येत नाही. ही सर्व कामे एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी कुशलतेने हाताळली. त्यामुळे विक्रीमध्ये वाढ होण्यास निश्चितच मदत झाली. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी तिप्पट विक्री झाली. हस्तकलाकारांशी चर्चा केली असता ते या विद्यार्थ्यांवर अतिशय खुष होते. या संस्थेतील कर्मचाऱ्यांनाही त्यांनी खूप मदत केली. या विद्यार्थ्यांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशस्तिपत्र देण्यात आले आहे.



आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या प्रचार व प्रसारासाठी मराठवाडा मित्र मंडळ, पुणेच्या १५ विद्यार्थ्यांचीही मदत घेण्यात आली होती. सदर विद्यार्थ्यांनी विविध शाळा, कॉलेज, कंपनी, कार्यालये इत्यादी ठिकाणी नियोजनपूर्वक भेट देवून महोत्सवाची संकल्पना सांगून भेट देण्यास व वस्तू खरेदी करण्यासाठी प्रोत्साहित केले. वस्तू विक्रीवर व प्रदर्शनास भेट देणाऱ्यांवर त्याचा निश्चितच चांगला परिणम झाला.

सर्व कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी, या संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तमरितीने पार पाडली. यामध्ये सहसंचालक, श्री. आयुषप्रसाद, श्रीमती सीमा जोशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पवार श्रीमती क्षिरसागर, श्री. रमेश रघतवान, श्रीमती पुरंदरे, श्रीमती काळे, श्री. अनंत उगलमुगले, श्री. हेमाडे, श्री. सपकाळ, श्री. चौधरी, श्री. अहिरे यांनी मोलाची कामगिरी बजावली. या महोत्सवास अनेक परदेशी पर्यटकांनी भेट दिली व वस्तूंची खरेदी केली.

❖❖❖




महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग,

चित्ररथ प्रथम क्रमांक

(प्रजासत्ताक दिन सन २०१४)

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १

Regiistration No .37/438/79

**Form IV**

| | |
|---|---|
| 1 Place of Publication | 28,Queen"s Garden, Pune-411001 |
| 2 Periodicity of Publication | Bi-annual |
| 3 Printer's Name | Manager Photozinco Press Pune-411001 |
| Nationalty | Indian |
| Address | Photozinco Press Pune-411001 |
| 4.Publisher's Name | Dr Kiran Kulkarni |
| Nationalty | Indian |
| Address | 28,Queen"s Garden, Pune-411001 |
| 5 Editor's Name | Dr Kiran Kulkarni |
| Nationalty | Indian |
| Address | 28,Queen"s Garden, Pune-411001 |

I, Kiran Kulkarni,herby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dr Kiran Kulkarni
(signature of publisher)

# TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research Bulletin is a by annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

## Guidelines for Contributors

The manuscripts to be published in this bulletin should be typewritten in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organized under suitable headings.

Table should be preferably incorporated in the body of paper with relevant interpretation. Charts and maps should be in black & white only.

Soft copy of the manuscript is welcome.

Manuscript are not returned.

The view expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and editor is not responsible for the views expressed by the authors

The contributors will be given two reprints and two copies of the bulletin

All correspondences should be addressed to the Commissioner, Tribal Research and Training Institute, 28 Queens Garden,Pune-411001 .


TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE
28 Queen's Garden,Pune-1
www.trti.mah.nic.in

Annual Subscription-Rs 100/- Single Copy-RS 50/-

Govt. Photozinco Press, Pune - 411001.